
# महाभारत

## खंड १७ : वनपर्व९

मराठी अनुवाद : श्री. अशोक कोठारे



ई साहित्य प्रतिष्ठान

# महाभारत

## महाभारत खंड सतरावा (वनपर्व)

अशोक कोठारे

**ई साहित्य प्रतिष्ठान**

**विशेष सुचना -** महाभारताचे सर्व खंड वाचण्यासाठी कृपया खालील लिंक वर जा.
http://www.esahity.com/2309234323812351236623402381235O.html

# महाभारत

मराठी अनुवादक : श्री. अशोक कोठारे

ashokkothare@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

**ई साहित्य प्रतिष्ठान**

G1102, Eternity, Eleventh floor

Eastern Express Highway. Thane, 400604

**www.esahity.com**

**esahity@gmail.com**

©esahity Pratishthan®2018

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फॉरवर्ड करू शकता.

• हे पुस्तक वेबसायटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

**प्रकाशन : १० जून २०१९**

## – अनुवादकाचे दोन शब्द –

हिंदू मान्यतेत ज्या कांहीं रचना सर्वमान्य आहेत त्यातील एक महाभारत आहे. हिंदूंच्या सगळ्या परंपरा, चालीरिती, संस्कार ह्यांची मुळं महाभारतात आहेत. चौकस हिंदू व्यक्तिला बर्याच वेळा अमुक प्रथा कां प्रचारात आली असा प्रश्न पडतो परंतु, त्याचे समाधानकारक उत्तर मात्र त्याला मिळत नाही. चार जण चार कल्पना सांगतात व त्याचा गोंधळ उडतो. ते होऊ नये व त्या वहिवाटी, प्रथा ह्यांचे मूळ कोठे आहे ते लक्षात यावे ह्यासाठी हा प्रयत्न आहे, हा अनुवाद वाचला कीं, त्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरं मिळतील अशी माझी अपेक्षा आहे. म्हणून, मी महाभारत ह्या महाकाव्याचा मराठीत अनुवाद करण्याचे ठरवले. आता पर्यंत महाभारतावर बरेच लिहीले गेले आहे व ह्यापुढेसुद्धा पुष्कळ लिहीले जाईल पण महाभारत, जसें आहे तसें, एक शैक्षणिक माध्यम म्हणून वाचकांना मिळणे आवश्यक आहे व ते ह्या भाषांतराने मी वाचकांना देत आहे.

महाभारत हे एक महाकाव्य आहे. असें म्हणतात, हा सर्वात मोठा ग्रंथ आहे. मी मात्र अनुवाद करतांना तो गद्यात केला आहे कारण, मला कवितेचे अंग नाही. महाभारताच्या उपलब्ध प्रतिंत कांहीं भेद आढळतात. त्यासाठी सगळे भेद भाषांतरात घेतले आहेत म्हणजे, कांहीं राहून जावू नये. त्या शिवाय, सामान्य वाचकांना कथाभाग अधिक चांगल्या प्रकारे समजावा म्हणून कांहीं टीपा दिल्या आहेत.

माझे वाचक साधे मराठी आहेत ज्यांचे ज्ञान मोजके आहे असें गृहीत धरून मी अनुवादाची भाषा बाळबोध मराठी ठेवली आहे, त्यामुळें कोणालाही ते सहजपणे वाचता येईल व समजेल. कांहीं लेखक अशा ग्रंथाचे अनुवाद करतांना प्राचीनतेचा अनुभव यावा म्हणून मुद्दाम प्राचीन (Archaic) शब्दप्रयोग वापरतात परंतु, माझा असा अनुभव आहे किं, बहुतेक वाचकांना ते वाचण्यास त्रास होतो. म्हणून भाषा आपली नेहमीचीच ओघवती ठेवली आहे.

महाभारताचे अठरा पर्व आहेत व त्या आधीचा असा आदिपर्व म्हणून एक जोडला आहे. आदिपर्वामुळे महाभारतातील मुख्य कथाभागाचा पूर्वेतिहास वाचकांना समजेल. आदिपर्वात हिंदूंच्या अनेक पुराणांच्या मुळसुत्राची कल्पना येते. म्हणून तो माझ्यामते फार महत्वाचा आहे. मी मात्र अनुवाद करण्याच्या सोयीसाठी संपूर्ण महाभारत चाळीसापेक्षां

जास्त खंडांत विभागून दिले आहे. त्यामुळें इंटरनेटवर चढवतांना व उतरवतांना सोपे जाईल अशी अपेक्षा आहे. त्यातील हा सतरावा खंड आपण आता वाचणार अहात, त्यात पतिव्रता महात्म्य पर्व, कुंडल हरण पर्व, दुसरे अरण्य पर्व, आपण पहाणार आहोत.

महाभारत कधी लिहीले गेले असा प्रश्न नेहमी ते वाचणार्याच्या मनात डोकावतो म्हणून त्याबद्दल थोडे लिहीत आहे. महावीर व गौतम बुद्ध आपल्याला माहीत आहेत, साधारणपणे इसवीसन पूर्व ५५० वर्षे ते दोघे महानुभाव होऊन गेले. जर महाभारताची रचना त्या आधीची असती तर त्याचा उल्लेख त्या काळातील जैन व बुद्ध साहित्यात निश्चितच आला असता. बुद्धाला सांख्यमुनी असें संबोधतात. कारण, त्याचे तत्त्वज्ञान सांख्य विचारावर आधारीत आहे. व्यासांची भगवत गीता वेदांताचे तत्त्वज्ञान मांडते जे तुलनेने अर्वाचीन आहे व सांख्य विचार हा हिंदू तत्त्वज्ञानातील पहिला म्हणजे, सर्वात जास्त जुना समजला जातो. जर ते बुद्धाच्या आधीचे असते तर निश्चितच त्याचा प्रभाव बुद्धाच्या विचारांवर झालेला दिसला असता. विशेष करून हे दोघे राजघराण्याचे होते म्हणजे त्यांचे शिक्षण त्या काळातील सर्वोत्तम असणारच मग त्याच्या अभ्यासात गीता, कृष्ण हे आले असते. विशेषकरून जर ते दोघे धर्मावर काम करत होते तर हे अपेक्षित आहे. परंतु, प्रत्यक्ष असें दिसते किं, त्या दोघाच्याही तत्कालिन साहित्यात तो उल्लेख आढळत नाही. ह्याचा अर्थ महाभारत त्या नंतरच्या काळात रचले गेले असावे. दुसरा अंदाज असा कीं, वेदांत तत्त्वज्ञान लिहीणारे व्यास व महाभारतकार व्यास एकच व्यक्ति होती असें साधार मानले जात आहे. वेदांताचा सार महाभारतातील गीतेत आहे. वेदांत तत्त्वज्ञानाचा उगम त्याच सुमारास झाला हे सर्वमान्य आहे. महाभारत लिहीणारे व्यास सांगतात, वेदांचा विसर पडत चालला आहे तरी ते ज्ञान सोप्या भाषेत सामान्यानां समजावे म्हणून कथारुपातून ते उपलब्ध व्हावे ह्यासाठी त्यांनी महाभारत ही काल्पनिक रचना केली आहे. असें सर्व पहाता आपण अंदाज करू शकतो किं, महाभारत इसवीसन पूर्व ४००च्या सुमारास म्हणजे, सम्राट अशोकाच्या आधी लिहीले गेले असावे.

महाभारतात स्वतः व्यास एक पात्र अशी भूमिका करतांना दिसते. त्याप्रमाणे कृष्ण म्हणून जे पात्र आहे त्याचे सगळे कर्तव्य पहाता व्यास ज्यांचे खरे नांव कृष्ण द्वैपायन आहे, तेंच करीत आहेत असे वाटते. म्हणजे महाभारतकार व्यास त्यांच्या रचनेत दोन भूमिका

करतांत असें म्हणावे लागेल. त्यामुळें असे समजण्यास हरकत नसावी कीं, महाभारत त्यांच्या कल्पनांचाच एक भाग आहे. कदाचित असें म्हणता येईल कीं, महाभारत हा एक दंतकथांचा संग्रह आहे व त्याद्वारा नैतिकमुल्ये शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे.

माझ्या मते, अशा चर्चेत वेळ व्यर्थ न घालवतां हिंदूंनी महाभारतातील कथांतून काय सांगावयाचे आहे ते पहावे. एक ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून महाभारत उपयोगी येईल असें वाटत नाही. महाभारतातील कथा पहाता, त्यातील अतिरंजित प्रसंग हेंच सांगतात किं हे सगळे कपोलकल्पित आहे. परंतु, त्यांतून जे शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे तो अप्रतिम आहे.

आपल्याकडे इंग्रजांनी सांप्रतची शिक्षण पद्धती आणली त्या आधी हिंदूंतील द्विज, पाठशाळांतून प्राथमिक शिक्षण घेत असतं. त्यात प्रथम, अक्षर ओळख नंतर गणित व महाभारत शिकवले जाई (पुरोहित ब्राह्मणांच्या पाठशाळांतून त्याशिवाय कर्मकांडाच्या पोथ्या शिकवल्या जात) हे लक्षात घेतले पाहिजे. कारण, महाभारतातून माणसाला जीवन कसे जगावे त्याबद्दलचे मार्गदर्शन मिळते. महाभारत हे एक शैक्षणिक माध्यम म्हणून वापरात होते. आपल्या शिवाजी राज्यांचे शिक्षण महाभारतातूनच झाले होते. त्यातून जे नितीशास्त्र शिकवले आहे तेंच आपले शिक्षण होते. माझ्यामते, हांच उद्देश वाचकांनी डोळ्यासमोर घेऊन महाभारत वाचावे, धार्मिक ग्रंथ समजून भाबडेपणे वाचू नये कारण तो धार्मिक ग्रंथ नाही असे माझे मत आहे. महाभारतात अनेक बौद्धीकं आहेत जसें भगवत गीता, विदूर गीता, कणिक गीता, व्याध गीता वगैरे. ते सगळे जीवनाचे ज्ञान आहे म्हणून प्रत्येक शहाणा हिंदू, महाभारत वाचण्यात ठेवेल तर त्याचे भले होईल. त्यांना ते सहजपणे मिळावे म्हणून हा प्रपंच आरंभला आहे. ई–साहित्य त्याचे विनामुल्य वितरण करणार आहेत म्हणून त्यांना शतशः

धन्यवाद.

अशोक कोठारे



माझा ई-मेल –

ashokkothare@gmail.com
ashokkothare@yahoo.co.in

ह्या वरून आपण माझ्याशी संपर्क करू शकता.

ह्या पुस्तकाचे मुद्रण करण्यासाठी अनुवादकाची आधी परवानगी घेणे आवश्यक आहे. न घेतल्यास तो गुन्हा ठरेल व त्यावर योग्य कारवाई होईल.

ह्या ई–पुस्तकाचे विनामुल्य वितरण ई–साहित्य करणार आहेत परंतु, हे ई–पुस्तक कोणीही कोणालाही विनामुल्य भेट देऊ शकतो.

**माझे ब्लॉग –**

Ashok Kothare, http://ashokkotharesblog.blogspot.com/ for stories
I reckon, http://kotharesviews.blogspot.com/ for philosophy
Ideas and tips on any subject, http://kotharay.blogspot.in/ for intelligent discussions.

Freedom of Expression, http://kothare-thinks.blogspot.in/

My Marathi Blog, http://kothare-marathi.blogspot.in/ मला असे वाटते

**विशेष सुचना** - महाभारताचे सर्व खंड वाचण्यासाठी कृपया खालील लिंक वर जा.

http://www.esahity.com/23092343238123512366234023812350.html

## - वनपर्व पुढे चालू -

## - महाभारत खंड सतरावा –

ह्या सोळाव्या खंडात तुम्ही पतिव्रता महात्म्य पर्व, कुंडल हरण पर्व, दुसरे अरण्य पर्व वाचणार अहात.

## पतिव्रता महात्म्य पर्व

## भाग पहिला

युधिष्ठीर मार्कंडेय ऋषींना विचारतो, "अहो महामुनी, मला स्वताला तसेंच माझ्या भांवांना अशा प्रसंगामुळें जे कष्ट होतात त्यापेक्षा द्रुपदाच्या कन्येस जे अतीव कष्ट अशा अनुभवांमुळें सहन करावे लागतात त्याचा मी विचार करत आहे. ज्यावेळी द्युतात आम्ही मूर्खपणा केल्यामुळें अडकलो होतो त्यातून तिनेच आम्हा सगळ्या भावांना तिच्या चतुराईने वाचवले होते. असें असूनही आता तिलाच जयद्रथाने पळवण्याचा प्रयत्न करतांना आपण पाहिले आहे. मला सांगा, असे आधी कधी घडले आहे कां

मार्कंडेय त्याला सांगू लागतात, "ऐक युधिष्ठीरा, पवित्र स्त्रीच्या पुण्याईने ह्या आधीसुद्धा असें घडलेले आहे, त्याबद्दल मी सती सावित्रीचा उल्लेख करू शकतो.

मलय देशातील प्रभू वंशात एक थोर राजा फार प्राचीन काळी होऊन गेला होता. तो पुण्यप्रतापी होता आणि सदैव ब्राह्मणांच्या सल्ल्याने त्याची सगळी कामं करत असें. तो वचनाचा पक्का होता, व्रतस्थ होता, यज्ञयागात त्याचा काळ घालवत असें. लोक कल्याण कार्यात मग्न असें म्हणून तो त्याच्या नागरी आणि ग्रामीण प्रजेत फार आवडता होता. त्याचे नांव होते अश्वपती. तो सत्पात्र चांगुलपणा व भूतदया ह्या तत्त्वाने आपला कारभार करत असे. मधूर वाणी होती व सगळ्यांना मदत करण्याचा प्रयत्न करत असें परंतु, तो निःसंतान होता. त्याचे वय होत होते तेव्हां त्याला आपले निःसंतान असणे विशेष जाणवू लागले. ते त्याला दिवसेंदिवस बेचैन करत होते. ब्रह्मणांच्या सल्ल्याने तो आपल्याला संतान व्हावी म्हणून कांहीं व्रत वैकल्य करू लागला. ब्रह्मचर्य पाळण करत तो मिताहार करून राहू लागला. अग्नीला दररोज दहाहजार वेळा अर्घ्य देत असें. त्याबरोबर सावित्रीचे मंत्र जपत होता. तो फक्त एकदाच दुपारी जेवत असें. असें अठरा वर्षे तो तप करत होता.

त्या त्याच्या तपस्येमुळें व इतर गुणांमुळें सावित्री देवी त्याच्यावर प्रसन्न झाली. ती त्याच्या अग्नीहोत्रातून बाहेर आली. अश्वपतीला तिने दर्शन दिले. त्याला आशिर्वाद देण्यासाठी ती बोलू लागते, "अरे राजा, तुझ्या ब्रह्मचर्याच्या व्रतामुळें मी तुझ्यावर प्रसन्न झाली आहे. तुझे पावित्र्य आणि भोगेंद्रीयांवरील संयम पाहून मी तुला जे पाहिजे ते देण्यास तयार आहे. परंतु, पुण्यप्रभाव (अध्यात्मिक उर्जा) कमी होईल असें कांहीं मागू नकोस". राजा तिला बोलतो, "मी जे करतो ते सगळे पुण्यप्रभाव वाढवण्यासाठीच करत असतो. माझ्या वंशात अनेक गुणी पुत्र जन्मोत जे माझ्या वंशाचे नांव अजरामर करतील. असा मला तुझा आशिर्वाद हवा आहे". सावित्रीला ते आधीच माहीत होते. ती सांगते, "मी तुझ्या देवाला, ब्रह्माला, त्याबद्दल सांगितले आहे. त्याप्रमाणे पृथ्वीवर तुला एक स्वयंभू कन्या प्राप्त होणार आहे. त्यावर तू कांहीं बोलू नकोस. कारण तुझ्या प्राक्तनाप्रमाणे जे योग्य आहे तेंच होऊ शकते".

मार्कंडेय पुढे सांगत असतात, सावित्री देवीचे ते बोलणे राजा मान्य करतो. परंतु, तो तिला विनंती करतो किं, ते लवकर व्हावे. त्या संभाषणानंतर देवी सावित्री अंतर्धान पावते. राजा त्याच्या राजधानीकडे जातो. तो त्याचा पुण्यप्रभावी कारभार चालू ठेवतो. त्यानंतर कांही काळाने राजाच्या मोठ्या राणीला दिवस जातात. अरें युधिष्ठीरा, यथावकाश तिला एक कन्यारत्न होते. कमल नयना अशी ती मुलगी जन्मते. तिचे सगळे जन्माचे विधी राजा आनंदाने साजरे करतो. सावित्रीच्या कृपेमुळें ती जन्मली म्हणून तिचे नांव सावित्री ठेवले जाते. ती छोटीशी सावित्री चंद्राच्या कलांप्रमाणे वाढू लागते. साक्षात श्री सारखी ती तेजस्वी दिसत असते. यथावकाश ती वयात येते. तिचे सौंदर्य अधिकाधिक प्रकर्षाने जाणवू लागते. एकाद्या सोन्याच्या मूर्ती सारखी ती दिसत होती. लोकांना ती साक्षात लक्ष्मी वाटत होती. तिच्या तेजस्वी कांतीमुळें कोणीही तिच्याशी लग्न करण्यासाठी पुढे होत नव्हता. जेव्हां तिचे पहिले न्हाण येते तेव्हां ती रिवाजानुसार डोक्यावरून स्नान करते आणि शुचिर्भूत होऊन तिच्या कुलदेवीपुढे उभी रहाते. त्यावेळी पुरोहित तिच्या नावांने यज्ञकुंडात आहुती देतात. ती पुजा संपन्न झाल्यावर सावित्री देवापुढील फुलं घेऊन राजाच्या कडे जाते व त्याच्या बाजूला उभी रहाते. आपल्या तेजस्वी मुलीकडे राजा अश्वपती पहातो, तिच्या तेजामुळें कोणीही तिला मागणी घालत नव्हता ह्याची राजाला खंत

असते. राजा सावित्रीला विचारतो, कीं, "ती तिचा पती स्वतः शोधण्यास तयार आहे कां? जर तुला कोणी योग्य उपवर मुलगा मिळाला तर मला सांग. त्यानंतर मी तुझा विवाह त्याच्याशी लावून देईन. माझ्या मुली, तुला हा माझा प्रस्ताव मान्य आहे कां? असें सांगतात कीं, जो पिता आपल्या कन्येस लग्न करून पाठवू शकत नाही त्याचा धिक्कार होतो. जो पती आपल्या पत्नीला समजून घेऊ शकत नाही त्याचा धिक्कार होतो. जो पुत्र आपल्या आईची सेवा करत नाही त्याचा धिक्कार होतो. माझा धिक्कार होऊ नये ह्यासाठी तू तुझा पती शोधून काढशिल कां? तू असे कर कीं, देव आपला धिक्कार करणार नाहीत.

मार्कंडेय पुढे सांगतात, राजाने सावित्रीला तिचा पती शोधण्याचे काम सांगितले व आपल्या सेवकांस आज्ञा केली किं, ते तिच्या मागो माग राहून तिला संरक्षण देतील. ती आज्ञा झाल्यावर ती लाजाळू राजकन्या तिचा पती शोधण्यासाठी निघते. ती तिच्या सोनेरी रथात चढते व तो रथ निघतो राजर्षींच्या अल्हाददायक आश्रमाकडे. तिच्या सोबत राजाचा एक अनुभवी मंत्री असतो. राजकन्या त्या वनात भटकू लागते योग्य पती शोधण्या साठी. त्याठिकाणी ती वनांत असलेल्या लोकांना भेट वस्तु देत असते. अशारितीने ती सावित्री मोठ्या प्रमाणात दान धर्म करत फिरत असते. त्या भागात उच्च श्रेणीचे द्विज रहात होते.

अशारितीने पतिव्रता महात्म्य पर्व भाग पहिला संपला.

# पतिव्रता महात्म्य पर्व

## भाग दुसरा

मार्कंडेय सांगत असतात, अरें युधिष्ठीरा, एकदा राजा अश्वपती नारद मुनी बरोबर बसले असतांना त्यांचे संभाषण चालू होते. त्या वेळी त्याची कन्या सावित्री राजाला भेटावयाला येते. ती बरीच क्षेत्रे नवरा शोधण्यासाठी फिरली होती. आपल्या पित्याला व नारद मुनींना वंदन करते. नारद राजाला विचारतो, "तुझी मुलगी कोठे गेली होती? आणि आता ती कोठून आली आहे? तिचे लग्न कां नाही करून टाकत, ती आता उपवर झाली आहे, अरे राजा

अश्वपती त्यांना सांगतो, "त्या निमित्तानेच माझी मुलगी तिचा पती निवडण्यासाठी गेली होती व आता ती परत आली आहे. ती हल्ली तशी पती शोधण्यासाठी जात असते व माझे मंत्री तिच्या बरोबर असतात. जर कोणी योग्य मुलगा मिळाला तर पुढचे कार्य मी करणार आहे". मार्कंडेय सांगतात कीं, राजा तिला काय प्रगती झाली पतीशोध मोहीमेची सगळे जे घडले ते मला सांग असें बोलतो". जणूकाय देवांने आज्ञा केली आहे असे समजून ती कन्या त्याला सांगू लागते. शल्व वंशाचा एक क्षत्रिय राजा दिसला, त्याचे नांव द्युमत्सेन आहे. परंतु, दुर्दैव वशात ते कालांतराने अंध झाला आहे. त्या राजाला एक शहाणा मुलगा आहे. परंतु, त्या राजाच्या अंधत्वाचा गैरफायदा घेऊन त्याच्या हितद्वेष्ट्यांनी त्याचे राज्य बळकावले आहे. तो राज्य घालवलेला राजा त्याच्या बायको व मुलाबरोबर अरण्यात गेला, तेथे गेल्यावर तो मोठे तप करू लागतो, त्याच्या व्रतस्थ जीवनांमुळें तो एका आश्रमात रहात आहे. त्याचा मुलगा जो राजवाड्यात जन्मला होता आता वनात आश्रमात रहात आहे. तो राजपुत्र माझ्यामते माझ्यासाठी योग्य वर आहे. मी त्याला माझा पती मानण्यास सुरूवात केली आहे. ते ऐकून नारद बोलतात, "अरें राजा, तुझ्या मुलींने मोठीच चूक केली आहे". नारद पुढे सांगतात, अरे राजा, तिने तो सत्यवान तिच्यासाठी निवडला आहे, मी त्यांना ओळखतो. तो मुलगा उत्तम गुणी आहे हे मान्य त्याचा बाप व आई दोघेही सत्त्वशिल आहेत हेसुद्धा मान्य, म्हणूनच त्या मुलाला ब्राह्मण सत्यवान म्हणून ओळखतात. लहानपणी सत्यवान घोड्यांचा मोठा शौकीन होता व मातीचे घोडे बनवत असे व

घोड्यांची चित्र काढत असें, म्हणून त्याला चित्रश्व असें लोक हांक मारत असतं". परंतु, राजा विचारतो, "सत्यवान त्याच्या पित्याशी प्रामाणिक आहे कां? त्याच्यात ती उर्जा आहे कां ज्यामुळे तो चांगला राजा होऊ शकेल नारद सांगतात, "सत्यवान उर्जेत साक्षात सूर्य आहे आणि शहाणपणात साक्षात ब्रह्मदेव आहे, शौर्यात तो इंद्र आहे. दानशूरतेत तो पृथ्वी आहे". अश्वपती विचारतो, "तो दान करण्यात कसा आहे, तो देखणा आहे कां, त्याची प्रवृत्ती दिलदार व दानशून आहे? कां नारद सांगतात, "सत्यवान त्याच्या कुवती प्रमाणे दान करतो परंतु, तो उधळा नाही. द्युमत्सेनाचा मुलगा संस्कृतीच्या मुलासारखा, रतिदेवासारखा आहे. त्याची ब्राह्मणांप्रती आस्था व सत्याचा आग्रह ह्यात साम्य आहे त्याच्याशी. तो उशीनराचा मुलगा सिवा ह्याच्या सारखा आहे. तो ययातिसारखा दिलदार आहे. चंद्रासारखा सुंदर आहे, पुरूषांच्या सौंदर्यात तो अश्विनीकुमार आहे. त्याची भोगेंद्रिये त्याच्या मर्यादित असतात. तो नम्र असला तरी प्रसंगी शूर योद्धासुद्धा आहे. तो त्याच्या मित्रांशी प्रामाणिक असतो, सात्त्विक माणसाची सगळी लक्षणं त्यात आढळतात. तो स्वाभिमानी आहे". अशी सगळी माहिती नारदमुनी देतात, ते ऐकून राजा अश्वपती बोलतो, "अहो महामुनी तुमच्या सांगण्या प्रमाणे हा मुलगा अतिउत्तम गुणी दिसतो. परंतु, तुम्ही मला त्याचे दोष कोणते ते सांगावेत".

नारद सांगतात, "ह्या मुलात एकच दोष आहे परंतु, त्यामुळे त्याचे सगळे गुण व्यर्थ ठरतात. तो दोष असा आहे कीं, तो कोणालाही काढून टाकता येणारा नाही. तो दोष असा आहे किं, सत्यकामाचे आयुष्य कमी आहे. तो जास्तीत जास्त एक वर्षे जीवंत रहाणार आहे. कोणत्याही उपायाने त्याचे आयुष्य वाढवता येणार नाही".

ते ऐकल्यावर एक उसासा टाकून राजा आपल्या प्रिय मुलीकडे पहात म्हणतो, "प्रिय सावित्री, तुला दुसरा कोणी मुलगा निवडावा लागेल कारण, हा जास्तकाळ रहाणारा नाही. हे साक्षात नारदमुनी सांगत आहेत म्हणून त्यावर आपल्याला विश्वास ठेवला पाहिजे".

आपल्या पित्याचे ते बोलणे ऐकून त्याची मुलगी सावित्री त्याला सांगते, "अहो तात, मृत्यू एकदाच येईल. पिता आपल्या कन्येचे दान सुद्धा एकदाच करतो, ह्या गोष्टी एकदाच होतात. आयुष्य लहान अथवा दीर्घ ह्यापेक्षा गुणवत्ता श्रेष्ठ असते. मी एकदाचा माझा जोडीदार निवडला आहे. मी आता दुसर्या कोणालाही त्या जागी पाहू शकत नाही. प्रथम

आपण मनात ठरवतो नंतर ते बोलतो व त्यानंतर त्या अनुसार कारवाई करतो, हा क्रम आहे कर्माचा".

नारद ते ऐकून बोलतात, "अहो राजन, आपल्या कन्येचा निश्चय ठाम आहे असें दिसते. तिला तिचा निर्णय बदलण्यास आपण भाग पाडू शकणार नाही असें दिसते. तिचे म्हणणे रास्त आहे कारण, सत्यकामा सारखा गुणी जोडीदार मिळणे दुरापास्त आहे. म्हणून तू तुझ्या कन्येचे दान सत्यकामाला करावे असें मलासुद्धा वाटते". एवढे बोलून नारदमुनी त्यांच्या पुढच्या प्रवासास निघून जातात.

मार्कंडेय पुढे सांगतात, असें बोलून नारद उठले व आकाशात निघून गेले. राजा अश्वपती आपल्या कन्येच्या लग्नाची तयारी करू लागतो.

अशारितीने पतिव्रता महात्म्य पर्वाचा दुसरा भाग संपला.

# पतिव्रता महात्म्य पर्व
## भाग तिसरा

मार्कंडेय सांगतात, नारदाच्या शब्दावर विश्वास ठेवून राजा त्याच्या एकुलत्या एक कन्येचा विवाह सत्यवानाशी करण्याचे पक्के करतो. त्या करता तयारी करण्याचे आदेश देतो. ब्रह्मणांना बोलावतो व त्यांच्या बरोबर राजा द्युमत्सेनाच्या अरण्यात असलेल्या आश्रमात येतो. तेथे तो त्या अंध राजर्षीला भेटतो. तो ऋषीतुल्य द्युमत्सेन, कुश गवताच्या आसनावर बसलेला असतो, जे एका साल वृक्षाच्या सावलीत असते. तेथे तो राजर्षी त्यांचे स्वागत करतो. परंपरेनुसार सगळें भेटण्याचे सोपस्कार पूर्ण झाल्यावर राजा स्वताची ओळख द्युमत्सेनाला करतो आणि त्याला सांगतो, त्याच्या भेटण्याचा उद्देश. अश्वपती सांगतो, कीं, त्याला त्याची कन्या सत्यवानाला दान करावयाची आहे. तो सांगतो, अरे राजा जरी तू आज राज्य हरवलेला असलास तरी तू एक राजघराण्याचाच आहेस व म्हणून मला माझी रुपगर्विता कन्या, जिचे नांव सावित्री आहे तुझ्या मुलास, सत्यवानाला देण्याचे ठरवले आहे कारण, माझ्या मुलीने त्याला तिचा पती म्हणून वरले आहे. द्युमत्सेन अश्वपतीला बोलतो, "माझे राज्य गेलेले आहे व आम्ही सध्या ह्या वनात असें रहात आहोत. येथे आम्ही संन्याशा सारखे जीवन व्यतीत करत आहोत. ते तिला मानवणारे नाही. ती सुखात वाढलेली आहे व त्या जीवनाचा त्याग करून ती येथे जंगलात येईल हे मला रास्त वाटत नाही. येथे असे रहाण्यात कांहीं सुख नसते हे कदाचित आपल्या मुलीला माहीत नाही. म्हणून ती माझ्या मुलाचा विचार करत असेल परंतु, जर खरोखरच असा विवाह झाला तर ती नंतर पस्तावेल. त्यासाठी ह्यावर पुन्हा आपण विचार करावा असें द्युमत्सेन अश्वपतीला सुचवतो.

अश्वपती त्याला सांगतो, आपले बोलणे व्यवहाराला धरून उत्तम आहे, परंतु, सुख व दुःख हे माणसाच्या जीवनात येत जात असतात. आपण जे सांगता ते समजून सुद्धा मी माझ्या कन्येच्या इच्छेसाठी माझी कन्या आपल्या मुलाला देऊ इच्छितो. आमच्याकडून हा विवाह निश्चित केला आहे कारण, त्याला नारदांची सुद्धा मान्यता आहे. कृपया माझी विनंती आपण अव्हेरू नये. आमच्या दृष्टीने आपण आमच्या योग्यतेचे अहात म्हणून असा

विवाह होणे योग्य आहे असे माझे ब्राह्मण सांगत आहेत. तरी तुम्ही हे नाते मान्य करावे. असा आग्रह झाल्यानंतर द्युमत्सेन त्या लग्नाला मान्यता देतो. त्यानंतर ते दोघे राजे त्यांच्या ब्राह्मणांना बोलावून सावित्री व सत्यवानाचे लग्न साधेपणे उरकतात. लग्न झाल्यावर सावित्री तिचे राजेशाही दागिने व वस्त्र काढते व लाल रंगाने रंगवलेली वल्कलं परिधान करते. त्यानंतर आपण आपल्या कन्येच्या मनासारखे केले ह्याचा आनंद त्याला झालेला असतो. सत्यवानसुद्धा अशी पत्नी मिळाली म्हणून समाधानी झालेला असतो. सावित्री तिच्या मनासारखे झाले म्हणून खूष असते. तिच्या सद्वर्तनाने ती सासरच्या लोकांचे मन जिंकते. ती तिच्या पतीचे मन सुद्धा जिंकते. अशारितीने ते सगळे त्या रानात मोठ्या आनंदाने रहात असतात. तसा कांहीं काळ जातो. ते सगळे जरी ठीक वाटत असले तरी नारदाचे बोल राजाला आणि सावित्रीला सतत आठवत असतात.

अशारितीने पतिव्रता महात्म्य पर्वाचा तिसरा भाग संपला.

# पतिव्रता महात्म्य पर्व
## भाग चौथा

मार्कंडेय ऋषी पुढे सांगत असतात, बराच काळ सुखात जातो परंतु, सत्यवानाची मृत्यूची वेळ समीप येत असते व त्यावर राजा अश्वपती आणि त्याची कन्या सावित्री ह्या दोघांचे लक्ष असते ती वेळ समीप आली. एक दिवस उगवतो जो चार दिवस आधीचा असतो सत्यवानाच्या मृत्यूच्या दिवसापासून. सावित्री त्रिरात्र व्रत सुरू करते. त्या नुसार ती कडक निराहार रात्रंदिवस उपवास धरते. राजा द्युमत्सेन अतिशय कष्टी झालेला असतो. सावित्री मात्र तिच्या त्रिरात्र व्रतात ठाम असते. तो आपल्या सावित्रीकडे जातो व तिला बोलतो, "मुली, हे व्रत फार अवघड आहे". ते ऐकून ती सावित्री त्याला सांगते, "तात आपण काळजी करू नका, मी ते करण्यास समर्थ आहे. मी हे व्रत करणार आहे त्या मागील उद्देश आपण जाणता. जर कोणी निर्धारपूर्वक काम करत असेल तर त्यात त्याला कांहीं अडचण वाटत नाही". द्युमत्सेन ते ऐकतो, तो तिला बोलतो "तुला जे श्रेयस्कर वाटते ते करत रहा. मी तुझ्या कार्यात विघ्न होणार नाही कारण माझी इच्छा आहे कीं तुला ह्या व्रतात यश प्राप्त हो". एवढे बोलून तो गप्प होतो. त्या निराहार निर्जळी उपवासामुळें तिची प्रकृती बिघडत होती. ती जास्त क्षीण झाली होती. तो दिवस उगवतो जेव्हां सत्यवान मरावयाला पाहिजे. सावित्री ती रात्र फारच कष्टात काढते. आता सूर्य उगवणार हे ती पहाते. तिचा त्रिरात्र उपवास चालू होता. ती तिचे सकाळचे आन्हीकादि विधी उरकते. त्यानंतर ती सूर्याला अर्घ्य देते. त्यानंतर ती तेथे उपस्थित असलेल्या ब्राह्मणांस आपल्या सासू सासर्यांना वंदन करून त्यांच्या पुढे उभी रहाते. तेथे असलेले सगळे आश्रमवासी सावित्रीच्या भाग्यासाठी प्रार्थना करत असतात. त्या प्रार्थनेत ते बोलत असतात कीं, सावित्री कधीही वैधव्य स्वीकारणार नाही. ते त्यांचे प्रार्थनेतील वचन सावित्री सारखी स्मरत तेथे उभी असते. सावित्री नारदांच्या त्या बोलण्याची आठवण करत तेथे एकचित्ताने पतीचे स्मरण करत असते. तिच्या तपस्येवर संतुष्ट झालेले तिचे सासू सासरे तिला एका जागी बसण्यास सांगतात. ते तिला सांत्वनाचे बोलतात कीं, "मुली तू तुझे कर्तव्य केले आहेस म्हणून आम्ही उभयता तुझ्यावर फार खूष आहोत. आता तुझे त्रिरात्र व्रत

संपण्याची वेळ आली आहे तरी तू ते सोडण्यासाठी तयार हो". सावित्री त्यांने सांगते कीं, "मी आजचा सूर्य मावळल्यावर ते व्रत सोडणार आहे. तो माझा निश्चय आहे व मी त्या प्रमाणेच करणार आहे".

मार्कंडेय पुढे सांगतात, ते ऐकल्यावर सत्यवान त्याच्या लाकूडफाटा जमा करण्याच्या कामाल त्याची कुर्हाड घेऊन जाण्याला निघतो. तो बाहेर जात आहे हे पाहून त्याची पत्नी त्याला बोलते, "आजच्या दिवशी आपण एकटे जाऊ नका. ती पुढे बोलते कीं, ती आज त्याच्याबरोबर येणार आहे". सत्यवान तिला सांगतो कीं, "आजपर्यंत ती कधी त्याच्या बरोबर जंगलात आली नव्हती. जंगलातील वाटा फार अवघड असतात. तुला त्यावरून चालणे जमणार नाही. आधीच तू उपवास केल्यामुळें अशक्त झाली आहेस, अशा परिस्थितीत तू कशी माझ्या सह त्या अरण्यात चालणार

सावित्री त्याला बोलते, "मला अशक्त वाटत नाही ह्या तीन दिवसाच्या लंघनाने, आणि मला आज तुमच्या बरोबर सर्वकाळ रहावयाचे आहे". सत्यवान तिला बोलतो, "जर तशी तुझी मर्जी आहे तर आपण एकत्रपणे अरण्यात जाऊ. परंतु, तू आपल्या आईबाबांची परवानगी घे. म्हणजे मला कोणताही दोष लागणार नाही". ते ऐकल्यावर सावित्री तिच्या सासू सासर्यांना नमस्कार करून बोलते, "माझा नवरा रानात फळें वगैरे खाद्य आणण्यासाठी जात आहे, त्याच्या बरोबर मला आज जावयाचे आहे. तरी त्यासाठी आपण परवानगी द्यावी. आज मला त्याच्या जवळ रहावेसे वाटते. लग्न झाल्यानंतर मी कधीच अशी मागणी आपल्याकडे केलेली नाही परंतु, आपण जाणता कीं, आजचा दिवस विशेष आहे". द्युमत्सेन बोलतो, "अशा कामात बायका जात नाहीत परंतु, तू कधीही अशी इच्छा लग्न झाल्यापासून केलेली नव्हतीस, तर आज तुझ्या इच्छेप्रमाणे तू त्याच्या बरोबर जाण्यास माझी परवानगी आहे". सासू सासर्यांची परवानगी घेऊन ते दोघे त्या अरण्यात लाकुटफाटा गोळा करण्यासाठी निघतात. वाटेत जे सृष्टी सौंदर्य दिसत असते त्याबद्दल सत्यवान तिच्याशी बोलत असतो परंतु, सावित्रीचे लक्ष असते फक्त त्याच्या विविध हालचालींकडे. तिला दुसरे कांहीं दिसत नव्हते. चेहर्यावर सावित्रीच्या स्मित होते पण आतून ती अतिशय व्यग्र झालेली होती. केव्हां काय होईल त्याच्या भ्रांतीने ती बेचैन झालेली होती. रानातील सौंदर्याचे वर्णन सत्यवान करत होता व ती फक्त त्यावर हं हं असें

करून साथ देत होती. तिचे सगळे लक्ष त्या क्षणाच्या प्रतिक्षेत होते ज्याचा उल्लेख नारदमुनींनी केला होता. सत्यवान कांहीं विचारत होता तर त्यालासुद्धा ती हं हं करुनच प्रतिसाद देत होती. ती सत्यवान आधीच मेला आहे असें गृहीत धरूनच वागत होती.

अशारितीने पतिव्रता महात्म्य पर्वाचा चौथा भाग संपला.

## पतिव्रता महात्म्य पर्व

## भाग पांचवा

मार्कंडेय पुढे सांगत असतात, ते दोघे उभयता वनात निघतात. सत्यवान झाडावर चढून फळं व फुलं काढू लागतो. सावित्री खाली उभी राहून ती झेलत होती. दोघे त्यात खूप मजेत होते. त्यांच्या गप्पा होत होत्या. ते होत असतांना सावित्रीच्या मनात मात्र त्या क्षणाची भिती डोकावत होती. जरा जास्तच मेहनत सत्यवानाने त्या दिवशी केली होती कीं काय, त्याचे अंग दुखू लागले. तो झाडांवरून खाली उतरला व जमिनीवर बसला. म्हणाला त्याचे सगळे अंग दुखत आहे व तो त्याच्या बायकोला सांगतो कीं, त्याला थोडी विश्रांती घ्यावी असें वाटते. त्याप्रमाणे तो तेथेच जमिनीवर निजला. सावित्रीने त्याचा माथा तिच्या मांडीवर घेतलं अशा परिस्थितीत तो राजपुत्र झोपी जाण्याचा प्रयत्न करतो. आता सावित्रीला खरी धाकधुक वाटू लागली होती. अशा वेळी तिला व सत्यवानाला एक विलक्षण तेज असलेला कोणी त्यांच्या कडे येत असलेला ती पहाते. तिला नारदांचे शब्द आठवू लागतात. तो त्यांच्याकडे येणारा इसम लाल कपडे घातलेला होता. त्याच्या अगावर कवड्यांचे दागिने होते व डोक्यावर मुकूट होता. त्याचे डोळे लाल होते, त्याच्या हातात एक फांस होता. तो फांस पुढे एकाद्या शस्त्रा सारखा धरून तो त्यांच्या नजिक येत होता. त्याचा वर्ण कृष्ण होता. चेहर्यावर कोणताही भाव नव्हता. साक्षात मृत्यू आपल्या कडे येत आहे हे ते दोघे ओळखतात. त्याच वेळी सत्यवान गाढ झोपी जातो. सावित्री मात्र त्या मृत्यूकडे निरखून पहात असते. ती समजते कीं, आता तिच्या तपस्येची खरी परिक्षा होणार आहे. तो इसम त्यांच्या जवळ आलेला असतांना सावित्री त्याला विचारते, "आपण कोण व हा फांस कां आहे आपल्या हातात अचानकपणे तो तिला भयंकर वाटू लागला. ती त्याला घाबरत घाबरत बोलते, "आपण कोणी देवता अहात कां तो इसम तिच्याकडे लक्ष देत नाही व सतत सत्यवानाकडे पहात असतो. जसे सावजाकडे शिकारी एकटक पहातो. त्यानंतर तो त्याचा फांस सत्यवानावर फेकतो. सावित्री त्याला सारखी विचारत असते कीं तो कोण परंतु, तो इसम तिच्याकडे दुर्लक्ष करत असतो. शेवटी सावित्रीसुद्धा इरेला पेटते

व सत्यवानाचे डोके खाली ठेवून ती उठते. जणू कोणी क्षत्रिय युद्धास निघाला आहे, असा तिचा अविभाव होता.

ती पहाते कीं, तिच्या पतीचा आत्मा त्याच्या लिंगदेहासह, जो एकाद्या आंगठ्या एवढा होता, त्या इसमाच्या ताब्यात गेला आहे. ती समजते कीं, तिचा नवरा मेलेला आहे व तो त्या यमाकडे गेला आहे. त्यानंतर तो सावित्रीला सांगतो कीं, "साधारणपणे, अशा कामासाठी माझे दूत मी पाठवत असतो परंतु, नारदानी मला स्वतः त्यासाठी जाण्यास सांगितले आहे म्हणून मी तुझ्या नवर्याला घेऊन जाण्यासाठी आलो आहे. आता बोल तुला काय विचारावयाचे आहे तो यम पुढे तिला बोलतो, "अहो सावित्री, तुझे पतीप्रेम उदात्त होते (वासनामय नाही) व तुझी तपस्या थोर होती म्हणून मी त्याला नेण्यासाठी नारदांच्या सांगण्यामुळें आलो आहे. तुझ्या पतिचे आयुष्य संपले असल्यामुळें त्याला आता जाणे क्रमप्राप्त होते. त्यावर कांहीं उपाय नसतो. प्राण्याचे अयुष्य संपले कीं त्याला मरावेच लागते. त्याकरतां त्यावर दुःख करण्यात कांहीं अर्थ नसतो. तरी तू आता तुझे जीवन जगण्यासाठी रहावे ह्या जगात.

सावित्री त्याला विचारतं "साधारणपणे तुमचे यमदूत ते काम करतात मग ह्यावेळी आपण स्वतः कां आलात

मार्कंडेय सांगत असतात, तिचा तो प्रश्न ऐकल्यावर तो पितरांचा स्वामी तिला सांगतो, "तुझा पती महायोगी होता, त्याचे कांहीं अधिकार असतात त्या न्यायाने मला त्याचा मान राखण्यासाठी स्वतः यावे लागत आहे". एवढे बोलून तो मृत्यूदेव सत्यवानाचा आत्मा व लिंगदेह घेऊन निघाला. सावित्रा पहात होती कीं, तिचा पती निष्प्राण होऊन पडला आहे. यम त्याला घेऊन दक्षिण दिशेने जाऊ लागतो. त्या बरोबर सावित्रीसुद्धा त्याच्या मागोमाग चालू लागते. थोड्या काळांने यम मागे वळून पहातो कीं सावित्री त्यांच्या मागून येत आहे. ते पाहून यम थांबतो व तिला विचारतो, "कृपया सावित्री, आता हे माझ्या बरोबर येणे थांबव", ती त्याला उत्तर देते कीं, "मी माझ्या पतीची पाठ राखीण आहे म्हणून मला त्याच्या बरोबर येणे क्रमप्राप्त आहे. कारण हा नियम आहे. नवर्या बरोबर जाणे हे पत्नीचे कर्तव्य असते त्या प्रमाणे मी करत आहे". माझ्या तपस्येमुळें, माझ्या वडीलधार्यां बद्दलच्या आदर भावामुळें, आणि माझ्या पतीबद्दलच्या आदरामुळें पातिव्रत्याचे पालन

करण्यासाठी मी माझ्या पतीबरोबर जात आहे, ना कीं, आपल्या बरोबर. जेथे माझा पती तेथे मी असणार आहे. तो नियम आहे. आम्ही दोघे एकरुप झालो आहोत". शहाण्या लोकांनी सांगितले आहे कीं, जर कोणी सात पावले आपल्या बरोबर चालले तर तो तुमचा मित्र होतो. म्हणून लग्नात सप्तपदी सांगितली आहे, तसेंच मी आता पावेतो त्याहूनही जास्त पावले टाकली आहेत म्हणून मी तुमची मित्र झाली आहे, त्या अनुषांगाने मी तुमच्याशी कांहीं बोलू शकतेच. मला सांगा, ज्यांचे भोगेंद्रियांवर संयम आहेत ते चार आश्रमातून (ब्रह्मचर्याश्रम, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम आणि सन्यासाश्रम) जातांना, जे आपल्या कडे धार्मिक कार्य समजले जाते, सर्व ज्ञान प्राप्त करतात ते खरे आहे कां तसे मानले आहे म्हणून शहाण्यांनी ते आश्रम पूर्ण करण्याचे बंधन प्रत्येकांवर घातले आहेत. असेसुद्धा सांगतात कीं, त्यातील जरी एका आश्रमात यशस्वी झालात तरी तुमचे श्रेय मोठे ठरते. तिचे ते कोड्यात टाकणारे विचार ऐकल्यावर यम तिला परत फिरावयाला सांगतो परंतु, ती हटत नाही. तेव्हां यमाचा इलाज रहात नाही व तो तिला बोलतो, "तुला काय आशिर्वाद पाहिजे तो मांग पण सत्यवानाला मांगू नकोस". ते ऐकल्यावर सावित्री त्याच्याकडे वर मांगते, ती बोलते, "माझे सासरे त्यांची दृष्टी गेल्यामुळें त्यांचे राज्यसुद्धा गेले तरी त्यांना त्यांची दृष्टी पुन्हा प्राप्त हो असे करा". त्यावर यम तिला तो आशिर्वाद बहाल करतो आणि सांगतो कीं, आता तरी ती मागे जाईल. परंतु, थोडे पुढे गेल्यावर यमाला समजते कीं, सावित्री अजुनही त्यांच्या मागे मागे येत आहे. तो तिला सांगतो असे त्याच्या मागोमाग येणे तापदायक होईल तिला, तरी ती त्यांच्या मागून जातच असते. सावित्री यमाला बोलते, "आपल्या पतीच्या मागून चालतांना पत्नीला कधीच कांहीं त्रास होत नसतो. जे माझ्या पतीचे प्राक्तन तेच माझे प्राक्तन असें सांगितले आहे पतिव्रता स्त्रीसाठी. तो जेथे जाणार तेथे मला जाणे क्रमप्राप्त ठरते. जेथे माझ्या पतीला तुम्ही नेणार तेथे मला जावेच लागणार आहे. असें सांगतात, कीं, एका पवित्र व्यक्तीसह एकदा संभाषण झाले तर ते मोठे हितकारक असते. त्या संबंधातून जी मैत्रा उत्पन्न होते ती कितीतरी श्रेष्ठ असते. सात्त्विक लोकांशी संपर्क कधीच व्यर्थ जात नाही. म्हणून प्रत्येक शहाणा अशा सात्त्विक लोकांबरोबर साथ धरून रहात असतो". यम ते तिचे बोलणे ऐकून तिला सांगतो, "तुझे हे बोलणे फारच योग्य आहे. सात्त्विकांच्या सहवासात रहाणेच जीवनाचे शहाणपण

आहे. तुझ्या ह्या बोलण्यावर मी खूष झालो आहे म्हणून मी तुला आणखीन एक आशिर्वाद देऊ इच्छितो. बोल, तुला सत्यवान सोडून काय पाहिजे त्याबरोबर सावित्री सांगते, "ती मांगते कीं,तिच्या सासर्याचे राज्य गेले आहे ते त्याला पुन्हा मिळावे". यम ते तिला देतो, आणि सांगतो कीं, आतातरी तिने त्यांचा पाठलाग सोडावा. असें बोलून तो सत्यवानाला घेऊन पुढे जात असतो. थोड्या वेळांने तो पहातो ते सावित्री अजून त्यांच्या मागेच येत आहे. यम तिला विचारतो, "आता तुला काय पाहिजे सावित्री त्याला बोलते, "आपण सगळे प्राणी आपल्या अधिकाराने नियंत्रित केले आहेत. त्यामुळें आपण त्यांना अशारितेने घेऊन जात असतां. त्यात आपला कांही स्वार्थ नसतो असें मला वाटते. कदाचित म्हणून लोक आपल्याला यम असें बोलतात. मी आता काय सांगते ते जरा ऐकाल तर बरे होईल. चांगुलपणाचा अर्थ कोणालाही दुःख न देणे. मग ते कृतीने असेल अथवा विचारांने असेल अथवा बोलण्याने असेल. दुसरा अर्थ चांगुलपणाचा असा सांगतात कीं, इतरांबद्दल सद्भाव बाळगणे. त्याला कांहीं ममता म्हणतात तर कांही त्याला प्रेम म्हणतात तर कांहीं त्याला भूतदया असें म्हणतात. परंतु, जे ह्या जगात आहे ते असें माझ्या पतिसारखे आहे. पुरूषांत ममता, प्रेम नसते, शत्रूला दया दाखवण्याची तर गोष्टच नको. परंतु, जर चांगुलपणा असेल तर तो शत्रूलासुद्धा दया दाखवतो". तीचे ते बोलणे ऐकल्यावर यम तिला बोलतो कीं, तिचे ते म्हणणे तहानलेल्याला पाणी पाजण्यासारखे वाटते. म्हणून तो तिच्यावर संतुष्ट होतो व बोलतो, तुला आणखीन एक आशिर्वाद मी देऊ इच्छितो, बोल तुला ह्यावेळी काय पाहिजे पण सत्यवान सोडून कांहीं मांग. सावित्रा मांगते, माझ्या पित्याला पुत्र नाहीत. त्यांनां एक शंभर पुत्र व्हावेत असें मला वाटते तर ते तुमच्या आशिर्वादाने झाले तर बरे होईल. यम ते मांगणे मान्य करतो. नंतर तिला पुन्हा सांगतो कीं, ह्यानंतर तरी ती त्यांचा पाठलाग करणे बंद करील. तो पुढे जात असतांना एकदा पाठी वळून पहातो ते सावित्री त्याच्या मागून येतच असते. यम पुन्हा तिला विचारतो आता तिला काय पाहिजे? ती सांगते, "मला माझ्या पतीच्या बाजूला रहावयाचे आहे. मला कांहीं फरक पडत नाही किती चालावे लागेल. मी कितीही चालण्यास तयार आहे. मी काय बोलते ते ऐकून मला सांगा कीं, ते योग्य आहे कां "आपण विवस्वात देवाचे मुलगा अहात. म्हणून आपल्याला वैवस्वात असें नांव जाणकारांनी दिले आहे. आपण सगळ्यांना सारखा न्याय देता म्हणून आपल्याला

लोक न्यायदेवता असें मानतात. आपण कधी कोणावर त्या बाहेर जाऊन कृपा करत नाही. म्हणून सगळे चांगुलपणाने वागणेच श्रेयस्कर समजतात. चांगुलपणा व भूतदया हे न्यायाचे दोन खांबे आहेत". ते सावित्रीचे बोलणे ऐकून यमदेव संतुष्ट होतात व तिला बोलतात, तू जे हे बोललीस तसे आजवर कोणी माझ्या कौतुकाचे बोललेले नाही. म्हणून मी तुला आणखीन एक आशिर्वाद देणार आहे. परंतु, सत्यवानाची मागणी करू नकोस".

सावित्रा यमाकडे वर मांगते कीं, "माझ्या सासर्याचा वंश सत्यवानाच्या वीर्याने व माझ्या बिजाने वाढावा असा वर आपण मला द्यावा". यम तिला वर देतो कीं, तिच्या इच्छेनुसार तिच्या सासर्याचा वंश वाढत राहील. नंतर यम तिला बोलतो आता माझी पिच्छा सोड. त्यावर सावित्री त्याला सांगते, "अहो यमदेव, आपण मला जो आशिर्वाद दिला आहे त्यासाठी आपल्याला माझा पती माझ्याकडे सोडावा लागेल. तो आशिर्वाद पूर्ण होण्यासाठी ते आवश्यक आहे. पुण्यवंताने नेहमी पुण्यवंतांबरोबर रहावे, चांगुलपणाने चांगुलपणा वाढवावा. सत्याच्या प्रगतीसाठी चांगुलपणा व भूतदया प्रधान असतात. सगळी व्रतस्थतेची योजना तेवढ्याच साठी असते. जर व्रतस्थता, तपस्या ह्यांतून चांगुलपणा वाढणार नसेल तर ते सगळे व्यर्थ असते. ही सृष्टी अविरत चालावी ह्यासाठी चांगुलपणा व भूतदया हेंच प्रमुख स्रोत असतात असे जाणकार सांगतात. विश्वाचा कारभार ह्या सत्याच्या तत्त्वावर चालतो. ज्यांच्यात हे दोन गुण नाहीत ते असत्य म्हणून त्यांना असुर, राक्षस अशी नांव आहेत". तिच्या त्या मधूर वाणीमुळें यम संतुष्ट होतो व बोलतो, मी तुला आणखीन एक वर देऊ इच्छितो". ते ऐकल्यावर सावित्री यमाला लवून नमस्कार करते व बोलते. "अहो वरदाई, आपण मला आधीच हवा असलेला वर दिला आहे. तरी तो वर पूर्ण होण्यासाठी आपल्याला माझा सत्यवान जीवंत करावा लागेल. त्याशिवाय आपला आधीचा वर कसा सिद्ध होईल ते पहा".

मार्कंडेय पुढे सांगतात, यम त्याच्या फाशातून सत्यवानाची सुटका करतो आणि मोठ्या मनाने तो सावित्रीला बोलतो, तुझा पती तुझ्या पावित्र्यामुळें आज मरणातून मुक्त झाला आहे. त्याला तू तुझ्याघरी घेऊन जा व सुखाने संसार करा. तो सदैव निरोगी व समाधानी जीवनात तुझ्या बरोबर राहू शकेल. तुम्ही चारशे वर्षे रहाल. तुम्ही सगळे यज्ञ यथास्थितपणे कराल. तुमच्या नंतरच्या पिढीचे लोक साम्राज्यावर राज्य करतील. तुझ्या

पित्याची मुलं सुद्धा मोठे शूरवीर क्षत्रिय म्हणून नावाजतील". अशारितीने सावित्रीला आशिर्वाद देऊन तो वैवस्वात आपल्या ठिकाणी निघून गेला.

यम अशारितीने गेल्यावर ती पहाते कीं, सत्यवानाचा आत्मा व लिंगदेह लांब कोठेतरी झपाट्याने आकाशातून जातात. ती त्यांच्या मागे धावत जाते व जेथे सत्यवान जमिनीवर पडलेला होता तेथे ती येते.

ती पहाते कीं, सत्यवानाचा चेहरा पुन्हा सचेतन झाल्यासारखा तेजस्वी झाला होता. सावित्री त्याच्या जवळ जाते व त्याचे शिर आपल्या मांडीवर घेते. थोड्या वेळांनी गाढ निद्रेतून उठावे अशाप्रकारे सत्यवान आळोखे पिळोखे देत जागा झाल्याचे ती पहाते. तिचा आनंद गगनात मावत नाही. सत्यवान तिला विचारतो कीं, तो जरा जास्तच झोपला होता का? सावित्री कांहीं न बोलता फक्त त्याच्या देखण्या मुद्रेकडे एकटक पहात असते.

सत्यवान काय घडले त्याचे भान नसल्यामुळे तिला बोलतो कीं, तिने त्याला उठवले कां नाही? तो पुन्हा विचारतो, तो लाल कपड्यातील माणूस कोण होता, तो कोठे गेला, तो येत असतानाच मला गाढ झोप लागली. असें विविध प्रश्न तो सवीत्रीला विचारत रहातो.

सावित्री सत्यवानाला मधल्या काळात जे घडले ते सांगते व म्हणते तीं, त्याचा मृत्यू टळला आहे. ते ऐकून सत्यवान सावित्रीचे पाय धरतो. सत्यवान तिला म्हणतो, सावित्री, जे शास्त्रात म्हणतात ते खरे आहे कीं, पतिव्रतेची पुजा तिच्या पतीने प्रथम करावयाची असते. म्हणून मी तुझी पुजा करणार आहे. सावित्री पहाते कीं ती काळी रात्र संपलेली आहे. ते दोघे घरी जाण्यासाठी निघतात.

मार्कंडेय सांगत असतात, सत्यवान झोपेतून उठल्यासारखा बसतो "तिला म्हणतो, चल माझी राणी, आपण पुन्हा फळं व फुलं गोळा करू. आता मला फार बरे वाटते. ती कळ मला वाटली ती फारच भयंकर होती. मला ती सहन करणे अशक्य होते म्हणून मी पडून होतो. मला काय स्वप्न पडले आहे कीं काय असे वाटते आहे". सावित्री त्याला सांगते, "आता रात्र होण्यास आली आहे. आता आपल्याला घरी गेले पाहिजे. ह्या अरण्यात रात्रीच्या प्रहरी हिंस्त्र प्राणी वावरत असतात. सूर्य मावळून बराच समय झाला आहे. त्या भयंकर प्राण्याचे आता सर्वत्र संचार सुरू होतील. त्यामुळें माझे हृदय थरकापत आहे. कोल्हेकुई पूर्वेकडून आणि दक्षिणेकडून सुरू झाली आहे". सत्यवान तिला बोलतो,

"रात्रीच्या अधारामुळें त्या हिंस्त्र पशुंच्या स्वरुपाला विशेष भयंकरपणा प्राप्त होतो. अंधारामुळें वाट शोधणे विशेष अवघड होते. म्हणून आपण आता घरी जाऊ शकणार नाही". सावित्री त्याला बोलते, दिवसा एक आग लागली होती ह्या रानात त्यामुळे कांही जळकी लाकडं आहेत त्यांच्या मदतीने मी आजुबाजूचा पालापाचेळा गोळा करते व आपण शेकोटी पेटवू". ती सत्वानाला बोलते, तू आताच बरा झाला आहेस म्हणून जास्त कष्ट करू नकोस, मी सगळे करते. अशारितीने त्यांच्यामध्ये संभाषण होत असते. सत्यवान तिला सांगतो, "आता माझ्या मस्तकातील वेदना शमली आहे. आता काळजी करू नकोस, रात्री वाट शोधणे सोपे नसते म्हणून आपण रात्रभर येथेच थांबू व सकाळी उजेड झाला कीं निघू. तुझ्या कृपेमुळें मी आजचा दिवस पहात आहे. आपण आपल्या मातापित्यांना भेटू शकतो ते केवळ तुझ्या तपस्येमुळें". तो पुढे बोलतो, "आजपर्यंत मी कधीही इतका उशीर केलेला नाही. पण आजचा प्रसंगच विरळा होता. मला जरासा उशीर झाला कीं, माझे आईबाबा चिंता करत बसतात. ते आजसुद्धा तशी काळजी करत असतील कारण आज तूसुद्धा माझ्याबरोबर आहेस. ते सगळे त्यांच्या शेजार्यांना सांगून आपला शोध घेत असतील. जेव्हां मला उशीर होत असें, ते मला फार ओरडत असतं. मला समजत नाही आज त्यांची काय अवस्था झाली असेल. ते मोठ्या दुःखात पडले असतील. एकदा असाच मला उशीर झाला होता तेव्हां ते मला बोलले जर तू असा उशीर करशील तर आम्ही जीव देऊ. माझे पिता अंध असल्यामुळें जास्तच चिंता करतात. ते मला सांगतात, बाळा तूंच आमचा आधार आहेस, तू गेलास तर आम्ही काय करणार ते बोलतात तू आमच्या चितेला अग्नी देण्यासाठी असला पाहिजेस. मला अशी कशी झोप लागली समजत नाही. असें बोलून तो सत्यवान स्वताला दोष देत असतो. जर माझ्या न जाण्याने त्यांना त्यांचा जीव नष्ट केला तर मी स्वताला माफ करू शकणार नाही. मला खात्री आहे कीं आतापर्यंत ते सगळे आपला शोध करण्यासाठी निघाले असतील. ते त्या आश्रमातील सगळ्यांना विचारत असतील कीं त्यांनी मला पाहीले आहे कां ते माझी जबाबदारी आहेत. अशारितीने सत्यवान त्याची खंत सावित्रीला सांगत होता व ती ते ऐकत होती.

मार्कंडेय पुढे सांगतात, ते बोलून त्याचे समाधान झाले नाही म्हणून किं काय, सत्यवान मोठ्याने रडू लागला. सावित्री त्याचे अश्रू पुसते आणि म्हणते, "जर माझी तपस्या खरी असेल, माझे दान खरे असेल, मी केलेले यज्ञ खरे असतील, तर तुझ्या पित्याला दृष्टी प्राप्त होईल, त्यांच्या सगळ्या चिंता संपलेल्या असतील. मी कधी गंमतीतसुद्धा खोटे बोलले नाही. तू तुझ्या पितरांची काळजी करणे बंद कर". सत्यवान तिला सांगतो, "माझ्या मातापित्यांना जेव्हां दृष्टी येईल तेव्हां सगळे ठीक होईल. म्हणून चल माझ्या बायको, आपण आधी घरी जाऊ या. त्यांना कांही झाले तर मी जगू शकणार नाही". त्यानंतर ते दोघे घरी जाण्यासाठी त्या शेकोटीपासून एक मशाल तयार करतात. त्या मशालीच्या मदतीने चालू लागतात. ती त्याला सांगते, उद्या मी पुन्हा येणार आहे तुझ्या बरोबर व मी ती वजनदार कुर्हाड पेलणार आहे. तिच्या मदतीने सत्यवान उठतो व बाजूला पहातो. त्याला त्याची पिशवी दिसते, ती तो घेतो. ते दोघे एकमेकांच्या आधाराने त्या अरण्यातून वाट काढत निघतात. सत्यवान तिला बोलतो, "मला सवय आहे ह्या वाटेची त्यामुळें आपल्याला घरी जाण्यास विशेष त्रास होणार नाही. आता आपण ज्या वाटेने आलो त्यांच वाटेवरून परत जात आहोत. आता आपला रस्ता समजला आहे, आता काळजी करण्याचे कारण नाही. तो पहा, तेथे पळसाचा वृक्ष आहे. तेथे दोन वाटा फुटतात. आपल्याला उत्तरेकडच्या वाटेने जावयाचे आहे". त्यानंतर तो तिला सांगतो, "आता मला बरे वाटते, माझी शक्ती परत आली आहे. मी माझ्या मातापित्यांना पहाण्यासाठी उतावीळ आहे". त्यानंतर त्याना त्यांचा आश्रम दिसतो व ते त्याकडे जाऊ लागतात.

अशारितीने पतिव्रता महात्म्य पर्वाचा पांचवा भाग संपला.

# पतिव्रता महात्म्य पर्व

## भाग सहावा

मार्कंडेय पुढे सांगतात, त्या सुमारास द्युमत्सेनाला दृष्टी मिळाल्यामुळें तो सगळीकडे त्यांचा मुलगा व सून ह्यांचा शोध घेण्यास निघाला. त्याच्या बरोबर त्याची भार्या सैव्या सुद्धा होती. त्याच्या आश्रमाच्या परिसरात व इतरत्र ते सगळीकडे त्यांचा शोध करत फिरत रहातात. कोठे त्यांचा आवाज येतो कां ते पहात व अधून मधून सत्यवानाला हांका मारत ते दोघे सगळा परिसर फिरत होते. अंधारात फिरत असतांना त्यांच्या पायाला भेगा पडतात, त्यांचे पाय रक्ताने माखतात, त्यांच्या पायात कांटे घुसतात पण त्याची त्यांना पर्वा नसते. त्यांच्या तशा शोधामुळें त्या वस्तीतील ब्राह्मण मंडळी सुद्धा त्यांना मदत करण्यासाठी बाहेर येतात. ते त्या जोडप्याला मनाचा आधार देण्याचा प्रयत्न करत असतात. त्या वृद्ध जोडप्याला समजावत ते ब्राह्मण त्यांच्या घरी नेतात व सांगतात कीं, ते दोघे आता येतच असतील. तेथे ते वैरागी त्यांच्यात त्या प्रकारच्या आधी घडून गेलेल्या घटनांबद्दल बोलू लागतात. जरी त्यांचे सांत्वन ते करत होते त्या मायबापाच्या मनात त्यांच्या मुलाबद्दलची चिंता कांही केल्या कमी होत नसते. त्या दुःखात ते दोघे त्यांच्या मुलाच्या व सुनेच्या आठवणीने रडू लागतात. "अरे मुलांनो, तुम्ही कोठे अहात ते त्यांचे शोक करणे पाहून तेथे असलेला एक ब्राह्मण, सुवर्चस, त्यांना बोलतो, त्यांच्या तपस्यापूर्ण जीवनामुळें व सावित्रीच्या साधनेमुळें त्यां दोघानी जे सामर्थ्य प्राप्त केले आहे त्यामुळें त्यांचे कांही बरेवाईट होऊ शकेल असें संभवत नाही. ते निश्चितच सुखरुप आहेत. तेथे असलेले गौतम बोलतात, मी सगळ्या वेदांचा अभ्यास केला आहे त्यांच्या वेदांगांचासुद्धा माझा चांगला अभ्यास आहे. माझे वैराग्यसुद्धा उत्तम आहे. माझे ब्रह्मचर्य उत्तम आहे, मी अग्नीदेवाला प्रसन्न केले आहे, माझ्या वरिष्ठांची मी सेवा उत्तम केली आहे, माझे सत्त्वशिल आणि व्रतस्थ जगणे त्यामुळें मी कांहीं काळ फक्त हवा खाऊन राहू शकतो. अशा गुणांमुळें मला सभोवार होणार्या घटनांचा अदाज बिनचूक करता येतो. त्याप्रमाणें, ते उभयता सुरक्षित आहेत व त्यांच्या वाटेवर आहेत. त्यांचे ते ऐकल्यावर गौतमाचा शिष्य सांगतो कीं, त्याच्या गुरूने जे सांगितले ते कधीही खोटे झालेले नाही. म्हणून सत्यवान व सावित्री दोघेही

सुरक्षित आहेत. तुझ्या सावित्रीच्या भाग्यात वैधव्य योग नाही हे मी खात्रीपूर्वकपणे सांगू शकतो. भारद्वाज सांगतात, त्या जोडप्याच्या संयमित जीवन पद्धतीकडे पहाता असें म्हणणे धाष्ट्याचे ठरेल कीं, सत्यवान आणि सावित्री कोठेही असुरक्षित असू शकतील. दल्भ्य ऋषी बोलतात, ज्या अर्थी आपल्याला दृष्टी प्राप्त झाली आहे, त्याअर्थी सावित्रीचा ह्या सगळ्या घटनांशी संबंध आहे व म्हणून तुमची दोनही लेकर शाबूत आहेत हे निश्चित. अपस्थंभ बोलतात, ज्याप्रकारे पक्षी आवाज करत आहेत, मला नाही वाटत कीं कांही अशुभ घडले आहे. त्यावरून मला वाटते कीं कांहीं काळजी करण्यासारखे नाही. ते उभयता उद्या सकाळ पर्यंत आश्रमात परततील हे निश्चित. धौम्य बोलतात, "तुझ्या मुलाच्या अंगावर दीर्घायुषी असल्याची चिन्ह आहेत मग कशाला काळजी करता"?
मार्कंडेय पुढे सांगतात, त्या सगळ्या ज्ञानी ऋषींच्या आश्वासनांमुळें द्युमत्सेनाला थोडा धीर येतो व तो शांत होतो. अशारितीने ते बोलत असतांना त्यांना सत्यवान आणि सावित्री समोरून येतांना दिसतात. त्यांना आलेले पाहून सगळे आनंदी होतात. त्यांना बघितल्यावर सावित्रीला समजते कीं तिच्या सासर्याची दृष्टी पूर्ववत झाली आहे. तेथे जमलेले ब्राह्मण त्यांना बोलतात, अहो राजे, आपल्याला आपला मुलगा, सून आणि गेलेली दृष्टी असें सगळे प्राप्त झाले आहे हे आपले भाग्य लवकरच उजळणार ह्याची लक्षणं आहेत असें वाटते. आपला उदय काळ समीप आला आहे. त्यानंतर सगळे आनंदात असतांना तेथे असलेल्या पवित्र अग्नीपुढे बसतात. त्यांच्या बरोबर द्युमत्सेन, त्याची पत्नी सैव्या, त्यांचा मुलगा सत्यवान आणि सून सावित्री असे सगळे तेथे बसतात.
मार्कंडेय युधिष्ठीराला सांगतात, ते जमलेले सगळे लोक सत्यवानाला विचारतात, "त्यांना इतका उशीर कां झाला? आपल्याला कांहीं विघ्न झालें कां? कोणी अडवले कां सत्यवान आपल्या पित्याच्या परवानगीने सांगू लागतो, "मी सावित्रीबरोबर वनात फळं आणि फुलं व जळणासाठी लाकूडफाटा गोळा करण्यासाठी सकाळी गेलो होतो. ते करत असतांना मला अचानकपणे शरीरात वेदना होऊ लागल्या व मी काम थांबवून झाडावरून खाली उतरलो व झोपी गेलो, मला इतकेच आठवते. मी अशाप्रकारे कधीच इतका काळ झोपलेला नाही. त्यामुळे जेव्हां मी जागा झालो तेव्हां अंधार पडावयाला सुरूवात झाली होती. सावित्री माझ्या बरोबर होती व माझे डोके तिच्या मांडीवर होते जेव्हां मला जाग आली, एवढे मला

आठवते. जाग आली तेव्हां मला फार अशक्त असल्याचे जाणवत होते. त्यामुळें आम्हाला उशीर झाला. माझी गाढ निद्रा हेच ह्यामागील कारण आहे. मला आपली फार काळजी वाटत होती म्हणून त्या अंधारात आम्ही दोघे एक मशाल घेऊन घरी परतण्यास निघालो". गौतम सत्यवानाला विचारतात, "तुझ्या पित्याची दृष्टी अशी अचानक कशी पूर्ववत झाली ते तुला माहीत आहे कां तो नाही असें सांगतो, तेव्हां गौतम ऋषी सावित्रीला त्याबद्दल बोलण्यास सांगतात. ते तिला बोलतात "मुली, मला तुझ्याकडून ते सगळे ऐकावयाला आवडेल. तुला चांगुलपणा (मला समाजाने कसे वागवावे असें मला वाटते, तसेंच मी समाजातील लोकाशी वागणे ह्याला **चांगुलपणा** असें म्हणतात. ह्यात सत्पात्र व अपात्र ह्याचा विचार करावा लागतो.) भूतदया ह्यांचे दैविक नाते चांगलेच ज्ञात आहे तेव्हां तू सांग पुढे काय झाले, जसा तुझा नवरा झोपी गेला". ते पुढे तिला सांगतात, "मला चांगलेच माहीत आहे की, तू साक्षात सावित्री देवी आहेस. तू सगळे जाणतेस तरी ते सगळे आम्हाला सांग कीं, ते कसे झाले, आणि आणखीन काय काय झाले तेसुद्धा सांग. अशा गोष्टी गुप्त ठेवण्यात कांहीं अर्थ नसतो". सावित्री सावरून बसते व बोलते, "आपण जे बोलता ते खरे आहे. आपल्या सांगण्याप्रमाणे मी सगळे सांगते. सगळे खरे खरे जसे झाले तसे सांगते". असें बोलून ती सांगू लागते.

एकदा माझ्या बाबांच्याकडे नारदमुनी आले होते. त्यानी माझ्या पतिच्या निधनाचे भाकित सांगितले होते. जेव्हां मी त्यांना सांगितले कीं मी सत्यवनाशीच माझा विवाह करू देईन. आमच्या लग्नानंतर एक वर्षात तो मरेल असें नारदांनी माझ्या वडलांना सांगितले होते. तरी ते म्हणाले होते कीं सावित्रीचा विवाह सत्यवानाशीच होणार आहे व आमच्या लग्नाला त्यांनी शुभेच्छा सुद्धा दिल्या होत्या. त्याप्रमाणे आमचा विवाह झाला. मला माहित होते कीं, सत्यवानाचे आयुष्य अल्प आहे. म्हणून मी व्रत वैकल्ये करत होती त्याचे आयुष्य वाढावे ह्यासाठी त्रिरात्र व्रतसुद्धा केले होते. शेवटी ती वेळ आली कीं, सत्यवानाचा काळ त्याला नेणार. त्या दिवशी मी सत्यवानाला सांगितले कीं, मी त्याच्या बरोबर वनात फळं फुलं व लाकुडफाटा आण्यासाठी येणार आहे व त्याप्रमाणे आम्ही दोघे अरण्यात गेलो. तेथे सत्यवान झाडावर चढला होता फळं काढण्यासाठी व त्याच्या शरीराला अचानकपणे कळा मारू लागल्या म्हणून तो खाली उतरला व जमिनीवर निजला. मला समजत होते कीं,

त्याचा काळ आला आहे पण मी धीर न सोडता त्याचे डोके माझ्या मांडीवर घेऊन बसून राहीली. सत्यवान अजून जागा होता त्याने एक माणूस लांबून येतांना पाहिला. तो माणून मी सुद्धा पहात होते. तो साक्षात यम होता. त्याने सत्यवानाला त्याच्या फांशात पकडले व तो माझ्या नवर्याला घेऊन जाऊ लागला. तशी मी सुद्धा उठले व त्यांच्या पाठोपाठ जाऊ लागले. यमाला माझे त्यांच्या मागून जाणे रुचले नाही. तो मला म्हणाला, "सत्यवान त्याच्या पितरांकडे जात आहे. तू तेथेच थांब, तुझी वेळ आलेली नाही. परंतु मी त्यांचा पाठलाग करत होते. यमात व माझ्या बाचाबाची होऊ लागली. मी त्यांना म्हणाले कीं, मी माझ्या पतिच्याबरोबर रहाणे हे माझे, एका पतिव्रतेचे, कर्तव्य आहे व कोणीही मला त्या पासून थांबवू शकणार नाही. त्यानंतर मी यमाची स्तुती करू लागली. असे होत होते व प्रत्येक वेळी मी त्याच्या कौतुकाचे बोलत असें तो मृत्यूदेव मला एक आशिर्वाद देत होता. त्यात मी कांहीं गोष्टी मागितल्या त्यात पहिली होती कीं, माझ्या सासर्यांना त्यांची दृष्टी पूर्ववत प्राप्त व्हावी. तो आशिर्वाद त्यांने दिला. त्यानंतर मी दुसरा आशिर्वाद मागितला कीं माझ्या सासर्याचे गेलेले वैभव व राज्य त्याना पुन्हा प्राप्त व्हावे, त्यानंतर तिसरा आशिर्वाद मला यमाने दिला कीं, माझ्या पित्याला शंभर पुत्र व्हावेत व तोसुद्धा त्यानी मला दिला तरी मी त्यांच्या मागून जाण्याचे थांबवत नव्हती कारण, माझा पती त्याच्या कैदेत होता व त्याला सोडवणे माझे एक पत्नी म्हणून कर्तव्य होते. त्यानंतर त्याने मला चौथा आशिर्वाद दिला कीं, माझ्या नवर्याचा वंश वाढेल. त्यानंतर तो पांचवा आशिर्वाद काय पाहिजे म्हणून मला विचारतो तेव्हां मी त्याला बोलले कीं, जर त्याने माझा पती मुक्त केला नाही तर त्याचा चौथा आशिर्वाद खरा होणार नाही. तेव्हां त्यांने माझ्या पतीचा आत्मा व लिंगदेह मुक्त केले. यमदेव माझ्यावर संतुष्ट झालेले होते. त्यांनी मला अनेक शुभेच्छा दिल्या व सत्यवानाला सोडून दिले. तो सत्यवानाचा आत्मा हवेतून परत जात असतांना मी त्याच्या मागे परत त्या ठिकाणी धावत आले जेथे सत्यवानाचा देह होता. मी पाहिले कीं, सत्यवान सावकाशपणे जागृत होत आहे. ह्या सगळ्या गोष्टींना बराच वेळ लागला. त्यामुळें आम्हाला उशीर झाला". सावित्रीने सगळे सांगून टाकले. ते ऋषी बोलतात, "पहा कसे एका स्त्रीचे व्रतस्थ जीवन व तपस्या तिच्या कुळांचा उद्धार करत असते. शापामुळे दुःखात पडलेल्या

कुळाला फक्त एक स्त्रीच वाचवू शकते". मार्कंडेय पुढे सांगतात, अशारितीने सगळे समजल्यामुळें समाधानात ते सगळे आपापल्या ठिकाणी निघून जातात.
अशारितीने पतिव्रता महात्म्य पर्वाचा सहावा भाग संपला.

# पतिव्रता महात्म्य पर्व (संपले)

## भाग सातवा

मार्कंडेय सांगत असतात, ती रात्र तशीच गेली. दुसर्या दिवशी सगळे ब्राह्मण नित्याची सकाळचे विधी उरकून एकत्र बसले होते. ते अजून सावित्रीच्या धाडसाचे कौतुक करत होते. साक्षात यमाबरोबर ती बोलत होती व तिला त्याचे भय वाटले नाही हा सगळ्यांचा चर्चेचा विषय होता. द्युमत्सेनाचे दृष्टी येणे व सत्यवानाचे मरणाच्या दाढेतून सहीसलामत बाहेर येणे ह्या गोष्टींचे त्यांना कौतुक व त्याही पेक्षा जास्त आश्चर्य वाटत होते. अशा गोष्टी होऊ शकतात त्याचे त्या सगळ्या जाणकार ब्राह्मणांना राहून राहून नवल वाटत होते. सावित्री त्यांच्या बोलण्याचा केंद्र बिंदू होती. ते होत असतांना व द्युमत्सेन त्यांच्यात बसलेला असतांना कांही शल्व लोक तेथे येतात. ते सांगतात कीं, द्युमत्सेनाचा विरोधक कालच त्याच्याच साथीदाराकडून मारला गेला आहे व आता द्युमत्सेनाचा कोणीही विरोधक उरलेला नाही. ते सांगतात कीं, त्यांना द्युमत्सेनालाच पुन्हा गादीवर बसवावयाचे आहे कारण त्याच्या राज्यात सगळे सुखात होते. ते द्युमत्सेनाला घेऊन जाण्यासाठी आलेले आहेत. ते पहातात कीं. त्यांचा आवडता राजा आता पाहू शकतो, ते समजल्यावर ते शल्व लोक जास्त आनंदात जातात. ते शल्व लोक राजाचा रथ घेऊन आलेले असतात. त्यात द्युमत्सेन त्याची पत्नी सैव्या आणि सत्यवान व सावित्री बसतात व आपल्या राजधानीकडे निघतात. ही आणखीन एक गोड वार्ता त्या आश्रमवासियांसाठी असते व त्यामागे सावित्रीचा पुण्य प्रभाव आहे, हे त्यांना विशेष जाणवते. ते सगळे ब्राह्मण राजाला शुभेच्छा देतात, कीं तो अनेक वर्षे सुखाने राज्य करील व त्याचा राजपुत्र त्याच्या नंतर गादीवर बसेल. कांहीं दिवसांनंतर सावित्रीला समजते कीं तिच्या पित्यास पुत्र झाले आहेत. द्युमत्सेनाची राजगादीवर स्थापना ब्राह्मणांकडून होते. सत्यवान उत्तराधिकारी म्हणून नेमला जातो. यथावकाश सावित्रीला शंभर पुत्र होतात. ते सगळे गुणवान असतात. त्यांच्या शल्व वंशाची भरभराट होत जाते. तेथे अश्वपतीची शंभर मुलं सुद्धा गुणवान, धाडसी, बुद्धीमान अशी नावारुपाला येतात ते त्यांचे प्रभू कूळ पुढे चालवतात.

वैशंपायन बोलतात, अरें पार्था, जसे सावित्रीने तिच्या पुण्याईने तिच्या परिवाराचे कल्याण केले तसेंच तुझी द्रौपदी तिच्या कुरुवंशाचे कल्याण करणार आहे. महामुनींनी अशाप्रकारे युधिष्टीराचे सांत्वन केल्या नंतर त्याला थोडा धीर येतो. त्यांचे जो थोडे दिवस वनवासाचे उरलेले असतात ते त्यानंतर मजेत काढतात. त्याशिवाय उरलेल्या तेराव्या वर्षाचे अज्ञातवासाचे कसे करावयाचे ते पांडव ठरवण्यात गुंतलेले असतात.

जे हे सावित्री आख्यान मनापासून ऐकतील व स्त्रीजन्माचे कौतुक करतील ते त्यांच्या आयुष्यात सदैव सुखी होतील. त्यांना कधीही दुःख अनुभवावे लागणार नाही.

अशारितीने पतिव्रता महात्म्य पर्वाचा सातवा भाग संपला.

# कुंडल हरण पर्व (सुरू)

## भाग आठवा

जनमेजय विचारतो वैशंपायन ऋषींना, "मला सांगा, युधिष्ठीराला जेव्हां ऋषी लोमस कर्णाबद्दलचा, इंद्राचा निरोप देतात, ज्यामुळें तो ज्येष्ठ पांडव सतत काळजी करत असें परंतु तो कधी कोणाला त्या विषयी बोलत नसे. तो काय होता इंद्र त्याला निरोप देतो लोमसांच्या माध्यमातून कीं, अर्जुनाच्या स्वर्गातून परत येण्यानंतरच ते काय तो समजेल. "त्या निरोपाबद्दल तो पांडव इतरांशी कां कांहीं बोलत नाही

तू विचारत आहेस तेव्हां, मी ती सगळी कहाणी सविस्तरपणे सांगतो. ते सगळे तू नीट समजून ऐक. पांडवांची बारा वर्षे वनवासात गेली त्यानंतर अखेरचे वर्ष उगवले. त्या वर्षात त्यांना अज्ञातवासात रहावे लागणार असते. त्यावेळी पांडवांबद्दल अनुकंपा असलेले देवादिदेव इंद्र कांहीं ठरवतात. त्यांचा बेत असा असतो कीं, कर्णाच्या कांनांतील सूर्याने दिलेली शक्तिशाली कुंडलं त्याच्या कडून काढून घ्यावीत. त्यासाठी इंद्र एका ब्राह्मणाचे सोंग घेऊन त्याच्याकडे जाण्याचे ठरवतो. ते कर्णाच्या जन्मदात्या सूर्याला त्याच्या दैवी शक्तीमुळें समजते. सूर्य त्या रात्री कर्ण त्याच्या आलिशान बिछान्यावर झोपला असतां त्याच्या स्वप्नात येतो व ते त्याला सांगतो कीं, "इंद्र एका ब्राह्मणाचे सोंग घेऊन त्याच्याकडे ती शक्तीशाली कुंडलं दान म्हणून मागणार आहे. ती जर त्यांनी त्या ब्राह्मणांला दिली तर त्याची अर्जुनाला पराजित करण्याची क्षमता कमी होईल". तो पुढे कर्णाला स्वप्नात सांगतो कीं, "मुला, तुझी दानशूरतेची ख्याती सगळ्या जगाला आहे. तुझ्याकडे जर कोणी पवित्र ब्राह्मणांने कांहीं दानात मागितले तर तू ते देतोस हे इंद्राला माहीत आहे. त्या तुझ्या गुणाचा तो गैरफायदा घेण्यासाठी येणार आहे. मी तुला सांगण्यासाठी आलो आहे किं, तू त्यांने जर तुझी कर्णकुंडलं मागितली तर तू ती त्याला देणार नाहीस. त्या ऐवजी गोड बोलून त्याची बोळवण करशिल. हे मी सांगतो, केवळ तुझ्या भल्यासाठी. तरी तो इंद्र पुन्हा पुन्हा तुझ्याकडे ती मागत राहील, तरी तू त्याला ती देणार नाहीस. त्या कुंडलाच्या ऐवजी दुसरे कांहीं मौल्यवान त्याला देण्याचा प्रयत्न करशिल. त्यात त्याला बाई, सोने, दागिने असें कांहींही दे परंतु, ती कुंडलं देऊ नकोस. त्यासाठी तू कांहींही

कारणं सांग, पण त्याच्या डावात फसू नकोस. जर तू त्याच्या कपट कारस्थानात फसलास तर तुझे आयुष्य कमी होईल. तुझे प्राण त्या चिलखतात (कवच) व कुंडलात आहेत. ते गेले तर तुला युद्धात अर्जुन निश्चितपणे ठार मारील. माझे हे शब्द चांगलेच ध्यानात ठेव कारण, ती कुंडलं अमृतातून बनवलेली आहेत. म्हणून त्यांना जपणे तुझ्या जीवनासाठी फार आवश्यक आहे".

स्वप्नात कर्ण ते सूर्याचे बोलणे ऐकतो. कर्ण त्याला ओळखत नाही व उलट विचारतो, "तू कोण आहेस, मला हे सगळे सांगणारा? माझ्या बद्दल तुला एवढी कां फिकीर पडली आहे? मला सांग अरे, तू ब्राह्मणाच्या वेषात येऊन मला असें सगळे कां पढवत आहेस"? ते ऐकल्यावर सूर्य त्याला सांगतो, "अरे मुला, मी तो सहस्त्ररश्मी सूर्य नारायण आहे, केवळ तुझ्या प्रेमा पोटी मी हे तुला सांगत आहे. मी सांगतो तसे तू करशिल कारण त्यात तुझे भले आहे". ते ऐकून कर्ण त्याला उत्तर देतो, "हे माझे महद्भाग्य आहे कीं, साक्षात सूर्यनारायण, माझे भले करण्यासाठी माझ्या स्वप्नात येत आहेत. परंतु ए ब्राह्मणा, ऐक मी काय सांगतो, ते ऐकण्याने कदाचित तुला बरे वाटेल, जर मी तुला प्रिय असेन तर माझ्या वचनापासून मला विचलित करण्याचा कोणीही प्रयत्न केला तरी मी त्याने बधणार नाही. दानशूरता हे माझे ब्रीद आहे व ते मी कधीही सोडणार नाही. तुला माहीत आहे कीं, जर कोणा उच्च श्रेणीच्या ब्राह्मणांने माझे जीव मांगितले तर तेसुद्धा मी देण्यास मागेपुढे करणार नाही. त्यापुढे ह्या कवच कुंडलांचे काय आपण बोलता". पुढे कर्ण सूर्यदेवाला सांगतो, "जर तो इंद्र ब्राह्मणाचे सोंग घेऊन आला व माझ्याकडे ती कवच कुंडलं मागितली तर मी ती त्याला सगळे माहीत असूनही देणार आहे कारण, त्यामुळें दानवीर म्हणून माझी आणखीन ख्याती सगळ्या विश्वात होणार आहे आणि ते मला विशेष महत्वाचे वाटते. परंतु, जर मी ते दिले नाहीत तर मात्र माझी दानवीर म्हणून जी ख्याती आहे ती संपून जाईल. अहो तात, जगणे काय नांवापेक्षा जास्त महत्वाचे आहे कां ब्राह्मणच काय अगदी, वल किंवा वृत्र जरी माझ्याकडे आले तरी मी ते देईन कारण त्यात माझी अस्मिता वृद्धींगत होणार आहे. माझी ख्याती माझ्या जगण्यापेक्षा मला जास्त महत्वाची वाटते. उलट अशारितीने कपट कारस्थान करण्यामुळें त्यांची इज्जत चवाठ्यावर येईल. माझे तत्वतः त्या दानामुळें कांहींच बिघडत नाही. आपण श्रेष्ठ अहात, ह्या जगात चांगली ख्याती

जीवनापेक्षा श्रेष्ठ असते. ती चिरकाळ जगात राहून त्या माणसाला अमर करत असते. ज्यांची गुणामुळें ख्याती होते ते कायम स्वर्गीय सुख उपभोगतात. कुट कपट कारस्थानं करणार्यांच्या वाटेला तुच्छता येते. इंद्र व त्याचे पांडव जर त्यामुळे जगाच्या नजरेत तुच्छ ठरणार असतील तर ते जास्त योग्य होईल. जगाच्या नजरेतून तुच्छ ठरलेले लोक, ते वास्तवात जीवंत असले तरी कायम मरत असतात. आपण ज्ञानी अहात, आपण जाणता किं, साक्षात विधाता सांगतो कीं, ख्यातीने जगणे देहांने जगण्यापेक्षा कितीतरी जास्त मोलाचे असते. म्हणून जर मी समजून उमजून माझी कवच कुंडलं दान केली तर मी जास्त मोठी प्रतिष्ठा मिळवणार आहे. अशा दानामुळे मी युद्धात वीरमरण प्राप्त करणार असेन तर ते आणखीनच जास्त चांगले ठरणार आहे. कारण, दानवीरतेची ख्याती व युद्धात मृत्यू हे दोनही मला स्वर्गाचे दरवाजे उघडणार आहेत. म्हणजे दोनही बाजूनी माझे भलेच होणार आहे. जर मी दान केले नाही तर मी माझे वचन जीवाला भिऊन मोडले असें समजले जाईल व त्याने माझी बेइज्जतच होईल. आणि जरी मी त्यामुळें युद्धात जिंकलो तरी ते कीती काळ मला उपयोगाचे ठरणार आहे. कारण अशा यशाचे मुल्य तात्पुतरे असते. लोक माझे यश विसरतील पण माझे वचन मोडणे विसरणार नाहीत. माझी ख्याती टिकवण्यासाठी जर मला मृत्यू स्वीकारावा लागला तर ते मला मंजूर आहे. म्हणून मी आपल्याला सांगतो, मेधावताच्या ब्राह्मण रुपाला फसून नाही तर त्याला दान करून मी खूप मोठे श्रेय मिळवणार आहे, ते साक्षात इंद्रसुद्धा मला नाकारू शकणार नाही.

अशारितीने कुंडल हरण पर्वाचा आठवा भाग संपला .

# कुंडल हरण पर्व

## भाग नववा

ते कर्णाचे बोलणे ऐकून सूर्य त्याला सांगतो, "अरे असें चुकीचे विचार करू नकोस. तुला तुझा परिवार आहे, त्यांचा तू विचार करणार नाहीस कां? तुझ्या जीवंत असण्याशी तुझ्या आई, पिता, पत्नी, मुलं ह्यांचा फार मोठा संबंध असतो ते सगळे तू केवळ ख्यातीसाठी विसरत आहेस ते चुकीचे आहे. जोवर माणूस जीवंत आहे तोवर त्याच्या ख्यातीला प्रतिष्ठा असते. एकदा तो मेला कीं त्याची ख्याती त्याच्या कोणत्याही उपयोगाची नसते. जीव घालवून जी ख्याती तुला मिळेल असें वाटते ती निरर्थक असते त्याचा कांहीं त्या मेलेल्या माणसाला फायदा होत नाही. जर तू समजतोस तसे असते तर कोणीच जगण्यासाठी प्रयत्न केला नसता. माणूस कितीही थोर असला तरी त्याच्या मृत्यूनंतर सगळे त्याला विसरतात. अरे शूर मर्दा, तुझ्या ख्यातीचा उपयोग तुझ्या परिवाराला होईल कां त्याचा तू विचार करत नाहीस. तुझ्या रहाण्याने त्यांना जो उपयोग होणार आहे तो तुझ्या मरण्याने त्यांना मिळणार नाही हे तू समजून घे. मेलेल्या माणसाच्या प्रसिद्धीचा त्याला कधीच उपयोग होत नाही. जोपर्यंत जीवंत आहे तोपर्यंतच त्या नांवाला किंमत असते. मेलं किं गेलं, अशीच वास्तविक परिस्थिती असते हे तू समजून काम केले पाहिजेस. मेल्यानंतर स्वर्ग वगैरे कोणी पाहिले आहे? त्या सगळ्या कल्पना असतात, त्यात तथ्यांश नसतो हे तुझ्या कसे लक्षात येत नाही. मानव जन्मातच आत्मा स्वतःचा उद्धार करू शकतो. ते मेल्यानंतर होत नाही. म्हणून जीवंत रहाणे व स्वताचा अध्यात्मिक उद्धार करत रहाणे हे माणसाच्या जन्माचे मुख्य कर्तव्य असते हे तू विसरत आहेस. मेल्यानंतर जरी तू तुझ्या दानवीर म्हणून असलेल्या ख्यातीमुळें स्वर्गात गेलास तरी तेथे फार काळ तू राहू शकत नाहीस कारण, जसें तुझे पुण्य संपेल तुला पुनः पृथ्वीवर मानव जन्म घ्यावाच लागेल. त्यापेक्षा आहे तो मानव जन्म सांभाळणे कितीतरी जास्त हिताचे आहे हे तू लक्षात घे, माझ्या मुला, ख्याती खराब झाली तर ती पुन्हा सुधारता येते. म्हणून अशा खोट्या भ्रमात तू राहू नयेस असें मला वाटते. मेलेल्या माणसाची ख्याती म्हणजे मेलेल्या माणसाला घातलेला हार असें असते. अशा भाकड कल्पनात तुझ्यासारखा चाणाक्ष इसम कसा

फसतो? हे सगळे मी तुझ्या भल्याचे आहे म्हणून सांगत आहे. कारण, तू माझा भक्त आहेस, माझी आराधना सतत तू करत असतोस. तुझ्या भक्तीने मी प्रसन्न झालो आहे म्हणून मी तुला तुझ्या हिताचे सांगण्यासाठी आलो आहे. माझ्या भक्तांचे संरक्षण करणे माझे कर्तव्य आहे हे माझे तुला सावध करण्या मागील कारण आहे. मला सांग तू माझ्या सांगण्या प्रमाणे करणार आहेस कीं नाही? त्या शिवाय ह्या सगळ्या पाठी एक महान गंभीर गुपित आहे. विधात्याच्या रचनेनुसार मी तुला हे सांगण्यास बांधलेला आहे. म्हणून तू माझ्या सांगण्याप्रमाणे करणार आहेस. ते गुपित मी तुला सांगू शकणार नाही. परंतु, तू ते समजून घे व माझ्या आज्ञेचे पालन कर. तुला पुन्हा सांगतो तू राधाचा माझे शब्द मनावर घेणार आहेस की नाही पुनः ऐक, जेव्हां इंद्र तुझ्याकडे ती कुंडल व चिलखत मागेल , ते देण्यास तू नाकार करशील, पुनः पुन्हा मी तुला तेच सांगणार आहे. ते कुंडल व चिलखत तुझ्या अंगावर आहेत तो पर्यंत अर्जुन तुझा मुकाबला करू शकणार नाही. परंतु, जर ते तू दान केलेस तर मात्र तो तुला ठार मारू शकेल. तू प्रतिज्ञा केली आहेस की, तू धनंजयाला ठार मारशिल, ती पूर्ण होण्यासाठी तुला तुझी कुंडलं व चिलखत तुझ्याकडेच ठेवावी लागतील. जोपर्यंत ती तुझ्या अंगावर आहेत तोपर्यंत साक्षात इंद्रसुद्धा त्याला मदत करू शकणार नाही. म्हणून अरे माझ्या मुला, कर्णा, जर तुला तुझा अर्जुनाला पराजित करण्याची प्रतिज्ञा खरी करावयाची असेल तर ती कुंडलं व चिलखतं तू त्या ब्राह्मणाच्या वेषातील इंद्राला देणार नाहीस".

अशारितीने कुंडल हरण पर्वाचा नववा भाग संपला .

# कुंडल हरण पर्व

## भाग दहावा

कर्ण त्यावर सूर्याला बोलतो, "अहो तेजाचे देव, मला आपण आपला भक्त म्हणून ओळखता, तसेंच आपण चांगलेच जाणता कीं, मी माझ्या व्रताप्रमाणे कोणाही लायक ब्राह्मणाला नाराज करू शकत नाही. मला आपल्या इतके प्रिय कोणीही नाही, अगदी माझी पत्नी, माझी मुलं, माझे मित्र, मी स्वतःसुद्धा त्या पेक्षा जास्त प्रिय मला आपण अहात. मला माहित आहे कीं, देव त्यांच्या खर्या भक्तानी किती काळजी करतात. त्याप्रमाणें आपले हे करणे मी चांगलाच समजू शकतो. मी दुसर्या कोणाही देवाचे नांवसुद्धा घेत नाही. आपण जे सांगत अहात ते माझ्या भल्याचे आहे आणि म्हणूनच आपण एवढा आटापिटा करून मला सांगत अहात. हेसुद्धा मी चांगलेच जाणतो. परंतु, मला माझे दानशूरतेचे व्रत मोडायला कृपया सांगू नका. मला माहीत आहे किं, त्यामुळें माझे वास्तविक अहित होत आहे परंतु, शब्दाचा पक्का हे माझे ब्रीद आहे व त्यासाठी मी कोणतेही नुकसान झेलावयाला तयार आहे. माझे पिता, मला त्याबद्दल क्षमा करा कीं, मी आपल्या विनंतीचा अव्हेर केला आहे, पण त्याला माझी नाइलाज आहे. मी आपल्याला वंदन करून सांगतो कीं, माझ्या धोरणात अजिबात बदल होणार नाही, परंतु, त्यात आपण आपला अपमान करण्याचा माझा उद्देश आहे असा अर्थ मात्र आपण काढू नये असी मी आपल्याला विनंती करतो. असत्याचे मला भय वाटते जितके मरणाचे कोणाला वाटेल. ब्राह्मणांचे बोलाल तर मी आपल्याला अभिमानाने सांगेन कीं, मी त्यांच्यासाठी माझे प्राण सुद्धा द्यायला तयार आहे. आता प्रश्न राहिला अर्जुनाच्या मला हरवण्याचा, त्यात मला तीळमात्र शंका नाही कीं, मी त्याला कधीही पराजित करीन, मग तुमचे कुंडल व चिलखत माझ्या अंगावर असो अगर नसो. त्याचा पराभव मी माझ्या गुणांनी करणार आहे. आपण जाणता कीं माझ्याकडे जमदाग्नी कडची आयुध आहेत. त्याशिवाय द्रोणाचार्यांच्या कडून मी शस्त्रसाधना संपादन केली आहे. म्हणून माझ्या जिंकण्या हरण्याचा विचार करणे आपण सोडून द्यावे व मला माझे व्रत पाळण्यास मोकळे सोडावे. त्या वज्रधारी शक्रास माझ्याकडे भिक मागायला येऊ द्या, त्यातच माझा व आपलासुद्धा मोठा सन्मान होणार आहे हे

लक्षात घ्या, कीं त्याला त्याच्या पोरासाठी आपल्या पोराकडे भिक मागावयाला यावे लागले. त्यातच आपली मोठी जीत आहे हेसुद्धा कृपया लक्षात घ्या माझे बाबा. ते कर्णाचे निश्चयाचे बोलणे ऐकल्यावर सूर्यदेव त्याला बोलतात, "माझ्या मुला, जर तुला ती कुंडल व चिलखत द्यावयाचे असेल, तुझे व्रत पाळण्यासाठी, तर त्याच्या बदल्यात तू त्या ब्राह्मणाच्या रुपात आलेल्या इंद्राला सांगितले पाहिजेस कीं, तू त्याला ओळखले आहेस कीं, तो खरा ब्राह्मण नाही. त्यानंतर त्याच्याकडून एक बाण मागून घे, जो तू ज्याला मारशिल तो त्याने ठार मरेल. इंद्राला समजले पाहिजे कीं त्याचे ब्राह्मणांचे सोग फसले आहे व तू इंद्राकडून तो बाण मागून घे. तो बाण तुला अर्जुनाला ठार मारण्यासाठी उपयोगी येईल. तसे माझे मानत असशिल तर मला कांहीं हरकत नाही तुझे व्रत तू पाळण्याला. जर तो इंद्र तूला तसा बाण देत असेल तर तू तुझे कुंडल व चिलखत त्याला दान कर . तो बाण असा असला पाहिजे कीं तो सगळे शत्रू ठार मारुनच मग परत तुझ्याकडे येईल".

वैशंपायन पुढे सांगतात, असें बोलून तो सहस्रनेत्री सूर्यदेव त्याच्या स्वप्नातून निघून जातो व कर्ण जागा होतो. त्याला ते सगळे स्वप्न चांगलेच आठवत असते. दुसर्या दिवशी कर्ण उठल्यावर आपले प्रातर्विधी उरकल्यानंतर सूर्याची प्रार्थना करतांना त्याला ते स्वप्न सांगतो. ते ऐकल्यावर तो साक्षात स्वर्भानू गालातल्या गालात हसतो व ते स्वप्न खरे असल्याची ग्वाही देतो. तो त्याला बोलतो, "अरे राधासुता, आता तू सगळे जाणत आहेस म्हणजे इंद्र तुला फसवू शकत नाही हे प्रथम त्या दानवांच्या दुष्मनाला समजू दे". त्यानंतर कर्ण मोठ्या तयारीने इंद्रची ब्राह्मणांच्या सोंगात येण्याची वाट पहात रहातो.

अशारितीने कुंडल हरण पर्वाचा दहावा भाग संपला .

# कुंडल हरण पर्व

## भाग अकरावा

जनमेजय राजा वैशंपायनांना विचारतो, अहो मुनी मला सांगा, ते कोणती गुप्त गोष्ट होती जी सूर्य कर्णाला सांगत नाही? मला समजून घ्यावयाचे आहे कीं, ती कर्ण कुंडलं व चिलखत कशा प्रकारचे होती? ती कुंडलं व चिलखत कोठून त्याला मिळाली होती आपण जर ते सगळे जाणत असाल तर मला कृपया त्यांची माहिती सांगावी.

वैशंपायन त्याला सांगतात, मी तुला सगळी माहीती सांगणार आहे जी सूर्यदेवांने कर्णाला सांगितली नाही. त्या कुंडल व चिलखताचे सुद्धा मी तुला सांगणार आहे . तेव्हां आता ऐक राजा ते सगळे,

एकदा राजा कुंतीभोजाकडे , एक रागीट स्वभावाचा ब्राह्मण ऋषी ज्याचे नांव होते, दुर्वास, जो खूप उंच होता आणि ज्याच्या केसाच्या जटा लांब पसरलेल्या होत्या, ज्याच्या हातात एक दंड होता, परंतु, तो दिसायला व्यवस्थित होता असा आला. त्याच्या अंगातून तेज निघत होते. त्याच्या अंगाचा वर्ण लालसर गव्हाळ होता. त्याच्या बोलण्यात माधूर्य होते. तो सगळे वेद जाणत होता. तो आल्यावर कुंतीभोजाला बोलतो , तू निगर्वी आहेस असें मी ऐकले आहे. मी तुझ्याकडे अतिथी म्हणून रहाण्यास आलो आहे मात्र मला तू स्वतः भिक्षा मागून आणलेले खाद्य खाण्यास दिले पाहिजे. तू किंवा तुझा कोणी, असें वागता कामा नये ज्यामुळें मला क्रोधी व्हावे लागेल. जर तुला मान्य असेल तर मी तुझ्या घरात रहाण्यास तयार आहे. कोणीही माझ्या खाण्याच्या पद्धतीबद्दल व झोपण्याच्या पद्धतीबद्दल आक्षेप घेणार नाही असें तू पहा. कुंतीभोज त्या सगळ्या अटी मान्य करतो . कुंतीभोज दुर्वासाला सांगतो कीं, माझी कन्या आहे जिचे नांव आहे पृथा ती आपली सगळी व्यवस्था पाहिल. ती स्वभावाने खूप चांगली आहे व तिची नैतिकता सुद्धा कौतुकास्पद आहे. पृथा तुमची सगळी व्यवस्था आदरपूर्वकपणे पाहिल. असें बोलून राजा कुतीभोज आपल्या कन्येकडे जातो. तिला ते जे घडले सांगतो व बोलतो कीं जोवर तो ऋषी आपला अतिथी आहे तिला त्याची सगळी व्यवस्था पहावी लागणार आहे. पृथा त्या प्रमाणे सगळे करण्याचे राजाला आश्वासन देते. पृथाला त्या आधीसुद्धा अशा ब्राह्मणांचे आदरतीथ्य करण्याचा अनुभव

होता. राजा तीला सांगतो कीं, त्याची प्रतिष्ठा आता तिच्या हातात आहे. असें बोलून तो कुंतीभोज जातो . ब्राह्मण ही एक महान शक्ती असते असे त्या काळात समजले जात होते. ब्राह्मणांच्या कृपेमुळें सूर्य आकाशात तळपत असतो असें समजत होते. इतके ब्राह्मणांचे महत्व होते. ब्राह्मणांचा उपमर्द केल्यामुळें असुर वातपीचा नाश झाला आणि तलजंधाचा त्यांच्या शापामुळें विध्वंस झाला हे सगळे जाणत होते. पृथाचे मन तिला सांगते, ह्या ब्राह्मणाची सेवा केल्याने तुला चांगला पती मिळेल म्हणून तू त्याची उत्तम सेवा करून त्याचे आशिर्वाद मिळवं. पृथा लहानपणापासून अशी सेवा करत आली होती. तू सगळ्या वडीलधार्यांची मनापासून सेवा करत आली आहेस तेव्हां ह्या ब्राह्मणाची सेवा करणे तुला कांही विशेष अवघड जाणार नाही. पृथा लहानपणापासून कुंतीभोजाकडे एक आश्रीत मुलगी म्हणून रहात आली होती. ती त्याची स्वताची कन्या नव्हती परंतु, तो तिला आपल्या मुलीसारखे वागवत होता. तिचे काम सगळ्या नोकरांकडून त्यांची कामं करून घेणे असे होते. पृथाच्या प्रेमळ स्वभावामुळें कुंतीभोजाचे सगळे नोकर तिच्यावर प्रेम करत होते व तिला त्यांच्याकडून काम करून घेतांना कधी त्रास झाला नव्हता. ती अतिशय शांत स्वभावाची असल्यामुळे रागीट ब्राह्मणसुद्धा तिच्यावर रागवत नव्हते. पृथा कुंतीभोजाच्या नात्यातली वृश्नी घराण्यातील परंतु एका गरीब घरातली मुलगी होती . परंतु तिच्या मनमिळावू स्वभावामुळें ती कुंतीभोजाची लाडकी मुलगी झाली होती . पृथाच्या पित्याने सुरांने तिला कुंतीभोजाकडे दिलेले होते कारण सुरा व कुंतीभोज चांगले मित्र होते . नात्याने ती वसुदेवाची बहिण होती. म्हणजे दामोदराची आत्या होती. कुंतीभोजाला सुरा बोलला होता कीं त्याची पहिली संतान तो कुंतीभोजाला देणार आहे त्याप्रमाणे पृथा त्याची पहिली संतान कुंतीभोजीकडे दिली गेली दत्तक म्हणू न. अशारितीने पृथा कुंतीभोजाची कन्या झाली होती. पृथाला त्यामुळें सगळे कुंती म्हणूनसुद्धा ओळखत होते. जरी सध्याच्या परिस्थितीत ती एका गरीबाची कन्या होती, वस्तुतः ती एका राजघराण्याशी संबंध असलेली होती. तिच्या येण्याने कुतीभोजाचा उत्कर्ष झाला होता. तिच्यात सगळी उच्च कुलिन मुलींची लक्षणं होती. तिचे कर्तृत्व सुद्धा वाखाणण्यासारखे होते. अशी पृथा त्या ब्राह्मणांची सेवा करण्यासाठी नेमलेली होती. तिला तिच्या जबाबदारीची पूर्ण कल्पना होती. तिच्या कडून कांही आगळीक झाली तर त्यामुळे त्या रागीट दुर्वासाच्या शापामुळें

सगळ्या घराण्याचा नाश होणार होता अशी परिस्थिती होती.

अशारितीने कुंडल हरण पर्वाचा अकरावा भाग संपला .

# कुंडल हरण पर्व

## भाग बारावा

कुंतीभोजाला पृथाने आश्वासन दिल्या प्रमाणें ती त्या रागीट ब्राह्मणाची सेवा करत असते. ती कुंतीभोजाला सांगते, "तिला ब्राह्मणांची सेवा करवयाला आवडते. त्यामुळें ह्या ब्राह्मणाची सुद्धा मी तशीच सेवा करीन जशी आपली अपेक्षा आहे. कारण, त्यांची चांगली सेवा केली तर माझासुद्धा भविष्यात फायदा होऊ शकतो". ते ब्राह्मण दिवसाच्या कोठल्याही समयी येवोत, सकाळी, दुपारी संध्याकळी नाहीतर मध्यरात्री मी त्यांची काळजी घेईन. ती सांगते कीं, तिला माहीत आहे कीं, जर ते ब्राह्मण संतुष्ट झाले तर यजमानाचे कल्याण करतात व जर नाराज झाले तर तेच शाप देऊन यजमानाचे वाटोळे करू शकतात. मी हे सगळे ओळखून आहे व म्हणून मी ह्या रागीट ब्राह्मणाची चांगली देशभाल करीन, त्याबद्दल आपण निशंक असा असे आश्वासन पृथा कुंतीभोजाला देते. त्यानंतर कुंतीभोज पृथाची व द्‌ुर्वासाची ओळख करतो. तो सांगतो, "ही माझी मुलगी आहे, तशी वयाने लहान आहे पण तिला ब्राह्मणांची सेवा करावयाला आवडते. तिची नेमणूक मी आपल्या सेवेसाठी केली आहे. कुंतीभोज मोठ्या समाधानाने तेथून निघून जातो. राजाला माहीत असतें कीं, असे ब्राह्मण वृद्धांवर, लहान मुलांवर आणि संन्याशांवर रागवत नाहीत, त्यामुळें तो जरा निर्धास्त होता. कारण पृथा वयांने खूप लहान होती. तरी तिचा सेवा करण्याचा उत्साह मोठा होता. खरे ब्राह्मण निष्पाप, अज्ञानातून झालेली आणि अननुभवातून अशा तीन प्रकारच्या चुकांना क्षमा करतात ते राजा जाणून होता. जर मुद्दाम, हलगर्जीपणातून आणि पापबुद्धीने प्रमाद झाला तरच ते ज्ञानी ब्राह्मण शाप देतात एरव्ही नाही हे तो राजा जाणून होता. त्यामुळें पृथा त्या परीक्षेतून पार होईल अशी राजाची खात्री होती. त्यानंतर दुर्वा, पृथाची सेवक म्हणून झालेली नेमणूक स्वीकार करतात. त्यामुळे कुंतीभोजाला हायसे वाटते. दुर्वासांची व्यवस्था अशा कक्षात केलेली होती जे शुभ्र रंगाने सजवलेले होते. दुर्वासासाठी उत्तम आसनांची व्यवस्था होती. खाण्या पिण्याची उत्तम व्यवस्था होती. पवित्र अग्नीची व्यवस्था केलेली होती. पृथा स्वतः ते सगळे पहात होती आणि नम्रपणे त्यांच्या आज्ञांचे पालन करत होती. दुर्वासांची सेवा त्या पृथाने इतकी उत्तम

केली कीं, त्या ब्राह्मणाला त्यात कांहीं उणीव भासली नाही. दुर्वास ऋषी तिच्या सेवेमुळें संतुष्ट झाले होते.

अशारितीने कुंडल हरण पर्वाचा बारावा भाग संपला .

# कुंडल हरण पर्व
## भाग तेरावा

वैशंपायन पुढे सांगतात, पृथा व्रतस्थ जीवन जगणारी त्या ब्राह्मणाची चोख सेवा करत असते. त्यामुळें तो रागीट ब्राह्मण समाधानी झालेला असतो. त्याच्या विक्षिप्त सवयीनुसार तो तिला सकाळी येतो असें सांगून रात्री उगवत असें परंतु, त्याच्याबद्दल कोणतीही प्रतिक्रीया न देता ती त्याची सेवा करत असें. त्याच्या जाण्याची व येण्याची कांहीं वेळ नसे. कसाही तो आला तरी बिनतक्रार ती त्याची सगळी व्यवस्था करत होती. त्याला त्याच्या पसंतीचे सुग्रास स्वादिष्ट रुचकर जेवण ती त्याला वाढत असें. त्याचे कपडे धुऊन ठेवत असें. त्याचे आसन व बिछाना दररोज स्वच्छ करून ठेवत असें. त्याच्या येण्या व जाण्यात अनियमितपणा वाढत होता परंतु, पृथा त्याचा विचार न करता त्याची व्यवस्था पहात असें. कधी ब्राह्मण रागवत असे पण ती त्यावर कोणतीही प्रतिक्रीया न देता आपले काम अधिक चांगल्या प्रकारे करत असें. ती कधी त्याला प्रत्युत्तर देत नसे. जे जसे सांगेल तसे ती करत असें. जणू काय ती एका परीक्षेलाच बसली होती. कधी मध्यरात्री तो विक्षिप्त ब्राह्मण तिला उठवून जेवण करण्यास सांगत असें तर कधी केलेले जेवण तसेंच टाकून जात असें जेणे करून ती चिडेल परंतु, पृथा कधीच रागवत नव्हती. एकाद्या सच्चा चेल्या सारखी ती त्या वृद्ध ब्राह्मणाची सेवा करत होती. त्या परीक्षेतून अखेरीस पृथा उत्तीर्ण झाली. दुर्वास कधी नाही असें पृथावर खूष झालेले होते. कुंतीभोज दररोज तिला काय परिस्थिती आहे असें विचारतं व ती सगळें जसे घडत होते तसे त्याला सांगत होती. एक वर्ष तसे गेले परंतु, त्या चिडखोर ब्राह्मणाला तिच्या सेवेत कोठे दोष आढळला नाही. जितका तो जास्त त्रास देई ती तितकी जास्त चांगली सेवा त्याची करत असें ती कधी रागावली नाहीं कीं, तक्रार केली नाही, शेवटी तो ब्राह्मण त्या चुरशीत हरतो असे दिसते. शेवटी एकदा तो तिला बोलतो, "अहो मुली, मी तुझ्या सेवेने संतुष्ट झालो आहे. मी तुला कांही देऊ इच्छितो तुला काय पाहिजे. असा वर मांग जो मिळण्यास अवघड असेल. असा वर ज्यामुळें तू सर्व बायकांत श्रेष्ठ ठरशिल". पृथा त्याला सांगते, "मला माझे पिता सगळे कांहीं देत असतात. त्यामुळें मागण्यासारखे कांहीं नाही. त्याशिवाय आपली सेवा

करावयाला मिळाली हे माझ्यासाठी खूप चांगले झाले आहे. त्यामुळें मला कांहीं वेगळे मागावयाचे नाही. अशीच आपली सेवा करण्याचे भाग्य मला मिळो असें वाटते. आपल्यासारख्या वेदसंपन्न ऋषीची सेवा करावयाला मिळाली हेंच किती मोठे झाले". असें ती निष्पाप कन्या त्या ब्राह्मणाला बोलते. तिचे भाबडेपण त्या ऋषीला विशेष भावते. "आपली सेवा मी करत असल्याने माझे पिता माझ्यावर संतुष्ट झाले आहेत हे काय कमी आहे कां "आपण वर देण्याबद्दल बोलता परंतु, मला तो आधीच मिळाला आहे असें मी समजते". ते तिचे बोलणे ऐकल्यावर दुर्वास कमालीचे हतबल होतात, त्यांना अशी सेविका आजवर मिळालेली नव्हती. ते बोलतात, "मुली जर तुला माझ्याकडून कांहीं मागावयाचे नसेल तर मी तुला एक भेट देते ती तू घ्यावी असे मला वाटते". पृथाला तिच्या वयानुरूप त्या गोष्टीचे कुतूहल वाटते. ती त्या प्रमाणे ती काय भेट म्हणून विचारते. मी तुला एक मत्र देतो. तो मंत्र तू उच्चारलास तर तुझ्या मनातील स्वर्गीय देवता तुझ्या कडे येईल व तुला संभोग सुख देईल. ती देवता तुझ्या सगळ्या इच्छा पूर्ण करील. जर तू कोणी दुसर्या स्त्रीला दिला तर  तिलासुद्धा त्या देवता उपभोगता येतील".

वैशंपायन पुढे सांगतात, ती लहान मुलगी तो मंत्र नाकारत नाही कारण जर तो तिने नाकारला तर तो रागीट ब्राह्मण चिडला तर काय करावे म्हणून ती तो मंत्र घाबरत घाबरत घेते. ते मंत्र अथर्ववेदाच्या प्रारंभीचे होते. देवतांना आळवण्याचे ते मंत्र होते. परंतु, दुर्वासाने ते तिला दिले ते सिद्ध करून दिले होते म्हणून त्या मंत्रांना विशेष शक्ती प्राप्त झालेली होती. तो मंत्र पृथाला दिल्यानंतर तो ब्राह्मण कुतीभोजाला सांगतो कीं, त्यांचे तेथील रहाणे फारच छान झाले व त्यांने त्याच्या मुलीला, पृथाला कांहीं भेट दिली आहे, तिच्या उत्तम सेवे प्रित्यर्थ. असें बोलून तो ऋषी राजाची रजा घेतो.

अशारितीने कुंडल हरण पर्वाचा तेरावा भाग संपला .

# कुंडल हरण पर्व

## भाग चौदावा

वैशंपायन सांगतात, दुर्वास ऋषी पृथावर संतुष्ट होऊन व तिला मंत्र देऊन गेल्यावर पृथा म्हणजे कुंती त्या मंत्राचा विचार करू लागते . तिचे स्त्रीसुलभ कुतूहल त्या मंत्राबद्दल वाढत जाते. ती त्याचाच विचार करत असते सर्वकाळ, काय करावयाचे त्या मंत्राचे, खरोखरच असें देव येणार आहेत कां? त्याचेच विचार तिच्या मनांत सारखे येत असतात. ती अशाप्रकारे विचार करत असतां तिला समजते कीं तिची मासिक पाळी येण्याची वेळ झाली आहे. पृथाचा मासिकपाळीचा काळ सुरू झाला होता परंतु, ती अजून अविवाहीत होती. तिला कांहीं कळेना काय करावे. त्या विलक्षण अवस्थेत ती लाजेने चूर झाला होती. त्या स्थितीत ती तो मंत्र अनवधानाने उच्चारते, त्याचा प्रभाव सुरू होतो. तिने त्यावेळी तिच्या आवडत्या सूर्य नारायणाचे ध्यान केले होते. खरोखरच तो देव येतो कां, ते तिला पहावयाचे होते आणि एकदम कांहीं अविचीत घडले, तिला आढळले कीं ती एका मऊशार गादी असलेल्या शय्येवर आहे व तिच्या समोर तिला प्रत्यक्ष सूर्यदेव दिसू लागले. ते सगळे तिला विलक्षण होते. ती घाबरून गेली तरी तिची उत्कंठा आणखीन तीव्र झाली व पुढे काय होते ते ती पहाण्यास उत्सुक होती. पूर्व दिशेकडून सूर्यदेव सावकाशपणे तिच्या जवळ येत होते. ती त्या दृष्याकडे एकटक पहात राहीली. ते सूर्याचे तेज ती पहात राहीली. तो सकाळचा गुलाबी सूर्य होता. त्याच्या किरणात ताप नव्हता. त्याक्षणी तिला स्वर्गीय दृष्टी प्राप्त झाली. त्यानंतर तिला तो सूर्य मनुष्याच्या रुपात दिसू लागला. त्याच्या तेजांने व सौंदर्याने ती भयचकीत झाली. काय करावे तिला समजेना. तिला समजले कीं हा सगळा त्या मंत्राचा प्रभाव आहे. दैवी रत्नजडीत आभूषणे नेसलेला तो देव आता तिच्यापुढे तिच्या आज्ञेची प्रतिज्ञा करत होता. नकळत पृथा त्या तिच्या आवडत्या देवाची आळवणी करू लागली. त्याच वेळी तिच्या योनीतून योनीद्राव स्त्रवू लागला ते सगळे अवचित होते. जणूकाय तिचे शरीर संभोगासाठी उत्सुक झाले होते. सूर्यदेव तिच्याकडे आकृष्ट झाले होते व ते अधिकाधिक जवळ येत होते. त्याच्या मुखावर स्मित झळकत होते. पृथा स्वतः मंतरल्यासारखी त्याचे सौंदर्य पहात होती. अचानकपणे सूर्यदेवाचे दोन हिस्से झाले. एक

हिस्सा आकाशात गेला पृथ्वीला प्रकाश देण्याच्या कामासाठी आणि दुसरा मानव देहधारी पृथाच्या जवळ येऊ लागला. जवळ आल्यावर अतिशय मधूर वाणीत तो पृथाला बोलतो, "अहो कन्या आपण मला बोलावले आहे तेव्हां आता फार वेळ न दवडता तुमची इच्छा पूर्ण करण्यासाठी मला सहाय्य करा". ते ऐकून पृथा पूर्णपणे घाबरून गेली. ती जाणत होती की असा संबंध अनैतिक असतो व ती नैतिकतेची मुल्ये प्रामाणिकपणे पाळत आली होती. हे काय भयंकर होत आहे. तिला कांहीं सुचेना. परंतु, ती समजते कीं आता परिस्थिती तिच्या नियंत्रणाबाहेर गेलेली होती. एका बाजूला तिचे स्त्रीमन सांगत होते कीं, ती सूर्याबरोबर संभोग करेल व त्याच वेळी तिचे नैतिकतेने बांधलेले मन सांगत असते कीं, हे अयोग्य आहे. पृथा पूर्णपणे गोंधळलेली होती. कोणते मन जास्त प्रभावी होणार त्याप्रमाणे तिचे शरीर साथ देणार होते. पृथाचे नैतिक मन सूर्याला सांगते कीं, त्यांने आता जावे तिला त्याच्याशी कांहीं करावयाचे नाही परंतु तिचे दुसरे मन सूर्याला बोलावत होते. त्या द्विधा मनस्थितीत पृथा पुढे काय होते ते समजण्याच्या अवस्थेत नव्हती. पृथा त्याला सांगते कीं, ती फक्त पहात होती कीं, तो मंत्र खरोखरच काम करतो कीं नाही. परंतु त्या तिच्या बोलण्याचा प्रभाव सूर्यावर होत नव्हता. तिचे वैषयिक मन त्या मंत्रामुळें जास्त प्रभावी झाले होते. ते त्याला बोलवत होते. शेवटी पृथाच्या तारुण्यसुलभ वैषयिक मनाप्रमाणे सूर्यदेव त्याचे कर्तव्य पूर्ण करतो व परत जातांना त्या विपन्नावस्थेत असलेल्या कुंतीभोजाच्या कन्येस सांगतो कीं , आपल्या समागमामुळें तुला एक दिव्य शक्ती असलेला पुत्र होणार आहे. पुढे सूर्य तिला सांगतो कीं, त्यानंतर तिला भेटण्यासाठी यम, वायू, इंद्र, असे सगळे ह्या सृष्टीच्या कारक देवता तुला प्रत्येकी एक पुत्र देणार आहेत असे होण्याचे कारण तसे विधान आहे. त्यात तू किंवा कोणी बदल करू शकणार नाही. असें बोलून सूर्यदेव आकाशातील त्याच्या दुसर्या भागात विलीन होतो. ते सगळे पृथा तिच्या दिव्य दृष्टीने पहात असते. त्यानंतर ती दिव्य दृष्टी जाते व पृथा तिच्या वास्तविक नजरेने सगळे पाहू लागते.

वैशंपायन पुढे सांगतात, तिच्या सामान्य दृष्टीने ती आकाशात पहाते तो ती त्या तळपणार्या सूर्यबिंबाकडे पाहू शकत नाही. तिला ते सगळे नवीन होते व त्याचे तिला विलक्षण कौतुक व आश्चर्यसुद्धा वाटत असते. थोड्या काळानंतर काय झाले आहे ते सगळे तिला समजते व

ती कमालीच्या विचित्र प्रकारच्या विवंचनेत पडते. कारण उघड आहे जनमेजया, कुती अजून कुमारिका होती व आता तिला सूर्या पासून एक पुत्र होण्याचे घाटत होते. तिला कळेना काय होणार तिचे. ती कोणालाही ते सगळे सांगू शकत नव्हती. कारण, कोणीही तिच्या त्या बोलण्यावर विश्वास ठेवला नसता. मोठी कुचंबणा तिची झाली होती. एकाच वेळी भिती, दुःख आणि आनंद असा मिश्र भाव तिच्या चेहर्यावर दिसत होता. ती पूर्णपणे निर्दोष होती, अजाण होती, केवळ एका कुतूहलापायी ती एका मोठ्या अडचणीत गेली होती. ती सूर्याला सांगते कीं, ते बाळ तिला नको कारण, ती अजून कुमारिका आहे व असे झाले तर ती कुमारिका रहाणार नाही व मग तिचे लग्न होणार नाही. ते ऐकल्यावर सूर्यदेव तिला सांगतो, "मुली त्याची काळजी करू नकोस कारण तो पुत्र झाल्यावर तू पुन्हां कुमारिका होणार आहेस"! ती कुंतीभोजाची कन्या ते ऐकून आणखीनच नवल करू लागते. सूर्यदेव तिला सांगतो कीं, हे सगळे विधीलिखित आहे व त्यात तिचा कांहीं दोष नाही तसेंच त्या तिच्या पुत्राची पुढची सोय सुद्धा झालेली आहे. त्याचा तिला अजिबात त्रास होणार नाही. त्या मुलांमुळें तुझे नांव जगभर गाजत राहिल असे बोलून तो तिला दिसेनासा होतो.

अशारितीने कुंडल हरण पर्वाचा चौदावा भाग संपला .

# कुंडल हरण पर्व
## भाग पंधरावा

वैशंपायन पुढे जनमेजयाला सांगत असतात, तुला त्या सूर्यदेवात व पृथात काय संवाद झाला ते सविस्तरपणे ऐकायचे आहे, तर ते संभाषण तुला मी सांगतो. त्या लहान वयाच्या कुंतीने कितीतरी गोड शब्दात सूर्य देवाला समजावून सांगितले कीं तिला त्याच्याशी संबंध नको आहे. तिने फक्त हे अजमावण्यासाठी तो मंत्र उच्चारला कीं खरोखरच त्यामुळें देवता येते कां? नंतर ती त्याला बोलते, "आता मला समजले की, हो, खरोखरच देवता त्या मंत्राच्या उच्चारणाने येते. तेव्हां आता तू तुझ्या ठिकाणी म्हणजे आकाशात जावे". परंतु, त्याने त्या देवाचे समाधान झाले नाही. तो तिला सांगतो, "मुली, जर मला असें तुला सुख न देता जावे लागले तर ते पहा तेथे सृष्टीचे इतर कार्यकर्ते माझ्याकडे पहात आहेत. तो पहा इंद्र मला हसत आहे. त्या पलिकडे यमदेव तसाच मला हसत आहे. ते मला सहन होत नाही". सूर्यदेव तिला समजावण्याचा प्रयत्न करत असतो, "ह्या मंत्राने बोलावलेला देव तुला संभोग सुख देण्यासाठीच येऊ शकतो. जर मला असें तुला स्पर्श न करता जावे लागले तर मी तुला, त्या ऋषीला व तुझ्या पित्याला शाप देऊन भस्म करून टाकीन. कारण हा माझा अपमान असें मी समजत आहे. देवांना गंमत म्हणून बोलावणे हे कोठल्याही नितीशास्त्रात मान्य नाही". कुंती समजते कीं तिने एक अक्षम्य चूक केली आहे, चूक म्हणावयाचे कारण ती अज्ञानाने व अननुभवामुळे झाली होती म्हणून ते पाप निश्चितच नव्हते. परंतु, त्यामुळें देवतेचा अपमान झाला म्हणून ती देवता तिला शासन करू शकते. त्याप्रमाणें तो रागावलेला सूर्यदेव तिला शाप देणार हे ती समजते.

देवता व विधाता (स्वयंभू, परमात्मा) ह्यात मोठा फरक असा असतो कीं, देवतांना सहा दोषातील कोणते तरी तीन दोष असतात परंतु, विधात्याला कोणताही दोष नसतो, माणसाला ते सगळे सहा दोष बाधत असतात.

कुंती विचार करते , माझ्या ह्या अशा पोरकटपणामुळें माझ्या पित्याचे व त्या ऋषीचे भस्म होणार असेल तर त्याचे पातक पुन्हा माझ्याच माथी लागेल, ते तिला मान्य नव्हते. त्यातून एकच मार्ग होता व तो असा किं, त्याच्या हवाली आपला देह करावा व गुपचुप जे

घडेल ते सहन करावे. तरीसुद्धा अशारितीने एका महिलेने तिचे शरीर कोणा पुरूषाच्या हवाली करणे धर्मशास्त्राला मंजूर नाही हे ती जाणत असते. ती त्याला समजावणीच्या सुरात सांगते, "अहो सूर्यदेव महाराज, मला समजून घ्या जरा, मी एक अविवाहीत अबला आहे, माझ्या देहाचा निर्णय मी घेऊ शकत नाही हे आपण जाणता. माझ्या पित्याच्या परवानगीशिवाय मी माझा देह आपल्या हवाली कसा करू शकेन ते पहा. ते नितीशस्त्राच्या विरुद्ध आहे म्हणून तुम्ही मला माफ करा व येथून जा". सूर्यदेव तिला बोलतात, "ह्या गोष्टींशी माझा कांहीं संबंध नाही. तू तुझ्या पित्याची परवानगी घेऊन मला बोलावले कां एरव्ही हा माझा विषय नाही. मला बोलावण्या आधी तू ह्या सगळ्या गोष्टींचा विचार करावयाला पाहिजे होते, आता हे बोलून तू स्वताला निष्पाप दाखवण्याचा प्रयत्न करत आहेस, त्यासाठीच मी, तुला व तुझ्या पित्याला व त्या ऋषीला ज्यांने हा मंत्र एका नासमज, बेजबाबदार मुलीच्या कडे सोपवला आहे शाप देईन. तुम्ही सगळे माझे गुन्हेगार ठरतात. तू वयात आली आहेस हे जाणत असतांना नासमज, निष्पाप असल्याचे जे ढोंग करत आहेस त्यांने मी बधणार नाही. कोणत्याही व्यक्तीने त्याने केलेल्या कामाची जबाबदारी घेणे हेंच निताशास्त्रात सांगितले आहे. त्याप्रमाणें तुझे वागणे सरासर चुकीचे व म्हणून अक्षम्य आहे".

वैशंपायन पुढे जनमेजयाला सांगतात, त्या संभाषणानंतर पुरती घाबरलेली कुंती काय करावे ते न समजल्यामुळें तशीच कांहीं काळ तेथे त्या शय्येवर पडून होती. ती विचार करत असते, जर ती सूर्याच्या हवाली आपले शरीर देऊन मोकळी होईल तर मग पित्याला काय जाब देणार आणि जर नाही, तर तो रागावलेला सूर्य तिघांना शाप देऊन जाईल. त्यामुळे जी हानि होणार ती कितीतरी जास्त भयंकर असणार, त्यापेक्षा आपण त्याच्या हवाली आपले शरीर देऊन टाकावे व मग जे होईल त्याचे तेव्हां पाहू, असा विचार ती करत होती. थोडा विचार केल्यावर ती सूर्याला बोलते, आपले म्हणणे रास्त आहे, मी अक्षम्य चूक केली आहे पण आपण देव अहात व त्यामुळे आपण मला माफ नाही कां करणार? जर विवाहा आधीच माझे कौमार्य भंग झाले तर माझे नातेवाईक माझ्या तोंडात घाण घालतील व माझ्या आई व पित्यांना समाजात तोंड दाखवण्याची जागा रहाणार नाही. त्याचा जरातरी विचार करा आपण". सूर्यदेव तिला आश्वासन देतो कीं, "अशा

दैविक संबंधाने मुलीचे कौमार्य नष्ट होत नाही. त्यामुळे ती तुझी चिंता निराधार आहे". त्याशिवाय अशा दैविक संबंधांवर अनेक दिव्य शक्तींची कृपा होत असते. त्याकरतां तुला जी धास्ती वाटते कीं तुझे सामाजिक जीवन व तुझ्या आप्तांचे जीवन अडचणीत येईल तीसुद्धा निराधार आहे". त्यानंतर मात्र कुंती त्याला बोलते , "आपण ज्ञानी अहात व आपल्यामुळें माझे कांहीं वाईट होईल, असें जर कांहीं होणार नसेल, तर मी आपली विनंती मान्य करते व माझे शरीर आपल्या आधीन करते. मला माहीत आहे कीं, सगळ्या चराचरांचे भवितव्य आपल्या हाती असते केव्हां माझे कांहीं आपल्यामुळें वाईट होईल असें मला वाटत नाही". कुंतीचे ते उद्गार ऐकू न सूर्यदेव तिला बोलतात, "अहो मधूर हास्य असलेल्या तुला तुझे कोणीही आप्त त्याग करणार नाहीत हे माझे तुला वचन आहे. तुझे सदैव भलेच होणार आहे. आता माझे ऐक, कन्या म्हणून जी आपल्या इच्छा व्यक्त करू शकते ती तिच्या इच्छा पूर्ण करण्यासाठी मुक्त असते. म्हणून तू तुझ्या मनाप्रमाणे करण्यास मुक्त आहेस. तसे केल्यामुळें तुला कोणताही दोष लागत नाही. विशेष करून, माझ्या बरोबर येण्याने तुला कांहींच दोष लागत नाही. कारण देव पाप करत नाहीत व त्यांच्या बरोबर असलेले सुद्धा नेहमी निष्पापच रहातात. जे असुरांच्या बरोबर असतात ते मात्र सदैव पापातच असतात. हा फरक लक्षात घे. पुढे तो बोलतो, "मुली. मला कल्पना आहे कीं मर्यादा तत्त्व श्रेष्ठ आहे परंतु, ह्या ठिकाणी ते तत्त्व लागू होत नाही. कारण ज्या मंत्राने तू मला बोलावले आहेस तो मत्र व त्याचे कार्य ह्या ठिकाणी श्रेष्ठ ठरते. शिवाय माझ्याशी होणार्या संबंधामुळें, तुझे कौमार्य अबाधित रहाणार असल्याने तुला चिंता करण्याचे कारण नाही. माझ्या वीर्यातून होणारा पुत्र महायोद्धा असेल, त्याचा तुला नेहमी अभिमान वाटत असेल तो तुझ्या मातृत्वाची महती सर्वदूर वाढवेल". कुंती ते ऐकल्यावर थोडी उत्तेजित होते व सूर्याला बोलते, "माझा तुझ्यापासून होणारा मुलगा जन्मतः सुरक्षित असला पाहिजे, त्यासाठी त्याला जन्मतः अभेद्य चिलखत उरावर व कानात कुंडल असावीत. ती अमृतानी प्रभावीत असावीत त्यामुळें तो कधीही कोणाकडून पराजित होणार नाही".

ते कुंतीचे ऐकू न सूर्य तिला सांगतो कीं, जसे ती बोलते तसेच होईल. ते ऐकल्यावर कुती सूर्याबरोबर समागमास तयार होते. ती बोलते, ज्यांने सगळ्यांचे भले होणार असेल ते जरी

वरकरणी अभद्र वाटत असले तरी ते हितकारक असल्याने त्याला विरोध करू नये. असें बोलून ती आपले सुकुमार शरीर त्याच्या हवाली करते. सुर्य कुंतीला सांगतो जी कुंडल मी आपल्या मुलाला देणार आहे ती मला अदितीने दिली आहेत. ती अमृतात भिजवलेली आहेत. त्यामुळें ती नेसणारा कधीही मरणार नाही. त्या आणाभाका झाल्यावर ते एकत्र येतात.

वैशंपायन पुढे सांगत असतात, तो योगसिद्ध स्वर्भानू सुक्ष्म होऊन कुंतीमध्ये तिच्या नाभितून शिरतो त्यामुळें ती बेहोष होते. तिला कांहीं समजत नसते. कांहीं काळाने तो स्वर्भानू तिच्या तोंडातून बाहेर येतो. तिला सांगतो, "मुली आता माझे काम झाले आहे, मी जात आहे. तुझा मुलगा लोकोत्तर क्रांती करणारा असेल व तू त्यानंतरसुद्धा कुमारीच असशिल". सूर्यदेव निघून जातात.

वैशंपायन सांगतात, जनमेजयाला, तो जाणार तेव्हां ती लाजाळू ललना एकदम उठते व त्याला बोलते, "आपण जसे बोलता तसेंच होवो". त्यानंतर पुन्हा ती मृच्छा आल्यासारखी त्या मऊशार बिछान्यावर झोपून जाते. अरे राजा, ह्या देवतांना माणसाप्रमाणे वीर्य नसते कारण त्यांना मर्त्य देह नसतो. ते त्यांच्यातील अंश गर्भात सोडतात व त्यामुळें तो गर्भ वाढत जाऊन त्यांचा अंशावतार जन्म घेत असतो. ते माणसापेक्षा वेगळे आहे. त्यामुळें त्या कुंतीची योनी अबाधित होती . स्वर्भानू गेल्यावर कांहीं तासांनी ती ध्यानावर येते.

अशारितीने कुंडल हरण पर्वाचा पंधरावा भाग संपला .

# कुंडल हरण पर्व

## भाग सोळावा

वैशंपायन सांगत असतात, अरे राजा जनमेजया, वर्षाच्या दहाव्या महिन्याच्या शुक्ल पक्षात कुती एका पुत्राला जन्म देते. त्याचे तेज साक्षात स्वर्भानू असावा असें होते. ते होईस्तोवर त्या मुलीने आपण गरोदर आहोत ही गोष्ट सगळ्या आप्तांपासून लपवलेली असते. फक्त एका सेविकेला त्याची माहीती असते कारण ती कुंतीच्या सूर्याशी झालेल्या संभाषणाची साक्षदार असते. कुंतीवरील मोठ्या प्रेमांने त्या सेविकेने ते गुपित राखलेले असते. कुती पहाते कीं, त्या मुलाच्या कानात कुंडलं आहेत व चिलखत त्याच्या उराला चिकटलेले आहे. ते पाहून सूर्याने दिलेला शब्द पाळला हे ती समजते. त्याच्या कानातील कुंडलं तेजांनी चमकत होती . तिला मदत करणार्या सेविकेच्या मदतीने ते बाळंतपण उरकले व ते बाळ एका प्रशस्थ लाकडाच्या खोक्यात लपवून ठेवले. त्याला निजण्यासाठी मऊशार गुबगुबीत उशी होती व तो लहान जीव त्यात शांतपणे झोपलेला होता. त्या खोक्याला मेणाचा थर दिलेला होता. तिच्या सेविकेने दिलेल्या सल्ल्यानुसार ती ते बाळ असलेले खोके घेऊन अस्वा नदीच्या किनारी घेऊन जाते. तिला माहीत असते कीं, तिने एका बाळाला जन्म दिला आहे हे जर कळले तर काय होईल तिच्या परिवारात, त्याची साधी कल्पनासुद्धा करण्याची तिच्यात हिम्मत नसते. अतिशय दुःखी अंतःकरणाने ती ते करणार असते. परंतु, दुसरा कोणताही मार्ग तिली दिसत नव्हता. त्या बाळाला ती त्या नदीच्या हवाली करणार असते. ते लाकडाचे खोके आता त्या बाळाचे भवितव्य ठरवणार होते. ते खोके अस्वा नदीच्या संथपणे वहाणार्या पाण्यात ती सोडणार असते. तिला अश्रू आवरत नसतात. पुन्हा पुन्हा ती ते खोके उघडून त्यातील तेजस्वी बालक पहात असते. त्याला सोडण्याची तिला इच्छा नसते पण तिची सेविका तिला तसे करण्याचा आग्रह करत असते व एकापरिने तिचा सल्ला सुद्धा कुंतीच्या हिताचाच दिसत होता . म्हणून कुंती तसे करणार असते. ती ते बाळ असलेले खोके अखेरीस अस्वा नदीच्या पाण्यात सोडते. सूर्याला ती शेवटची हांक मारते व ह्यापुढे तुझ्या ह्या बाळाची तूंच रखवाली कर असे त्याला सांगते. कुंतीच्या नजरेसमोर ते बाळ असलेले खोके त्या नदीच्या प्रवाहात पुढे पुढे

वहात जाते. अगदी दूर पर्यंत ते जात असतांना कुती त्या खोक्याचे पाण्यावर हिंदकळणे जीव मुठीत धरून पहात असते. अखेरीला ते खोके तिच्या नजरे पलिकडे निघून जाते, दिसेनासे होते. कुंतीमात्र तेथेच तशीच बसून असते . जीवनातील एक मोठा निर्णय तिने घेतलेला असतो, तो योग्य कां अयोग्य ते केवळ नियति ठरवणार असते. कुंतीचे अश्रू थांबत नव्हते. तिची मैत्रिण तिला धीर देत असते. एक बाई म्हणून ती कुंतीच्या वेदना समजू शकत असते. त्या अभागी बालकाला त्याच्या खर्या मातापित्यांचे प्रेम मिळणार नाही ह्याचे दुःख त्या सेविकेला सुद्धा होत असते. पण गोष्टी तशाच विलक्षण होत्या ज्यांवर त्यांचा ताबा नव्हता. माझ्या बाळा तुझे कल्याण हो असे कुती सतत बोलत असते पण तिला तिचे अश्रू कांहीं केल्या आवरत नसतात. ती विधात्याकडे प्रार्थना करत असते कीं, तिच्या मुलाचे जीवन सुरक्षित हो, त्याच्या विरोधकांचा नाश हो. तो सदैव अजिंक्य राहो. असें बोलत असतांनासुद्धा ती रडतच होती. ती पंचमहाभूतांना आळवणी करते कीं, त्यांनी तिच्या बाळाची काळजी घ्यावी. सूर्यदेवाला सांगते कीं हे तुझे अपत्य मी तुझ्या हवाली करत आहे. त्याचे संरक्षण आता तूंच करशिल. ती पुढे सगळ्या देवांना, आदित्य, वसु, इंद्र, साध्य, मरुत आणि विश्वदेव अशा सगळ्यांना त्या बालकाची काळजी घेण्याची वारंवार विनंती करत असते. सगळ्या दिशांना सुद्धा ती विनंती करत असते कीं त्यानीसुद्धा त्या बालकाची निगा राखावी. कुंती त्या बाळाला निरोप देतांना त्याला बोलते , "माझ्या बाळा मी तुला कोठेही ओळखेन तुझ्या कानातील कुंडलांमुळें व अंगातील चिलखतामुळें. कुंतीला आता चिंता वाटू लागते कीं, आता जर त्याला तहान लागली तर कोण त्याला दूध, पाणी पाजणार? अशा विचारांनी ती बेचैन होते. त्याच वेळी कुंती त्याचे स्वप्न पहात असते. ती विचार करते किं ती ते शोधून काढील कीं ते कोठे गेलं व नंतर त्याला दत्तक घेईल व त्या मार्गाने तिचा बाळ तिला पुन्हा मिळेल अशा कल्पनांत ती रमून जाते. अशा मार्गाने जर ती त्याला स्वीकारेल तर ते समाजाच्या दृष्टीने ग्राह्य असेल. असें विचार ती करत असते. ते बाळ तिच्या समोर रांगत असल्याचे ती पहात असते. एका मातेचे मन फक्त दुसरी माताच समजू शकते. कुंतीला त्याचे बोबडे बोल ऐकू येत असतात, तिच्या मनात सर्वस्वी तो बालक भरलेला होता. मोठा झाल्यावर तो कसा चालत असेल, तो कसा तिला आलिंगन देईल, अशा कल्पनात ती रमली होती परंतु, प्रत्यक्षात ते बालक

तिच्या पासून फार दूर दूर जात होते. ती ते करत होती तेव्हा मध्यरात्र होती त्यामुळें ते पाण्यात तरंगत जाणारे खोके ती पाहू शकत नव्हती. कोणाला कळू नये म्हणून ती वेळ तिने ठरवली होती. त्यानंतर त्या दोघी घरी जातात परंतु, दुसर्या दिवशी कुंती पुन्हा त्या जागी येते पण ते खोके तेथे नव्हते. एका परिने कुंतीला पश्चात्ताप होत असतो कीं तिने त्या निरागस अर्भकावर घोर अन्याय केला आहे केवळ स्वताच्या नांवासाठी. ती समजते कीं, तिचे तसे करणे एका मातेला न शोभणारे होते. म्हणून ती ते खोके तेथे असेल अशा आशेने त्या ठिकाणी गेली होती परंतु, ते खोके वाहून गेले होते. रडत ती कन्या मागे फिरते. ती आता स्वताला दोष देण्यापलिकडे कांहींही करू शकत नव्हती. त्या प्रमादाबद्दल ती स्वतःला कधीही माफ करू शकणार नव्हती. तो पर्यंत ते खोके अस्वा नदीतून चर्मनवती नदीत गेलेले होते. तेथून ते यमुना नदीत जाणार होते. त्यातून ते पाण्यावर तरंगत गंगा नदीत गेले होते तोपर्यंत. तसे जात ते खोके चंपा नगरीच्या किनार्याला येते. चंपा नगरीवर एक सुत वंशाचा राजा राज्य करत होता. ते खोके तेथे किनार्याला लागले तरी ते बाळ शांतपणे निजलेले होते. त्याचे अमृताचे कुंडल व दैवी चिलखत त्याचे संरक्षण करत होते.

अशारितीने कुंडल हरण पर्वाचा सोळावा भाग संपला .

# कुंडल हरण पर्व

## भाग सतरावा

वैशंपायन पुढे सांगतात, त्या सुमारास एक सुतकुलिन सारथी त्याच्या पत्नीबरोबर त्या किनार्याला आला होता सूर्याची पुजा करण्यासाठी. त्या जोडप्याला मुल होत नव्हते म्हणून ते दररोज त्या किनार्याला येऊन उगवत्या सूर्याची प्रार्थना करत असत. त्या नित्य क्रमाप्रमाणे ते उभयता गंगेच्या किनारी आले होते. त्यांना ते खोके सावकाशपणे किनार्या लगत वहात असतांना दिसते. तो सारथी ज्याचे नांव होते, अधीरथ व त्याची अप्रतिम सौंदर्य लाभलेली बायको, राधा ते पहातात व त्यात काय आहे त्याचे कुतूहल स्वाभाविकपणे त्यांच्यात उत्पन्न होते. अधीरथ पाण्यात उतरून ते खोके किनार्यावरील वाळूत आणतो. त्याचे झाकण उघडल्यावर त्यांना त्यात कुंतीचा पुत्र शांतपणे निजलेला दिसतो. ते पाहून ते दोघे नवल करतात. राधा अधीरथाला सांगते कीं, "सूर्यानेच ते बालक त्यांना दिले आहे". राधा त्या अर्भकाला कुशीत घेते व काय आश्चर्य, तिला पान्हा फुटतो व त्या नुकत्याच जागे होत असलेल्या बालकाला पहिला आहार राधेच्या कुशीत मिळतो. ते बालक तिचे दुध पित रहाते व त्यानंतर ते दोघे ठरवतात कीं, त्यांना सूर्यदेवांने प्रसाद दिला आहे. त्यांचा आनंद गगनात मावत नाही. सूर्यदेवाचे अनंत आभार मानत ते जोडपे त्या बालकाला घेऊन त्यांच्या घरी जाते. त्या बालकाच्या अंगावरील सोन्याची कुंडल व चिलखत पाहून ते समजतात कीं हा कोणीतरी अनौरस संतान परंतु, अतिउच्च कुलिन आहे. अनौरस असल्याने त्याला अशारितीने पाण्यात सोडले आहे. राधा त्याला सांगते कीं, आता हा आपला आहे व त्याचे नांव त्याच्या अंगावरील दागिन्यावरून वसुसेन असें ठेवतात. वसुसेन अधीरथाचा मोठा मुलगा अशा प्रकारे त्याच्या कडे वाढत असतो. त्याच्या उत्तम लक्षणामुळें नंतर अधीरथाला व राधाला आणखीन मुलं होतात. वसुसेन ज्याचे दुसरे नांव ठेवले होते, वृष त्या सारथ्याच्या कुळाचा अविभाज्य हिस्सा झाला होता.

कुंतीभोजाची कन्या यथावकाश ते समजते कीं, चंपा नगरीतील कोण्या सुताला एक लाकडी खोका गंगेच्या किनारी सांपडला होता, त्यात एक सुंदर बालक होते व त्याच्या अंगावर त्या बालकाला चिकटलेले असें कुंडल व चिलखत होते . कुंती समजते कीं तिचा

पुत्र अंग घराण्यातील एका सुतकुळातील सारथ्याच्या घरात वाढत आहे. विशेष करून त्या विलक्षण स्वरुपामुळे ते बालक जास्त प्रसिद्ध झाले होते व त्याला पहाण्यासाठी लोक अधीरथाकडे जात होते. त्यामुळे ती वार्ता कुंतीला समजणे सोपे झाले होते . पुढे तो सारथी धृतराष्ट्राच्या सेवेत जातो व तेथे त्या तेजस्वी बालकाची छाप सगळ्यांवर पडते, तो सगळ्यांना आवडू लागतो. अधीरथ त्याला उच्च कोटीचे शिक्षण देण्याचा निर्धार करतो व म्हणून ते बालक द्रोणाचार्यांच्या पाठशाळेत शिकण्यासाठी जाऊ लागते. तेथे त्याच्या तरल स्वाभाविक युद्ध कौशल्यामुळें तो द्रोणाचार्यांना आवडू लागतो. तेथे ते सगळे म्हणजे पांडव, कौरव आणि वसुसेन एकत्र शिकत असतात. त्यामुळें त्याचा संबंध दुर्योधनाशी येतो व तो त्याचा जिवलग मित्र होतो. दुर्योधनाचे पांडवांशी असलेले वितुष्ट त्याला समजते म्हणून मित्राचा शत्रू तो आपला शत्रू ह्या नात्यांने वसुसेन पांडवांचा राग करू लागतो. त्या त्याच्या वागण्यामुळें तो दुर्योधनाला आणखीन आवडू लागतो. जेव्हां संधी मिळेल तेव्हां तो फाल्गुनीला आव्हान देत असे. दुर्योधनाच्या चाणाक्ष नजरेतून कुंतीची त्या वसुसेना बद्दलची भावना सुटत नाही व त्याला समजते कीं, वसुसेन हा कुंतीचा अनौरस मुलगा आहे. ते त्याला समजण्याचे कारण कुंती स्वतःच एकदा दुर्योधनाला ते सांगते व वसुसेनाला चांगले वागवण्याचे नेहमी सांगत असते. वसुसेनाचे युद्ध कौशल्य पांडवांना सलत असते. विशेष करून युधिष्ठीराला ते त्याचे कौशल्य व दुर्योधनाशी त्याची असलेली संगत पसंत नसते. जरी तो कुंतीचा मुलगा असला तरी तो सुतांच्या वंशाप्रमाणे वाढवला गेला होता. वसुसेनाचे कुंडल व चिलखत पाहून युधिष्ठीराला समजले होते कीं, तो सहसा हरणार्यांपैकी नाही. त्याचे सूर्याची दुपार पर्यंत ध्यान साधना करणे पाहून कुंतीला फार संतोष होत असें. ब्राह्मण त्याच्या कडे जे मांगत ते तो त्यांना विनासंकोच देत असे. त्याच्या त्या दानशूर पणामुळें त्याला कर्ण असें नांव पडले ते शेवटपर्यंत चालू राहिले कारण तो अखेरपर्यंत तसाच दानशूर राहीला होता.

अशारितीने कुंडल हरण पर्वाचा सतरावा भाग संपला .

# कुंडल हरण पर्व (समाप्त)

## भाग अठरावा

वैशंपायन जनमेजयाला सांगत असतात, यथावकाश इंद्र एका ब्राह्मणाच्या रुपात कर्णाकडे येतो. त्याला पहाताच कर्ण त्याला ओळखतो व त्याचे आदरपूर्वकपणे स्वागत करतो. त्यानंतर नेहमीप्रमाणे तो त्या ब्राह्मणाला काय दान पाहिजे म्हणून विचारतो. त्यात तो म्हणतो, "बोला महाराज, आपल्याला कसले दान पाहिजे सोन्याचे गळ्यातील माळा, एकादी सुंदर बालिका, कां गाई, काय आपल्याला माझ्याकडून पाहिजे ते सांगा. ते ऐकून तो ब्राह्मणाच्या वेषातील शक्र त्याला बोलतो, "मी तुझ्याकडे सोन्याची माळा, सुंदर ललना अथवा गाई मागण्यासाठी आलेलो नाही. ज्यांना ते हवे असतील त्यांना तू ते जरूर दे. मला तुझे कुंडल व चिलखत जे तुझ्या अगाला चिकटले आहे ते दानात पाहिजे आहे . जे घेऊन तू जन्मला आहेस. जर तू तुझ्या दानशूरतेच्या व्रताशी प्रामाणिक असशिल तर तू ते मला देऊन दाखव. मला जास्त वेळ नाही म्हणून तू ते मला लवकर काढून देशिल. त्या दानासारखे दुसरे दान नाही माझ्यासाठी". त्या ब्राह्मणाचे ते बोलणे ऐकल्यावर कर्ण त्याला सांगतो, "अहो ब्राह्मण, त्यापेक्षा तुला उपयोगी येणार्या बर्याच गोष्टी माझ्याकडे आहेत, त्या तू घे कारण, हे कुंडल व चिलखत कोणाच्याही उपयोगाचे नाही . जर ते माझ्यापासून काढले गेले तर ते नाहीसे होतील कारण ते सूर्याकडून मला मिळालेली भेट आहे व ती इतर कोणालाही उपयोगाची नाही, असे असल्यामुळे मी तुला असे कांहीं देतो जे एका ब्राह्मणाला जास्त उपयोगाचे असेल. माझे कुंडल व चिलखत म्हणून कोणालाही देत नाही, ते घेऊन तू त्याचे काय करणार हे सांगशिल तर बरे होईल".

वैशंपायन जनमेजयाला सांगतात, कीं, तो ब्राह्मण सांगतो कीं, "त्याला दुसरे कांहीं नको आहे कारण, ही तुझ्या दानशूरतेची परीक्षा आहे व परीक्षेत नेहमी कठीण प्रश्न विचारले जातात तसा हा प्रकार आहे असें समजून तू बर्या बोलांने ते मला दे अगर देऊ नको, काय तो निर्णय त्वरित घे, कारण माझ्याकडे जास्त वेळ नाही. मला तुझ्याकडून इतर कोणताही वर नको आहे". असें तो ब्राह्मण कर्णाला बजावतो. तरीसुद्धा कर्णसुद्धा इंद्राची परीक्षाच घेत असतो व त्यासाठी इंद्राची किती चिकाटी आहे ते तपासण्यासाठी पुन्हा पुन्हा तो त्या

इंद्राला दुसर्या कांहीं दान मागण्याचा आग्रह करत रहातो. ब्राह्मणरुपातील इंद्र सुद्धा हटण्यास तयार नसतो. असें त्यांचे बोलणे होत असते. कर्ण त्याला सांगतो, "माझे हे दागिने माझ्या अंगाला कायम चिकटलेले असल्यामुळें ते देणे अशक्य आहे. त्यातील कुंडलं अमृतात केलेली आहेत त्यांच्यामुळें मला कोणीही पराजित करू शकणार नाही अशी ती व्यवस्था माझ्या माता व पित्यांनी केलेली आहे. म्हणून ते सोडून इतर कांही मांग व माझ्या दानशूरतेची हवीतशी परीक्षा घे. पाहिजे तर माझे सगळे राज्य मी तुला दान करण्यास तयार आहे, जे तुझ्या मोठ्या उपयोगाचे ठरेल. ही कुंडलं व हे चिलखत माझ्या अंगातून काढल्यावर ना तुझ्या कामाचे ना माझ्या कामाचे असेल हे समजून घे.
वैशंपायन पुढे सांगतात, बराच वेळ ते संभाषण होत असते व कर्ण समजतो कीं हा कोणी ब्राह्मण नाही तर सूर्यदेव बोलले त्याप्रमाणे प्रत्यक्ष इंद्र आहे व तो गालातल्या गालात हसू लागतो. तो त्याला सांगतो कीं, त्यांने ब्राह्मणाच्या वेषात प्रत्यक्ष अर्जुनाचा जन्मदाता आला आहे हे ओळखले आहे. इंद्राला समजते कीं त्याची लबाडी फसली आहे. पुढे कर्ण त्याला सांगतो, "आपण देवांचे नेते अहात, आपल्याला माझ्या कुंडलांचे व चिलखाताचे कांहीं उपयोग नसतांना ते कां मागत अहात ते सांगाल तर उत्तम, कारण आपण खरे ब्राह्मण नसल्यामुळे आपल्याला मी माझ्या व्रतानुसार दान करण्यास बांधलेला नाही. आपण खोटे कां व कोणासाठी वागत अहात ते जर सांगाल तर मी माझ्या व्रता प्रमाणे आपल्याला कांहीं अटीवर ते दोनही देण्यास तयार आहे. तेव्हां, अहो देवांचे राजे सांगा, कोणासाठी आपण एवढे खाली घसरला अहात? असे दान मागणे ब्राह्मणाच्या काम करण्याच्या पद्धतीत येत नाही हे आपण चांगलेच जाणता त्यामुळें असे दान मागून आपण आपले स्थान भ्रष्ट करत अहात, (ब्राह्मणाला यजमानाकडे काय मांगता येते त्याबद्दल कांहीं नियम आहेत, त्याप्रमाणे शरिरीचा हिस्सा मांगता येत नाही.) त्यामुळें आपली सर्व ज्ञानी लोकांत नालास्ती होणार आहे. हे तुमच्या लक्षात येते कां? त्यापेक्षा आपण एक व्यवहार करू, त्याने तुमची नालास्ती होणार नाही व माझे दानशूरपण सुद्धा सिद्ध होईल. बोला देवांचे राजे, काय करता ते त्वरित सांगा कारण आता मलासुद्धा तुमच्यासाठी जास्त वेळ नाही". स्वाभिमानी कर्णाचे ते बोलणे इंद्राला फार लागले परंतु, त्याला दुसरा मार्ग नव्हता. कर्ण नंतर सांगतो कीं, "अहो देवांचे राजे, आपण येण्या आधी माझे जन्मदाते व माझे आराध्य

दैवत सूर्यदेव मला भेटून तुमच्या योजने बद्दल सांगून गेले होते. मी तुमच्या येण्याचीच वाट पहात होतो. माझ्या कुंडल व चिलखताच्या बदल्यात मला तुमचा शर (लहान बाण जो हातांने मारला जातो, इंग्रजीत डार्ट) द्या ज्यांने मी माझ्या शत्रूचा नाश करू शकेन". शक्र त्यावर सांगतो कीं, "एक शलाक (शर) मी तुला देईन, जर तू वज्र मागितले असतेस तर ते मी तुला दिले नसते. परंतु, त्याचा वापर तू फक्त एकदाच करू शकशिल. त्यानंतर तो शलाक माझ्याकडे परत येईल हे तुला मान्य करावे लागेल".

वैशंपायन पुढे सांगत असतात, इंद्राचे ते बालणे ऐकल्यावर कर्णाला फार संतोष होतो. त्याच्या लक्षात येते कीं, त्याचा उद्देश साध्य होणार आहे. त्यानंतर तो वसवाला बोलतो, "तू खरोखरच मला तुझा शलाक देणार आहेस, जो कधी आपला नेम चुकत नाही व जो शत्रूंचा नाश करूनच मग माझ्याकडे परत फिरेल". त्यावर इंद्र त्याचे एकचित्त करतो व त्याच्या शलाकाला बोलावतो. त्याचे ते शस्त्र इंद्राकडे येते. त्यानंतर तो देवांचा राजा कर्णाला सांगतो, "हे बघ सुत पुत्रा, हा शलाक तू फक्त एकदाच वापरू शकशील. त्यानंतर तो पुन्हा माझ्याकडे परत येईल". ते ऐकल्यावर कर्ण त्याला सांगतो, "माझा फक्त एकच शत्रू आहे, कारण मला फक्त त्याच्यापासून धोका आहे असें मी समजतो. तेव्हां ते मला मंजूर आहे". कर्णाचे ते ऐकल्यावर शक्र त्याला बोलतो कीं, तू ज्याच्यावर हा शलाक फेकशील तो कितीही मोठा लढवय्या असला तरी ह्यांने मारला जाईल. परंतू तू ज्याला तुझा खरा शत्रू समजतोस तो प्रत्यक्ष नारायणांने त्याच्या लिलेने सुरक्षित केला आहे, हे लक्षात ठेव". ते ऐकल्यावर आत्मविश्वासी असलेल्या कर्णाने ते सगळे मंजूर केले व तो शलाक इंद्राकडे मागितला. इंद्र तो शलाक त्याच्या हातात देतो आणि त्याला सांगतो, ह्या आयुधाचा वापर तू तेव्हांच करशिल जेव्हां तुझी दुसरी आयुध निष्प्रभ असतील. जर तसे नसतांना तू ह्याचा वापर करशिल तर ते तुझ्यावरच कोसळेल व तू नष्ट होशिल". पुढे शक्र त्याला बोलतो, "मी माझे वचन पाळले आहे आता तू तुझे पाळावेस". कर्ण त्याला बोलतो "मी तुला आश्वासन देतो कीं, ह्या आयुधाचा वापर मी तेव्हांच करीन जेव्हा माझे जीवन धोक्यात असेल".

कर्ण त्याला विचारतो कीं, "तसे ते देणे सोपे नाही कारण, जर ते दोनही माझ्या शरीरापासून कापून काढले तर माझे शरीर अस्वस्थ होणार आहे ते मला चालणार नाही

त्याचे काय? परंतु, जर तू मला माझे शरीर अस्वस्थ होणार नाही व ते एरवी प्रमाणेच कार्यक्षम असेल असा वर देत असशील तरच ते मी करू शकेन".

इंद्र त्याला बोलतो, "जर तू तुझे वचन पाळणार असशिल तर मीसुद्धा तुझे शरीर निर्दोष असेल असें करीन. ते पहिल्या सारखेच सर्व कामं करू शकेल. त्याचे तेज पूर्ववत असेल. फक्त तू साधारण माणसासारखा दिसशील. तुझ्या जन्मदात्या इतकेंच ते चमकत असेल".

वैशंपायन पुढे सांगत असतात, इंद्रा कडून तो तेजस्वी शलाक मिळाल्यानंतर कर्ण त्याच्या अंगात बसवलेले दोनही कवचं काढण्यास सुरूवात करतो. ते जसा तो करू लागतो, स्वर्गातील लोक गर्जनान करू लागतात. ते अंगात बसवलेले कवच काढतांना त्याला फार वेदना होत असतात. जसें ते निघू लागते स्वर्गातील गंधर्व अप्सरा नांच गाणे करू लागतात व त्यांची ढोलकी जोराजोराने वाजवू लागतात. आकाशातून स्वर्गीय फुलांचा सडा कर्णावर होऊ लागतो. अखेरीस बर्याच प्रयासानंतर ते दोनही त्याच्या अंगापासून वेगळे होतात. ते कर्ण इंद्राच्या हातात ठेवतो. त्यातून कर्णाचे रक्त सांडत असते. कर्णाचे शरीर भयंकर प्रकारे चिरफाड केल्यासारखे दिसत होते. चिलखत काढल्यानंतर तो त्याची कुंडलं काढू लागतो. जी त्याच्या कानाला चिकटलेली होती. ते सुद्धा काढून तो इंद्राला देतो. त्या त्याच्या दानशूरतेमुळें त्याला स्वर्गातून कर्ण असा किताब मिळाला. इंद्र ते घेतो व समजतो पांडवांचे काम झाल्यात जमा आहे. त्याच्या मुखावर हास्य चमकते. तो कर्णाच्या शरीराला हात लावतो व त्यामुळें कर्णाचे शरीर पुर्ववत होते. सगळ्या जखमा भरून येतात व तो माणसाच्या सारखा दिसू लागतो.

कौरवांना ते समजते कीं, कर्णाने त्याचे दैवी संरक्षण शक्राला काढून दिले आहे. त्यामुळें ते बेचैन होतात. त्याउलट पांडवांच्या गटात आनंदी आनंद साजरा होत असतो.

जनमेजय वैशंपायनाना विचारतो, "ते घडले तेव्हां पांडव कोठे होते? त्यांना ते वृत्त कोणी व कसें सांगितले ते सांगा". पुढे तो विचारतो, "बारा वर्षे होत आली होती त्यावेळी ते काय करत होते.

वैशंपायन त्याला सांगतात, सिंधच्या राजाचा पराभव केल्यानंतर व कृष्णा त्याच्या कडून सोडवून आणल्यानंतर, त्यांना समजते कीं, त्यांचे वनवासाचे दिवस संपत आले आहेत. व ह्यापुढे एक वर्षाचा अज्ञातवास करावयाचा आहे. त्या बारा वर्षाच्या प्रदीर्घ कष्टमय काळात

त्याना अनेक प्राचीन कथा मार्कंडेयांकडून व इतर लोकोत्तर ऋषींकडून समजल्या होत्या. आता ते त्यांचा कम्यक अरण्यातील आश्रम सोडून द्वैतारण्याकडे जाण्यासाठी निघतात. त्यांचा सगळा जामानिमा म्हणजे त्यांच्या गाड्या, रथ, पशु धन व आयुध सामुग्री ते हलवण्यास सुरूवात करतात. त्यांचे लहान मोठे साथीदार व ब्राह्मण सुद्धा त्यांच्या बरोबर निघण्याची तयारी करतात.

अशारितीने कुंडल हरण पर्वाचा अठरावा भाग संपला .

# दुसरे अरण्य पर्व (सुरू)

## भाग एकोणीसावा

जमनेजय राजा वैशंपायन ऋषींना विचारतो. आपल्या पत्नीच्या हरणानंतर तिला सोडवून आणल्यानंतर पांडव पुढे काय करतात?

वैशंपायन सांगतात, त्या दुःखदायक अनुभवानंतर युधिष्ठीर त्याचा भावंडांना व बायकोला घेऊन ते कम्यक वन सोडतो आणि त्यापेक्षा जास्य रमणीय अशा द्वैत वनाकडे निघतो. तेथे मोठी झाडं होती व खाण्यासाठी भरपूर फळं सुद्धा होती. तेथे ते राहू लागले. तेथे जी फळं खाण्यासाठी मिळत ती खाऊन ते व्रतस्थ जीवन जगू लागले. तसें ते शांतपणे आपले व्रतस्थ जीवन जगत असतांना एका ब्राह्मणाच्या मूर्खपणामुळें त्यांना एका संकटाला सामोरे जावे लागले. परंतु, त्यामुळें त्यांचे भवितव्य पुढे जास्त सुखरुप होणार होते. ते काय झाले त्याची माहिती आता तुला सांगतो. आता ते नीटपणे ऐक. एकदा काय झाले, एक दाणगट सांबर एका ब्राह्मणाने जमा केलेल्या होमाच्या काटक्यांत त्याची शिंग घालत होते. त्याच्या शिंगात ती लाकडं अडकली गेली. त्यात त्या ब्राह्मणाची दूध ढवळण्याची रवीसुद्धा होती. त्या ब्राह्मणाला त्या सगळ्या गोष्टी त्याचे कर्मकांड करण्यासाठी आवश्यक होत्या. त्यामुळें तो ब्राह्मण ती तक्रार घेऊन पांडवांकडे गेला. ते सांबर उड्या मारत त्या आश्रमात भटकत होते व विध्वंस करत होते. त्या त्या हरणाच्या कृत्यामुळें ब्राह्मणांचे अग्नीहोत्र बिघडले होते. त्याचे किती नुकसान झाले त्याचा आढावा तो ब्राह्मण युधिष्ठीराला देतो व कांहीं करण्यास सांगतो. त्या गोंधळ घालणार्या पशुचा कांही बंदोबस्त करा असा तो आग्रह करू लागतो. तो सांगतो कीं, त्याने ती होमाची लाकडे व ताक घुसळण्याची रवी एका झाडाला लावून ठेवली होती जसे तो नेहमी करत असतो. त्यासुमारास ते सांबर तेथे आले व त्याच्या अनेक शाखा असलेल्या व पसरलेल्या शिंगात उचलून ते उड्या मारत वेगांने निघून गेले. त्यान आडदांड जनावराला आवरणे कोणा ब्राह्मणाला जमणारे नव्हते असें तो पांडवांना सांगतो. त्या घटणेमुळें आता यज्ञ कसा करावा अशा विवंचनेत तो ब्राह्मण त्यांच्या पुढे तक्रार करत उभा होता. ते ऐकून युधिष्ठीर सुद्धा मोठ्या विवंचनेत पडतो. तो व त्याचे बंधू त्यांचे तिरकमटे व बाण घेऊन त्या सांबराला शोधण्यासाठी निघतात. त्या ब्राह्मणाला मदत

करण्याच्या उद्देशाने ते जात असतात. त्यांच्या बरोबर तो तक्रार करणारा ब्राह्मणसुद्धा असतो. त्याना ते सांबर लांब एका ठिकाणी उभे असलेले दिसते. तो ब्राह्मण ते सांबर ओळखतो कारण अजून त्याच्या शिंगांत ती लाकडं व रवी अडकलेली दिसत होती. पांडव त्याच्यावर नेम धरून एक काटेरी बाण सोडतो. परंतु. तो बर्यापैकी दूर असल्यामुळे असेल कदाचित, त्यांचे बाण त्याला लागत नाहीत. म्हणून ते त्याच्या दिशेने जाऊ लागतात. तो ब्राह्मण मागेंच रहातो. त्यावेळी ते पहातात किं, ते सांबर अचानकपणे अदृष्य झाले आहे. ते कोठे गेले तेवढ्यात ते कोणालाही समजले नाही. त्या भागदौडीने पांडव थकतात व त्याना तहान व भूक लागते. ते एका सावलीच्या मोठ्या वडाच्या वृक्षाखाली बसतात. तेथे बसले असतांना नकूल चिंताक्रांत झाल्या सारखा त्याच्या मोठ्या भावाला विचारते. "अहो राजे, आपण कधीही पुण्याचा मार्ग सोडलेला नाही, किंवा उद्धटपणामुळें आपली संपत्ती कधी नष्ट झाली नाही, तसेंच आपण कधी कोणाला "नाही", म्हंटलेले नाही. मग असे असतांना आजच असें कां होत आहे

अशारितीने दुसरे अरण्य पर्वाचा एकोणीसावा भाग संपला.

# दुसरे अरण्य पर्व

## भाग विसावा

तेथे ते सगळे पांडव बसले असतांना नकूल तो विषय पुन्हा काढतो व विचारतो, "आपले काय चुकले म्हणून आपल्याला सतत असें व्यर्थ कष्ट भोगावे लागत आहेत.

युधिष्ठीर त्याला सांगतो, माणसाच्या जीवनात संकटांना कधी अंत नसतो. त्यांचे कारण सुद्धा खात्रीने आपण सांगू शकत नाही. फक्त न्याय देवता (यम) ते जाणत असते. तो ज्याच्या त्याच्या कर्मफलानुसार त्याला ते ते फल देत असतो. एक मात्र असें समजले जाते कीं, त्याचा हिशेब कधी चूकत नाही. त्यावर भिम त्याला बोलतो, "खरे आहे, मला माहित आहे ही आपत्ती आपल्यावर कोसळली आहे कारण, मी त्या प्रतिकामीनला (दुःशासन) तो कृष्णाला खेचत असतांना तेव्हांच ठार केले नाही". अर्जुन बोलतो, "मलासुद्धा असेंच वाटते कीं जेव्हां तो सुतपुत्र (कर्ण) अपमानास्पद शब्दात आपल्या बद्दल बोलत होता तेव्हांच त्याच्यावर रागावलो नाही". सहदेव त्यात भर घालतो व बोलतो, "ह्या सगळ्या आपत्तीचे कारण मी शकूनीचा द्युताच्या पहिल्याच डावात त्याने फसवून आपल्याला हरवले तेव्हा ठार मारले नाही".

वैशंपायन पुढे सांगतात, अशा गोष्टी होत असतांना, युधिष्ठीर नकूलाला बोलतो, "अरे माद्रीच्या मुला, जरा ह्या उंच झाडावर चढून पहा दूर कोठे पाण्याचा तलाव दिसतो कां कोठे पाळ्याजवळ वाढणारी झाडे असतील तर ते पहा म्हणजे आपल्याला पाण्याचा सुगाव लागेल. नकूल त्वरित एका उंच झाडावर चढतो व टेहाळणी करतो. थोडे निरीक्षण केल्यावर तो त्याच्या मोठ्या भावाला सांगतो, दूर तशी झाडी दिसते व तेथे पाणबगळ्यांचे थवे उडतांना दिसत आहेत. ज्या अर्थी पाणबगळे आहेत त्या ठिकाणी पाणी निश्चितच असणार. ते ऐकल्यावर युधिष्ठीर त्याला सांगतो कीं, ह्या बाणाच्या भात्यांतून कांहीं पाणी तुला आणता येते कां पहा. त्या बरोबर नकूल ताबडतोब झाडावरून उतरतो व कांहीं भाते घेऊन त्या जागी जाण्यासाठी निघतो. त्या तलावाकडे पोहोचल्यावर त्याला नितळ स्वच्छ पाणी दिसते. ते पाहिल्यावर त्याला ते पाणी पिण्याची फार इच्छा होते. तेथे तो जात असतांना त्याला एक आकाशवाणी ऐकू येते व त्यात तो धीर गंभीर आवाज त्याला सावध

करतो कीं तो तसे करणार नाही. तो आवाज त्याला बजावतो कीं, तो तलाव त्याचा आहे. जर तुला माद्रीच्या मुला, त्यातील पाणी पाहिजे असेल तर तुला माझ्या प्रश्नाचे उत्तर द्यावे लागेल. जर तू योग्य उत्तर दिलेस तर तू पाणी पिऊ शकतोस व हवे तेवढे पाणी घेऊन जाऊ शकतोस. परंतु, नकूल फार तहानलेला होता व तो त्या आवाजाकडे दुर्लक्ष करतो. त्या तलावात उतरून ते गोड पाणी पिऊ लागतो. त्या बरोबर तो बेहोष होऊन पडतो त्या तलावात. येथे पांडव नकूलाला येण्यास उशीर का होत आहे ते पहाण्यासाठी सहदेवाला पाठवतात. युधिष्ठीर त्याला सांगतो कीं, तो त्या तलावाकडे जाऊन पाहिल की काय झाले आहे व परत येतांना नकूल व पाणी दोघांना घेऊन येईल. सहदेव त्या बरोबर निघतो. तेथे गेल्यावर त्याला दिसते कीं त्याचा जुळा भाऊ मरून पडलेला आहे. ते पाहिले तरी तो पाण्याच्या तलावाकडे जात रहातो. कारण, त्यालासुद्धा फार तहान लागलेली असते. त्या तो आवाज ऐकू येतो. तो आवाज त्याला बजावतो कीं, तुझा भाऊ कां मेला व बोलतो कीं, त्याने विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर प्रथम द्यावे व मग पाणी प्यावे व हवे तेवढे घेऊन जावे. सहदेव सुद्धा त्याच्या भावासारखा तहानलेला असल्यामुळें त्या आवाजाकडे दुर्लक्ष करतो व पाणी पिण्यासाठी पाण्यात उतरतो. तोसुद्धा त्वरीत मरून पडतो. ते दोघे भाऊ बराच वेळ न आल्याने काळजीत पडलेला युधिष्ठीर त्याच्या भावाला अर्जुनाला तसेंच सांगतो व पाण्याच्या तलावाकडे पाठवतो. त्याला सांगतो कीं, तो त्या दोघांना व पाणी घेऊन येईल. पुढे तो त्याला बोलतो, "अरे माझ्या भावा, तू आपल्या सगळ्यांचा मुख्य आधार आहेस जेव्हां जेव्हां आपण संकटात सांपडतो. अर्जुन त्याचे धनुष्य व तलवार घेऊन निघतो. तो त्याच्या भावांप्रमाणे त्या तलावाकडे जातो. तो तेथे पहातो कीं, त्याचे दोनही भाऊ मरून पडले आहेत. त्याला वाटते कीं, ते गाढ झोपलेले आहेत. नंतर त्याला तपास केल्यावर समजते कीं, ते दोघे मेलेले आहेत. त्यामुळें त्याला फार शोक होतो. त्याची तलवार उगारून तो आजूबाजुला पाहू लागतो कीं, त्यांना कोणी मारले असावे. त्याला परिसरात कोणाही दिसले नाही. मग तो तहानलेला पांडव त्या पाण्याकडे धाव घेतो. त्याला तो आवाज एकू येतो. तो त्याला बजावतो कीं त्यांने प्रथम त्याच्या प्रश्नाचे उत्तर द्यावे व मगच पाण्याला स्पर्श करावा. तसे न करता जर तू ते पाणी पिण्याचा प्रयत्न करशिल तर तुझ्या भावांप्रमाणे मरून पडशिल. परंतु, तू जर माझ्या प्रश्नांचे योग्य उत्तर दिलेस तर ते पाणी

पिऊ शकतोस व हवे तेवढे घेऊन जाऊ शकतोस. अर्जुन त्यावर त्या आवाजाला उलट बोलतो कीं, "जर तू जो कोणी असशिल मला आव्हान देत असशिल तर मी तुला माझ्या मंतरलेल्या बाणांनी छेदून टाकण्याची धमकी देतो. त्यानंतर अर्जुन चौफेर त्याच्या बाणांनी संरक्षण तयार करतो व ज्या दिशेने आवाज येत होता त्या दिशेकडे बाण मारून त्या आवाजाला रोकण्याचा प्रयत्न करतो. ते झाल्यानंतर तो अदृष्य यक्ष त्याला बोलतो, "अरे हे सगळे करण्याचे काय कारण आहे? अरे पार्था, तू फक्त माझ्या प्रश्नाचे उत्तर दिलेस तरच ते पाणी पिऊ शकतोस, तर मग माझा प्रश्न कां तू ऐकून घेत नाहीस, त्याशिवाय जर तुझ्या भावांप्रमाणे तू पाणी पिण्याचा प्रयत्न केलास तर तू सुद्धा त्यांच्या सारखा मरशिल. ते बोलणे दुर्लक्षून अर्जुनसुद्धा त्या पाण्यात जातो व पिण्याचा प्रयत्न करतो व तत्क्षणी मरून पडतो.

येथे युधिष्ठीर व भिम विचार करत असतांत हो काय होत आहे. साधे पाणी आणण्यास पाठवलेले आमचे तीन भाऊ काय करत आहेत? आता युधिष्ठार भिमाला सांगतो कीं तो जाऊन पाहिल किं, काय बात आहे. त्यावर भिम निघतो काय झाले त्यांना कीं, ते अजून आले कां नाहीत. त्याशिवाय पाणीसुद्धा पाहिजे होते. म्हणून भिम तेथे पोहोचतो व पहातो कीं त्याचे तीन भाऊ मरून पडलेले आहेत. भिम तहानलेला असला तरी विचार करतो कीं, अशाप्रकारे माझे भाऊ मरण्यापाठी फक्त एक तर राक्षस किंवा यक्ष असणार. तू विचार करतो किं, त्याला त्या राक्षसाशी अथवा यक्षाशी लढावे लागणार आहे. परंतु, प्रथम पाणी पिऊन घेतो. असा विचार तो करतो. पाण्याजवळ जातो मात्र, त्याला आवाज ऐकू येतो किं, त्यांने प्रथम प्रश्नाचे उत्तर द्यावे व मगच त्या पाण्याला स्पर्श करावा.

वैशंपायन जनमेजयाला सांगत असतात, त्या यक्षाकडे दुर्लक्ष करत तो महाबली भिम पाणी पिण्यास सुरूवात करतो. त्या बरोबर तो मरून पडतो. सगळे भाऊ जाऊन बराच समय झाला तरी ते आलेले नाहीत ते पाहून त्यांचा मोठा भाऊ, युधिष्ठीर ते काय होत आहे ते पहाण्यासाठी व पाण्यासाठी सुद्धा त्या दिशेने जाऊ लागतो. त्याच्या भावांच्या अशारितीने गायब होण्यामुळें तो खूप शोकग्रस्त झालेला असतो. तशात तो त्या तलावाकडे निघतो. तो विचार करतो कीं, अशा अरण्यात कांहीं शक्ती असतात ज्या अशा गोष्टी करत असतात त्यासाठी स्वतः जाऊन पहाणेच श्रेयस्कर आहे. तो त्या तलावाकडे निघतो. तो विचार

करतो कीं, त्यांना त्या ठिकाणी पाणी न मिळाल्यामुळें ते पाणी शोधत फिरत असतील. अशाप्रकारे विचार करत तो पांडव त्या निबीड अरण्यात शिरतो. जेथे फक्त हरणं व सांबरं, पक्षी वावरत होती. ते पहात तो पांडव त्या ठिकाणी येतो जेथे पाणी होते. तेथे असलेली विविध वनस्पती व त्यांना लागलेली फुलं तो पहात रहातो. त्याला आता तो तलाव दिसतो. त्याच बरोबर त्याला धक्का बसेल असे तो पहातो.

अशारितीने दुसरे अरण्य पर्वाचा विसावा भाग संपला.

# दुसरे अरण्य पर्व

## भाग एकविसावा

वैशंपायन सांगतात, युधिष्ठीर तेथे त्याचे चार भाऊ मरून पडलेले पहातो. त्याचे ते साक्षात देवासारखे चार भाऊ अशारितीने मरून पडलेले पाहून तो आणखीन दुःखी होतो. त्याला दुःख अनावर झाले. तो जोर जोरानी श्वास घेऊ लागतो. आकांत करू लागतो व त्यात बोलत असतो कीं, "अरे महाबली वृकोदरा, तू दुर्योधनाची मांडी तुझ्या गदेने फोडणार होतास, तुझ्या अशा मृत्यूने ते कसे होणार तुमच्या अशारितीने जाण्याने सगळे व्यर्थ मला वाटू लागले आहे. माणसांचे वचन एकवेळ फुकट जाऊ शकते पण येथे पहातो कीं, देवांचे वचन निरर्थक ठरले आहेत. धनंजयाकडे पहात तो बोलतो, "तू जेव्हां तुझ्या मातेच्या गर्भात होतास तेव्हां देव साक्षात बोलले होते कीं, तूझा पुत्र सहस्त्र नेत्रीच्या एवढीच बलवान असेल. उत्तरेरकडील पर्वातील लोक तुझ्या नांवाने गांत होते कीं, वंशाची गेलेली इज्जत तूंच एक आणून देईल. कोणीही तुला हरवू शकणार नाही. तू सगळ्यांना हरवणार आहेस असें सगळे बोलवत होते परंतु, मी येथे हो काय पहात आहे "हे असें कसे झाले? माझ्या सगळ्या आशा आकांक्षा तुमच्यावर होत्या आता आपण त्या कौरवांचा नाश कसा करणार? अरे माझ्या शूरवीर भावांनो, तुमचे अध्यात्मिक तेज कोठे गेले कीं, तुम्ही असें मृत झालात. अशी कोणती शक्ती आहे जिने हे केले आहे युधिष्ठीराच्या सर्वांगाला घाम फुटला होता. त्याला समजेना हे असें कसे झाले. त्याने जवळ जाऊन पाहिले तेव्हां त्याला समजले कीं, त्यांची कोणाशीही झटापट सुद्धा झालेली नाही. ते हृदयक्रिया बंद झाल्याने मरावे तसे मेलेले होते. त्याला कळेना आता काय करावे. थोड्या वेळांने तो सावध झाला व विचार करू लागला, ते कसे मेले असतील. त्यांच्या मरणाचे कारण स्पष्ट होत नव्हते. त्यांची आयुधं तशीच होती, त्यांचा अजिबात वापर झाल्याचे दिसत नव्हते. आजू बाजुला कोणाचे पायाचे ठसे दिसत नव्हते. म्हणजे तेथे त्या सुमारास कोणीही आलेले नव्हते मग हे झाले कसे? त्यानंतर त्याला आठवण झाली कीं, त्याला तहान लागली आहे. म्हणून तो त्या तलावात जातो. त्यासरशी त्याला तो आवाज त्याला ऐकू येतो. जसा इतर पांडवांनी ऐकला होता, तेंच तो आवाज बोलतो आणि युधिष्ठीराला प्रश्नाचे उत्तर देण्यास सांगतो. तो

आणखीन सांगतो कीं, त्याचे चार भाऊ उत्तर न देता पाणी पिण्याची चूक करत होते म्हणून ते मेले आहेत. हे ऐकल्यावर युधिष्ठाराला त्याचे चारही भाऊ कां मेले ते समजते. त्याला संशय येतो कीं, कदाचित दुर्योधनाने कोणा गंधर्वाच्या मदतीने तो तलाव येथे आपल्याला मारण्यासाठी योजला तर नाहीं नां? असें विचार त्याच्या मनात येतात. तो विचार करतो कीं, विकृत मनाची माणसें कांहींही करू शकतात. अशा प्रकारचे विक्षिप्त विचार त्याच्या मनात येत असतात. तो त्याच्या भावांचे शरीर व चेहरा निरखून पहातो. त्यात कोण्या वीषाचा प्रभाव झालेला त्याला दिसत नाही. त्याला अजून समजत नाही असें कसे झाले. यमाने त्यांना मारले असते तर ते करण्याचे कारण काय हे समजत नव्हते. त्यानंतर तो त्या पाण्यात अर्घ्य देण्यासाठी पाण्यात उतरतो. त्याला तो आवाज पुनः ऐकू येतो जो त्यांने पहिल्या वेळी न ऐकल्या सारखा केला होता. तो आवाज त्याला सांगतो, "मी यक्ष बोलतोय. मी ह्या तलावातील छोटे मांसे खाऊन रहात असतो. मीच तुझ्या भावांना मूर्च्छित केले आहे. ते मेलेले नाहीत. मी त्यांना प्रश्न विचारणार होतो परंतु, तुझ्या भावांनी माझे ऐकले नाही. जर तूसुद्धा माझ्या प्रश्नाची उत्तरं दिली नाहीस तर तूसुद्धा तसांच मूर्च्छित होऊन पडशिल. म्हणून तू त्यांच्या सारखा बेपर्वाईने वागू नकोस. त्या आवाजात जो दम होता तो युधिष्ठीराला चांगलाच समजला. जर माझ्या प्रश्नांची उत्तरं दिलीस तर तू पाणी पिऊ शकतोस व पाहिजे जेवढे घेऊन जाऊ शकतोस".

युधिष्ठीर त्याला विचारतो, "तू कोण आहेस? रुद्र, वसु कां मरुत, कोण आहेस ते सांग. ते कोणा पक्षानी निश्चितच केलेले नाही. माझे भाऊ मोठे पराक्रमी आहेत, त्यांनी हिमालय, विंध्य, मलय उलथवले आहेत, अशांना तू मूर्च्छित करतोस म्हणजे तू कोणी सामान्य नाहीस हे स्पष्ट दिसते. माझ्या भावांना देव, राक्षस, गंधर्व आणि असुर ह्यांपैकी कोणीही बाद केलेले नाही अशां माझ्या भावांना बेहोष करणारा तू कोण आहेस? एक गोष्ट मानली पाहिजे कीं, तुझ्यात दम आहे. मला माहीत नाही, तुझा ह्यात काय उद्देश आहे. म्हणून मला तुझ्या त्या प्रश्नांबद्दल कुतूहल उत्पन्न झाले आहे. परंतु, मला सांग, प्रथम तू खरोखरचा कोण आहेस. येथे कां रहात आहेस ते ऐकल्यावर तो यक्ष बोलू लागतो, "मी एक यक्ष आहे. मी कोणी पक्षी नाही. माझ्यामुळें तुझे महापराक्रमी बंधू असें पडलेले आहेत".

वैशंपायन पुढे सांगतात, त्या यक्षाच्या आवाजात कठोरपणा होता. तो यक्ष आता युधिष्ठीराला दिसू लागतो, त्याचे डोळे मोठे होते, त्याचे शरीर प्रचंड होते, एकाद्या मोठ्या उंच वाढलेल्या वृक्षासारखे ते होते. त्या शरीरातून तेज बाहेर येत होते. पुढे तो सांगतो, "तुझे भाऊ मी नको सांगत असतांना माझ्याकडे दुर्लक्ष करत ते पाणी पिण्याची हिम्मत करत होते म्हणून मी त्यांना बेहोष केले आहे. ज्यांना जगण्याची इच्छा आहे ते कधीही ते पाणी माझ्यी परवानगी शिवाय पिण्याची हरकत करणार नाहीत. हा तलाव माझ्या मालकीचा आहे. परंतु, जर तुला पाणी प्यावयाचे असेल तर तुला प्रथम माझ्या प्रश्नांची उत्तर द्यावा लागतील". युधिष्ठीर त्याला सांगतो, "मला तुझ्या पाण्यात अथवा त्या सरोवरात अजिबात स्वारस्य नाही व मी तुझ्या हक्काची पायमल्ली करणार नाही. जे माझ्या भांवांना केले त्याचे कारण ते फार तहानलेले होते, त्यात त्यांचा कांही असा उद्देश असणार नाही कीं, तुझ्या अधिकाराचे उल्लंघन ते करतील. तसे माझे भाऊ नाहीत हे प्रथम समजून घे. तरी मी तुझ्या प्रश्नांची उत्तर देईन परंतु, तूला त्या माझ्या भावांना पुन्हा उठवावे लागेल". विचार तुझे प्रश्न असे तो त्याला सांगतो.

यक्ष आता त्याला प्रश्न विचारू लागतो. पहिला प्रश्न तो विचारतो, "सांग युधिष्ठीरा सूर्य कां उगवतो? त्याला कोणाची साथ असते? कोणामुळें तो मावळतो? सूर्याचे खरे स्थान कोणते

युधिष्ठीर त्याला उत्तर देतो कीं, ब्रह्माच्या किमयेने तो उगवतो, त्याला देवांची साथ असते, धर्मामुळे तो मावळतो. सूर्याचे स्थान आहे सत्यात.

यक्ष पुन्हा विचारतो, "सांग मला, माणूस विद्वान कशामुळें समजला जातो. असें काय आहे जे महान आहे जे तो मिळवण्याचा प्रयत्न करत असतो? त्यानंतर तो काय मिळवण्याचा प्रयत्न करतो? माणसाला शहाणपण प्राप्त होते"?

युधिष्ठीर सांगतो, "श्रृतीच्या अभ्यासाने मनुष्य महान होतो. त्यानंतर तो वैराग्य व्रत आचरतो जे खरोखरच महान आहे. असें असले तरी अभ्यास व सत्पात्र सेवा केल्याने शहाणा होतो".

यक्ष विचारतो, "ब्राह्मणांचे देवत्व कशात आहे? पवित्र माणसांने काय करावे जे त्याच्या कडून अपेक्षित आहे? ब्राह्मणाची मानवी लक्षणं कोणती? कोणते काम अपवित्र समजले जाते ब्राह्मणांसाठी"?

युधिष्ठीर उत्तर देतो, "वेदाच्या अभ्यासात त्यांचे देवत्व असते. त्यांचे वैराग्य त्यांना पवित्र ठरवतो. ब्राह्मण मृत होतो हे त्याचे मानवी लक्षण असते. ब्राह्मणांकडे दुर्लक्ष करण्यात अपवित्रता असते.

यक्ष विचारतो, "क्षत्रियांचे देवत्व कशात आहे? क्षत्रियांचे असें कोणते कृत्य असते ज्यामुळे ते पवित्र ठरतात? क्षत्रियांचे मानवपण कशात आहे? क्षत्रियांचे कोणते कृत्य अपवित्र समजले जाते"?

युधिष्ठीर सांगतो, "क्षत्रियांचे पावित्र्य त्यांच्या शस्त्रांत आहे. यज्ञ करण्यात, माणूसकीने वागण्यात (कोणाच्याही अज्ञानाचा, गरीबीचा, भोळेपणाचा, कमजोरीचा गैरफायदा न घेणे ह्यालाच **माणूसकी** असें म्हणतात. ह्यात सत्पात्र व अपात्र ह्याचा विचार करावा लागतो.) व भूतदयेत आहे. त्या विरूद्ध ते व दुसर्याला संरक्षण न देण्याची प्रवृत्ती त्यांचे अपवित्र पण असते. त्याचे मानवपण त्याच्या भिण्यात असत".

यक्ष विचारतो, "यज्ञाच्या कोणत्या भागात सम असते? यज्ञात यजू कशात असते, कोणत्या गोष्टीत त्याग असतो? कोणती गोष्ट केली नाही तर यज्ञ पुरा होत नाही"?

युधिष्ठीर सांगतो, "जीवन हेंच यज्ञाचे सम (इंद्रीय संयमन, औदासिन्य) असते. यज्ञ करणार्याचे मन हेंच त्याचे यजू (सत्प्रवृत्ती) असते. यज्ञातील त्याग ऋग् (आत्म्याचा उद्धार करण्यात असते) मध्ये असतो. धर्म (कर्तव्य बुद्धी, नैतिक जागृती, तपस्या) जागृत न ठेवल्यास यज्ञ पुरा होत नाही. ह्या सगळ्या जेव्हां पुर्ण करतो तेव्हांच तो यज्ञ पूर्ण होत असतो. तेव्हां त्याला खरी शांती मिळते, केवळ कर्मकांड करून कांही साध्य होत नाही.

त्या उत्तरा नंतर प्रभावित झालेला यज्ञ त्याला आणखीन एक प्रश्न विचारतो.

यक्ष विचारतो, आता मला सांग आत्म्याचे अधिष्ठन (विशिष्ट स्थान) कशात असते"?

युधिष्ठार सांगतो, सत्यावर (परमेश्वरावर) त्याचे विशिष्ट स्थान असते. ज्या अत्म्याचे बंधन ह्या वास्तविक गोष्टींपासून संपते तो परमेश्वरात विलीन होत असतो कारण त्याला कोणतेही कर्म करण्याचे उरत नाही. ते मिळवण्यासाठी त्या साधकाला धृति (स्थिर बुद्धी) असावी

लागते". युधिष्ठीर पुढे सांगतो, धृति हिंच माणसाची खरी मैत्रिण असते. तिच्या बरोबर तो त्याचा मार्ग काढत असतो. जर धृति नसेल तर तो भरकटत जातो. त्याचा जीवनाचा यज्ञ उध्वस्त होतो.

यक्ष विचारतो, क्षेत्रज्ञाची कोणती गोष्ट महत्वाची असते? त्यांने काय पेरावे? जगात समृद्ध होण्याची गरजच काय? त्यात कार्य करण्यासाठी कोणते गुण असावे लागतात? कोणत्या गुणांमुळें त्याची प्रगती होते"?

युधिष्ठीर सांगतो, पाऊस ही क्षेत्राची सर्वात मोठी गरज असते. पीक येण्यासाठी बियाणे पेरावे लागते. मुलाबाळांसाठी माणसाला समृद्ध होणे गरजेचे असते. बुद्धीमत्ता, दूरदृष्टी, योग्य नियोजन अशा गुणांची गरज असते.

यक्ष विचारतो, त्याच्या बुद्धीचा वापर करत, ज्ञानेंद्रीयांना वापरतो, असून सगळ्या जगाला आवडत असलेला असा, जरी श्वासोंश्वास करत असला तरी देव, अतिथी, सेवक, पितर आणि स्वतः अशांना कांहीं देत नाही आणि तो जीवंतसुद्धा नाही असें कोण"?

युधिष्ठीर सांगतो, कृष्णाचे सुदर्शन चक्र.

पुढे यक्ष विचारतो, पृथ्वीपेक्षा जास्त भारी काय असते? स्वर्गापेक्षा जास्त उंच काय असते? वायूपेक्षा जास्त वेगांने काय जाते? असें काय आहे जे गवतापेक्षा जास्त असते संख्येने"?

युधिष्ठीर सांगतो, माता पृथ्वीहूनही जास्त भारी असते, पिता स्वर्गापेक्षा जास्त उच्च असतो, माणसाच्या मनातील विचार गवतापेक्षा संख्येने जास्त असतात.

यक्ष विचारतो, असें काय आहे जे झोपतांनासुद्धा डोळे उघडे ठेवते? असें काय आहे जे जन्मल्यावर सुद्धा हलत नाही? असें काय आहे त्याला हृदय नाही? असें काय आहे जे स्वतःच फुगते"?

युधिष्ठीर सांगतो, मासें झोपतांना डोळे बंद करत नाहीत, पक्षाचे अंड बाहेर आले तरी हालचाल करत नाही. नदी स्वताच्या पाण्याने फुगत असते. दगडाला हृदय नसते.

यक्ष विचारते, बहिष्कृतांचा मित्र कोण असतो? गृहस्थांचा मित्र कोण? आजारी माणसाचा मित्र कोण? मरणोन्मुख माणसाचा मित्र कोण"?

युधिष्ठीर सांगतो, बहिष्कृताचा मित्र त्याचा साथीदार. गृहस्थाचा मित्र त्याची बायको. आजारी माणसाचा मित्र त्याचा वैद्य. मरायला टेकलेल्याचा मित्र मृत्यू.

यक्ष विचारतो, सर्व प्राण्यांचा पाहुणा कोण असतो? नित्य कर्तव्य कोणते आहे? अमृत कशाला म्हणतात? हे विश्व काय आहे"?

युधिष्ठीर सांगतो, अग्नी सगळ्यांचा पाहुणा असतो. अग्नीहोत्र सांभाळणे हे नित्य कर्तव्य आहे. अंतिम ज्ञान हेंच खरे अमृत असते. हे विश्व एक पोकळी आहे, सत्यतः विश्व म्हणजे कांहींच नाही.

यक्ष पुन्हा विचारतो, असें काय आहे जे एकटेच फिरत असते? असें काय आहे जे एकदा उगवल्यानंतर पुनः उगवते? थंडीला उपाय काय? सर्वात विशाल क्षेत्र कोणते"?

युधिष्ठीर सांगतो, सूर्य एकटाच फिरत असतो, चंद्र पुनः उगवतो, अग्नी थंडीला उपाय आहे व पृथ्वी हे एक विशाल क्षेत्र आहे.

यक्ष विचारतो, पुण्याची उच्चतम जागा कोणती? प्रसिद्धीची जागा कोणती? स्वर्गाची कोणती? सुखाची कोणती"?

युधिष्ठीर सांगतो, कृपाळूपणा पुण्याची, भेटी देण्याचे प्रसिद्धी, सत्याबद्दल निष्ठा स्वर्गाची आणि सुखासाठी चांगुलपणा.

यक्ष विचारतो, माणसाचा आत्मा म्हणजे काय? देवांने माणसासाठी कोणता मित्र दिला आहे? माणसाचा मुख्य आधार काय?

युधिष्ठीर सांगतो, माणसाचा आत्मा त्याचा पुत्र असतो. पत्नी माणसाचा खरा आधार असतो. समाजातील प्रतिष्ठा त्याचा मुख्य आधार असतो.

यक्ष विचारतो, सर्वात जास्त स्तुत्य काय असते? सर्वात मौल्यवान काय असते? सर्वात मोठी कमाई काय असते? सर्वात जास्त सुखदायी काय आहे?

युधिष्ठीर सांगतो, माणसाची कसब त्याची सर्वात जास्त स्तुत्य असते. त्याचे ज्ञान मौल्यवान असते. उत्तम प्रकृती ही मोठी कमाई असते. समाधानीपणा ह्यामुळें त्याला सर्वात जास्त सुख मिळते.

यक्ष विचारतो माणसासाठी मोठे कर्तव्य कोणते? असा कोणता गुण आहे ज्यामुळें नेहमी फायदा होतो? कशाच्या संयमाने कधी माणसाला दुःखी व्हावे लागत नाही? कोणाबरोबर केलेले संधी कधीही वाया जात नाही"?

युधिष्ठीर सांगतो, मोठे कर्तव्य हे कीं कोणालाही दुःख देऊ नये. वेदातील यज्ञ केल्याने नेहमी फायदाच होतो. मनावर ताबा असेल तर कधी दुःखी व्हावे लागणार नाही. सज्जनांबरोबर केलेले संधी कधीही वाया जात नाहीत.

यक्ष विचारतो, कशाच्या त्यागामुळें चांगले होते? कशाच्या त्यागामुळें माणूस श्रीमंत होतो? कशाच्या त्यागाने माणूस आनंदी होतो"?

अहंकाराच्या त्यागामुळें माणसाचे चांगले होते. क्रोधाच्या त्यागाने माणूस श्रीमंत होतो. इच्छांच्या त्यागाने माणूस कायम आनंदी रहातो.

यक्ष विचारतो, ब्राह्मणांना दान कां करावयाचे? विदूषकांना व नृत्य करणार्यांना कां बक्षिशी द्यावयाची? सेवकांना बक्षिशी कां द्यावयाची? राजाला कां द्यावयाचे?

युधिष्ठीर सांगतो, धार्मिक कार्यासाठी ब्राह्मणाना दानं करावयाची. ख्यातीसाठी विदूषकांना व नृत्यकांना बक्षिशी द्यावयाची. त्यांच्या सेवेसाठी सेवकांना पैसे द्यावयाचे असतात. संरक्षणासाठी राजाला पैसे द्यावयाचे असतात.

यक्ष विचारतो, हे जग कशाने व्यापलेले आहे? असें कांय होते ज्यामुळें माणूस भ्रमात जातो, गोधळतो? कोठल्या कारणांने आपण आपले मित्र सोडून देतो? स्वर्गात कां जाऊ शकत नाही?

युधिष्ठीर सांगतो, जग अंधाराने व्यापले आहे. त्यामुळें माणूस भ्रमात जातो व गोंधळून जातो. जसें आंधळ्या माणसाचे होते. लोभीपणामुळें मित्र सुटतात. पृथ्वीवरील गोष्टींच्या मोहात अडकल्यामुळें स्वर्गात जाऊ शकत नाही.

यक्ष विचारतो, कशामुळें एकादा मेल्यासारखा होतो? कशामुळें राज्य मेल्यागत होते? कां श्राद्ध व्यर्थ जाते? कां यज्ञ व्यर्थ जातो?

युधिष्ठीर सांगतो, निर्धन माणूस मेल्यागत असतो. राजा नसलेले राज्य मेल्यात जमा असते. अज्ञानी पुरोहिताकडून केलेले श्राद्ध फुकट जाते. अयोग्य ब्राह्मण पुरोहिताच्या मदतीने केलेले यज्ञ व्यर्थ जातात.

यक्ष विचारतो, योग्य मार्ग कशाला समजावयाचे? अंबूचे योग्य वर्णन काय? **उत्तम खाणे कशाला म्हणतात?** विष कशाला समजतात? श्राद्धासाठी योग्य काळ कोणता? एवढे विचारून तो यक्ष युधिष्ठीराला सांगतो कीं, तू आता तुला हवे तेवढे पाणी पी ह्या तलावातून.

युधिष्ठीर सांगतो, प्रशस्थता तपासून जो निवडला जातो तो योग्य मार्ग समजावा. अवकाशात जे भरले आहे त्याला अंबू (इथर) समजावयाचे. **गोमांस खाणे हे खरे खाणे असते.** अहितकारक ते विष समजावे. ब्राह्मण सुचवेल तो काळ श्राद्धासाठी योग्य समजावा. एवढे सांगून युधिष्ठीर यक्षाला बोलतो, "मला जे उचित वाटले ते सांगत आहे. तुमची उत्तर कदाचित निराळी असू शकतात".

यज्ञ त्याला सांगतो कीं, तुझ्या उत्तरामुळें आता तू पाणी पिऊ शकतोस त्यामुळें तुझी तहान भागेल, जा पाणी पिऊन ये. परंतू मला तुला आणखीन कांहीं विचारावयाचे आहे, त्याची उत्तरं जर दिलीस तर तुझे बंधू मी पुन्हा जागृत करून देईन.

युधिष्ठीर तलावात जाऊन पाणी पितो व पुन्हा यक्षापुढे उभा रहातो.

यक्ष विचारतो, खर्या वैराग्याची लक्षणं कोणती? संयम कशाला म्हणतात? खरी क्षमा कशी असते? लज्जा, शरम कशाला म्हणतात?

युधिष्ठीर सांगू लागतो, स्वताचे कर्तव्य निरपेक्ष बुद्धीने सांभाळणे हे खर्या बैराग्याचे लक्षण आहे. मनावरील पूर्ण ताबा म्हणजे संयम. शत्रूचे मित्रात रुपांतर ज्यांने होते त्याला खरी क्षमा समजतात. म्हणजे जर क्षमेमुळें शत्रू मित्र झाला नाही तर ती क्षमा फुकट गेली असें समजावयाचे असते. चुकीच्या गोष्टींपासून स्वतःला दूर ठेवणे म्हणजेच लज्जा अथवा शरम सांभाळणे असें समजावे. ह्याचा अर्थ चुकीच्या गोष्टीत रमणे म्हणजे निर्लज्जपणा अथवा बेशरमी असें समजावे.

यक्ष विचारतो, मर्यादा म्हणजे काय? पाप म्हणजे काय? पुण्य म्हणजे काय?

युधिष्ठीर सांगतो, प्रत्येक कृती, कर्म, विचार आणि उद्देशाच्या कमाल व किमान अवस्था असतात, त्याना त्याच्या मर्यादा समजतात. ज्या विचारामुळे अथवा कर्मामुळे त्या माणसाच्या अध्यात्मिक दर्जात र्हास (अवनती) होतो ते पाप समजतात. ज्याच्यामुळें अध्यात्मिक दर्जा सुधारतो, उद्धार होतो ते पुण्य समजतात.

यक्ष विचारतो, सृष्टीतील प्रत्येक गोष्टीला सत्त्व रज व तम गुणात अजमावले जाते. त्या त्रिगुणांचा अर्थ काय?

युधिष्टीर सांगतो, ही सृष्टी अध्यात्मिकतेने बनलेली आहे. त्यामुळे त्यात ती अध्यात्मिकता निरनिराळ्या प्रमाणात असते. कांहींत ती जास्त असते, त्या गोष्टींना, विचारांना सात्त्विक गुणात गणतात. कांहींच्यात ती मध्यम प्रमाणात असते त्याला रजोगुणीत गणले जाते व ज्यांत त्याहूनही कमी असते ते तमोगुणात गणले जातात. अध्यात्मिकता गणता येत नाही, परंतु, हे तीन साधारण परिमाणं म्हणून वापरली जातात. असें सांगावयाचे कारण सात्त्विकतेत सुद्धा असंख्य स्थर असतात कमी जास्तच्या प्रमाणानुसार. तिच परिस्थिती रजोगुणाचा व तमागुणाची असते.

यक्ष विचारतो, देवांची गणना कोणत्या गुणांत केली जाते व राक्षसांची कोणत्या?

युधिष्ठीर सांगतो, देव सात्त्विक गुणात गणले जातात आणि राक्षस तमोगुणात.

यक्ष विचारतो, माणसाचा गुण कोणत्या गुणात धरला जातो?

युधिष्टीर सांगतो, माणसाच्या विविध अवस्था असतात, कांहीं सात्त्विक कांहीं रजोगुणात व कांहीं तमागुणात गणले जातात. खरे ब्राह्मण सात्त्विक गुणात गणले जातात. कुलिन क्षत्रिय सुद्धा सात्त्विक किंवा रजोगुणात गणले जातात. भ्रष्ट क्षत्रिय तमोगुणात गणले जातात. सामान्य माणसाचे त्रिगुण दोलायमान अवस्थेत असतात, कधी सात्त्विक तर ते कधी तमागुणी असें होत असते. ते स्थीर रहात नाहीत. ते सात्त्विकतेत स्थीर करणे ह्यालाच योग साधना असें म्हणतात.

यक्ष पुन्हा विचारतो, अरे राजा ज्ञान कशाला म्हणतात? कशाला मनाची स्थिरता समजावे? दया कशाला म्हणतात? साधेपणा कशाला समजावे?

युधिष्ठीर सांगतो, सत्याची जाण म्हणजे खरे ज्ञान. जेव्हा झोप शांत लागते तेव्हां मनाची स्थिरता प्राप्त झाली असें समजावे. सगळ्यांसाठी सुखाची व्यवस्था करणे म्हणजे दयाबुद्धी समजावे. जेव्हां दुसर्याशी तुलना न करता रहातो तेव्हां त्याला साधेपणा म्हणतात.

यक्ष विचारतो, गुप्त शत्रूत्व कसे असते? असाध्य व्याधी माणसासाठी म्हणजे काय? प्रामाणिक माणूस म्हणजे कसा माणूस व अप्रामाणिक म्हणजे कसा?

युधिष्ठीर सांगतो, क्रोध माणसाचा मोठा अदृष्य शत्रू असतो. लोभीपणा माणसाचा असाध्य व्याधी असतो. प्रामाणिक तो जो सगळ्यांचे भले पहातो व अप्रामाणिक फक्त स्वतःचे भले साध्य करत असतो.
यक्ष विचारतो, अरे राजा मला सांग, अज्ञान म्हणजे काय? अभिमान म्हणजे काय? आळस म्हणजे काय? दुःख म्हणजे काय?
युधिष्ठीर सांगतो, स्वतःच्या जबाबदार्या जो ओळखत नाही तो खरा अज्ञानी. जो समजतो कीं, तोच त्याच्या कार्याचा कर्ता आहे तो अभिमानी. जो स्वताच्या जबाबदार्या समजून वागत नाही तो आळशी. अपेक्षाभंगात दुःख असते.
यक्ष विचारतो, ज्ञानी कशाला स्थैर्य समजतात? धीरोदात्तता म्हणजे काय? खरे तर्पण कशाला म्हणतात. दानधर्म कशाला म्हणतात?
युधिष्ठीर सांगतो, जो स्वताची कर्तव्ये ओळखतो तो स्थीर समजावा. धीरोदात्तता आपल्या वासनांवर काबू आल्यावर प्राप्त होते. खरे तर्पण तेव्हांच होते जेव्हां मनातील सगळी घाण काढून टाकली आहे. सगळ्या प्राणीमात्रांना संरक्षण देण्यात खरा दानधर्म असतो.
यक्ष विचारतो, कोणाला ज्ञानी समजावयाचे? कोणाला अश्रद्ध समजावयाचे? कोणाला अज्ञानी समजावयाचे? कशाला इच्छा समजावयाचे व त्याचे मूळ कशात असते? मत्सर म्हणजे काय? दर्प म्हणजे काय?
युधिष्ठीर सांगतो, ज्याला त्याच्या कर्तव्याची जाण आहे तो ज्ञानी समजावा. ज्याला सत्याची माहीती नाही तो अश्रद्ध समजावा. जो अश्रद्ध असतो त्याला अज्ञानी समजता येईल. कांहीं मिळवण्याची प्रेरणा म्हणजे इच्छा. त्याचे मूळ वासनांत असते. दुसर्याशी स्वताची तुलना करण्याच्या प्रवृत्तीमध्ये मत्सर संभवतो. तुलनेत वरचढ ठरलो कीं, दर्प संभवतो.
यक्ष विचारतो, गर्व कशाला म्हणतात? मिथ्याचार कशाला म्हणतात? देवाची कृपा म्हणजे काय? पापबुद्धी कशाला समजायचे?
युधिष्ठीर सांगतो, खोट्या अहंकाराला गर्व म्हणतात. कर्मकांडात अडकणे त्यातून मिथ्याचार सुरू होतो. आपल्या सुकर्माची फळ मिळतात त्याला देवाची कृपा असें

समजतात. दुसर्यांबद्दल वाईट करण्याची बोलण्याची प्रवृत्ती म्हणजे पापबुद्धी, कारण, त्यामुळें त्याचा अध्यात्मिक र्हास होत असतो.

यक्ष विचारतो, पुण्य कर्म, हित (स्वार्थ) आणि इच्छा (वासना) एकमेकाविरुद्ध आहेत. मग त्या एकाच वेळी कशा असतात?

युधिष्ठीर सांगतो, जर पत्नी आणि पुण्य एकत्र राहू शकतील तर हे तिनही एकत्र राहू शकतात कदाचित.

यक्ष विचारतो, मला सांग कोणाला कायम नरकात ढकलले जाते? तू मला ह्या प्रश्नाचे उत्तर दिले पाहिजेस.

युधिष्ठार सांगतो, जो ब्राह्मणाला दान घेण्यासाठी बोलावतो व तो ब्राह्मण आल्यावर त्याला दान करत नाही तो कायम नरकात जातो. जो वेदांचा, ब्राह्मणांचा, देवांचा, पितरांचा अपमान करतो तो सुद्धा नरकात जातो. जो संपत्ती असूनही तिचा भोग घेत नाही आणि कोणाला वापरू देत नाही त्याच्या लोभीपणामुळें असा कंजूष तोसुद्धा कायम नरकात जातो.

यक्ष विचारतो, कोणत्या वागण्याने, जन्माने, अभ्यासामुळें, माणसाला ब्राह्मणत्व प्राप्त होते. मला तुझ्या कडून खात्रीचे उत्तर मिळाले पाहिजे.

युधिष्ठीर सांगतो, ऐका माझे उत्तर, अहो यक्षराज, केवळ जन्माने, अभ्यासाने, वेदाच्या ज्ञानाने, कोणीही ब्राह्मण होत नाही, परंतु, त्याच्या स्वभावाने तो ब्राह्मण होतो. ज्याच्या स्वभावात दोष नाही, त्याला खोट्या सवयी नसाव्यात, ज्याचे मन निर्विकल्प आहे, ज्याचे इंद्रीय नियंत्रणात आहेत, जो अग्नीहोत्र सांभाळतो, तो ब्राह्मण समजला पाहिजे.

यक्ष विचारतो, जो मधूर वाणी वापरतो त्याला काय फायदा होतो? जो न्यायाने वागतो त्याला काय फायदा होतो? ज्याला अनेक मित्र आहेत त्याला त्याचा काय फायदा होतो? जो पुण्यकर्मात मग्न असतो त्याचा काय फायदा होतो?

युधिष्ठीर सांगतो, जो मधून वाणी वापरतो तो सगळ्यांना प्रिय होतो. जो न्यायाने वागतो त्याला जे हवे ते मिळते. ज्याला अनेक मित्र आहेत तो मजेत रहातो. जो पुण्यकर्मात मग्न असतो तो मृत्यूनंतर स्वर्गात जातो.

यक्ष विचारतो, खरे सौख्य काय आहे? सर्वात जास्त विलक्षण असें काय आहे? मार्ग कशाला म्हणतात? वार्ता कशाला म्हणतात? माझ्या ह्या अखेरच्या प्रश्नांची उत्तर दे व तुझ्या भावांना घेऊन जा. त्यांना पाणी पिऊ दे हवे तेवढे कारण, मी तुझ्यावर संतुष्ट झालो आहे. आता उत्तरं दे.

युधिष्ठीर बोलतो, अहो यक्ष, **जो आपल्या घरात कमीत कमी भाज्या वापरून गोमांस शिजवून खातो,** दिवसाच्या पांचव्या अथवा सहाव्या घटकेला घरातून बाहेर जात नाही व त्याला कोणाचेही देणे नाही, तो खरा सुखी म्हणून ते खरे सौख्य असते. सतत दररोज असंख्य माणसें यमाच्या घरी जातात तरी जे जीवंत आहेत ते स्वताला अमर समजून सगळे व्यवहार करत असतात, ते सर्वात जास्त विलक्षण आहे. श्रृती बद्दलचे विचार अनेक आहेत. कोणाचे कोणाशी त्याच्या अर्थाबाबत मतैक्य होत नाही. अशा वेळी थोर ज्या मार्गाने जातात तो मार्ग समजून त्या बद्दल शंका न घेता रहावयाचे असते. मोठी वार्ता अशी आहे कीं, हे जग एक तवा आहे, सूर्य त्या खालील विस्तव आहे, काळ त्याचे इंधन आहे, त्यात सगळे लोक शिजवले जात आहेत, ही वार्ता आहे.

यक्ष बोलतो, तू माझ्या सगळ्या प्रश्नांची चांगली उत्तर दिली आहेत. आता मला सांग, तो खरा माणूस कोण, ज्याच्याकडे सगळ्या प्रकारची संपत्ती आहे.

युधिष्ठीर सांगतो, आपल्या सर्व कार्याची नोंद अगदी वर पर्यंत होत असते, ह्याची जाणीव ठेवून जो आपली कामं करत असतो तो खरा माणूस समजला पाहिजे. कारण, अशा जाणीवेमुळें तो कधीही खोटे काम करत नाही. असा माणूस मोठ्या अध्यात्मिक वैभवाचा मानकरी होतो. त्याला स्वर्गात उच्च स्थान मिळते. परंतु, जो माणूस ह्या ऐहिक जीवनालाच सर्वस्व समजून त्यातील क्षणभंगूर सुखासाठी खोटी कामं करतो तो खोटा माणूस असतो. माणसाचा प्रत्येक जन्म हा एकाद्या परीक्षेला बसण्यासारखा आहे असें समजून तो त्याचे जीवन सचोटीने जगतो तो त्याच्या अध्यात्मिक जीवनात चिरंतन सुखी होतो.

यक्ष युधिष्ठारीला बोलतो कीं, तू माझ्या सगळ्या प्रश्नांची उत्तर योग्य दिली आहेत म्हणून तू ह्या तुझ्या चार भावांपैकी कोणा एकाला उठवू शकतोस. तर, तू कोणाला उठवू इच्छितोस?

युधिष्ठीर बोलतो कीं, ह्या काळेभोर केस असलेला, उमदा, सुंदर माझा भाऊ आहे त्याला उठवावे. ते ऐकून यक्ष त्याला बोलतो, "अरे, हा तर तुझा सावत्र भाऊ आहे. तुझे सख्खे भाऊ भिम व अर्जुन तसेंच सोडून तू कसा जाणार"?
यक्ष नकूलाला उठवतो. त्यानंतर युधिष्ठीराला विचारतो, "मला सांग, हा निर्णय तू कां घेतलास"? स्वताचे सख्खे भाऊ कां तू उठवले नाहीस"?
युधिष्ठार सांगतो, पुण्य जर सोडले तर त्यांने सगळे सोडले असें समजले जाते. पुण्ण्यामुळें पुण्य वाढते. मी कधीही पुण्ण्याशिवाय कांही करत नाही. दुःख टाळणे हा मोठा सद्गुण समजला जातो व तो मी सर्वश्रेष्ठ मानतो. आमच्या बापाने दोन बायका केल्या होत्या. त्यातील मी व माझे सख्खे भाऊ कुंती मातेचे व हा आणि सहदेव माझ्या सावत्र आईचे , माद्रीमातेचे असें आम्ही एकंदर पांच असलो तरी आम्ही कधी सख्खे सावत्र असा भेद केला नाही. परंतु, जर मी कुंतीचा जीवंत असेन तर माद्रीआईचा एक पुत्र जीवंत असला पाहिजे असें मला वाटते म्हणून मी माद्री आईचा मोठा मुलगा नकूल म्हणून त्याला उठवला, वस्तुतः त्याचा भाऊ सहदेव व नकूल हे दोघे जुळे आहेत म्हणून ते दोघे खरेतर उठले पाहिजेत परंतु, तू म्हणालास कीं फक्त एकच, म्हणून मी नकूलला निवडले कारण तो सहदेवाच्या आधी कांहीं क्षण जन्मला होता"?
त्याचे ते उत्तर ऐकून यज्ञ संतुष्ट झाला व मोठ्या आनंदाने त्याला बोलला कीं, "मी तुझे सगळे भाऊ उठवणार होतो परंतु, त्यात मी तुझी आणखीन एक चाचणी घेतली व त्यातसुद्धा तू खरा निघालास. दुःख टाळण्यासाठी तू तुझे हित व फायदा दोनही सोडण्यास तयार झालास, हे मला विशेष भावले. धन्य आहेस तू युधिष्ठीरा, तुला तुझ्या भविष्यातील कामात उदंड यश मिळो असा मी तुला आशिर्वाद देत आहे. असें बोलून तो इतर तिघांना उठवतो.
अशारितीने दुसर्या अरण्य पर्वाचा एकविसावा भाग संपला.

# दुसरे अरण्य पर्व
## भाग बाविसावा

वैशंपायन सांगतात, ते सगळे पांडव झोपेतून उठावे असें उठून बसतात. त्यावेळी त्यांची भूक व तहान एकदम गायब होते. ते स्वतःला ताजेतवाने समजू लागतात. ते पाहून युधिष्ठीर त्यांना बोलतो, "अरें मी तुम्हाला अजिंक्य समजत होतो, एका पायावर तुम्ही सगळं जग जिंकणारे, असें कसें मरून पडलात? तुम्ही देवांचे अंश अहात तर असें कसें मेल्यासारखे पडलात त्या यक्षाच्या किमयेने? त्यानंतर तो त्या यक्षाला विचारतो आपण वसु, मरुत, रुद्र ह्यांपैकी कोण अहात, साक्षात दैवी पुरूष अहात कां आमचे पूर्वज"? पुढे तो त्याच्या भावांना बोलतो, "तुमचा अहंकार नष्ट करण्यासाठी कदाचित ही योजना असावी असं मला वाटते. ह्यापुढे खोट्या घमेंडीत वागू नका. जर तुम्ही त्याच्या सोप्या प्रश्नांची उत्तर दिली असती तर तुमच्यावर ही वेळ आली नसती.

यक्ष युधिष्ठाराला बोलतो, "माझ्या मुलां, मी तुझा पिता आहे, ह्या जगाला न्याय दाखवणारा साक्षात यमदेव आहे. मी येथे तुला पहाण्यासाठी आलो होतो. प्रसिद्धी, सत्य, संयमन, शुद्धता, नम्रता, मनमोकळेपणा, धैर्य, दानधर्म, वैराग्य आणि ब्रह्मचर्य हे माझे स्वभावधर्म आहेत हे तुला माहीत आहे. मला मिळण्यासाठी अहिंसा, न्याय, शांति, तपस्या, विशुद्ध जीवन आणि पावित्र्य हे मार्ग आहेत. तू मला नेहमीच फार प्रिय असतोस. तुम्हा सगळ्यांना माझ्या शुभेच्छा सदैव असणार आहेत. तुम्ही सहा गुण प्राप्त केले आहेत, त्यातील पहिले दोन (मनाची एकाग्रता, संयमन) तरुणपणी आढळतात, नंतरचे दोन प्रौढावस्थेत (लैंगिक वासनांबद्दल औदासिन्य बाळगणे, ब्रह्माला शरण जाणे) आणि त्यानंतरचे दोन (औदासिन्य, देहाबद्दलची अनास्था, म्हातारचळ नसणे) शेवटी आढळतात. त्या सगळ्यांत तुम्ही चांगले तयार झाला अहात हे पाहून बरं वाटलं. अशा तयारीमुळें माणसाचा नंतरचा प्रवास (मृत्यू नंतरचा प्रवास) सुखरुप होतो. मी तुम्हाला सावध करण्यासाठी आलो होतो. तुमची तयारी किती झाली आहे ते पहाण्यासाठी मी आलो होतो. तुझा निरुपद्रवी स्वभाव, पापापासून दुर रहाण्याची प्रवृत्ती पाहून मी तुझ्यावर

फार संतुष्ट झालो आहे, म्हणून तुला काय पाहिजे ते मांग मी तुला देण्यास तयार आहे. "मांग काय पाहिजे ते. माझ्या निष्पाप मुला तुला काय पाहिजे ते सांग".

युधिष्ठीर त्याला बोलतो, "मागण्यासारखे तसे विशेष कांहीं नसले तरी एक आहे किं, आम्ही एका ब्राह्मणाला मदत करण्यासाठी निघालो होते, त्याचे असे झाले कीं, आमच्या मंडळातील एका ब्राह्मणाची यज्ञाची रवी एका अडदांड सांबराच्या शिंगात अडकली होती व ते सांबर कोठे पळून गेले ते शोधत आम्ही निघालो होतो. ते सांबर किंवा ती रवी मिळाली तर बरे होईल". ते ऐकल्यावर यक्षाच्या रुपातील यमदेव बोलतात कीं, ते सांबर मीच होतो. पांडवांना येथे खेचण्यासाठी मी हे नाटक रचले होते. ती रवी तेथे पडलेली ते पहातात.

वैशंपायन पुढे सांगतात, त्यानंतर यमदेव बोलतात, "आता दुसरे काय पाहिजे ते बोल".

युधिष्ठीर सांगू लागतो, "आम्ही गेली बारा वर्षे वनात रहात आहोत, आता तेरावे वर्ष अज्ञातवासात काढावे लागणार आहे. त्या काळात आम्हाला कोणीही ओळखू नये असा आशिर्वाद मिळाला तर बरे होईल".

वैशंपायन पुढे सांगतात, ते ऐकल्यावर तो दयाघन यमदेव त्यांना तो वर देतो. तुम्ही जरी तुमच्या सध्याच्या रुपात सगळे जग फिरलात तरी कोणीही तुम्हाला ओळखणार नाही असा मी तुम्हाला वर देतो. तुम्ही हे तुमचे तेरावे वर्ष विराट राजाच्या राज्यात काढाल. तेथे तुम्हाला सगळ्या सोयी सुविधा प्राप्त होतील व तुमचा योग्य सन्मानसुद्धा राखला जाईल. तुम्हाला ज्या सोंगात रहावयाचे असेल त्या सोंगात राहू शकाल तेथे व कोणीही तुम्हाला ओळखणार नाही. मी तुम्हाला आणखीन वर देऊ इच्छितो माझे वर देण्यात समाधान झालेले नाही. यम पुढे बोलतो, "माझ्या मुला, असा वर मांग जो विशेष असेल. बोल काय मांगणार आहेस".

तुझा काका विदूर सुद्धा माझाच अंश आहे, ते ऐकल्यावर लक्षात आल्यासारखा युधिष्ठीर बोलतो, "आपल्याला ह्या मर्त्य देहात पाहू शकलो हेंच मोठे वनदान आपण दिले आहे. मी त्यात समाधानी आहे. तरीसुद्धा, जर आपल्याला मला कांही द्यावयाचे असेलच तर ते द्या. मी ते आनंदाने स्वीकारणार आहे". तरी मला वाटते माझ्याकडून कांहीं गोष्टी व्हाव्यात असें वाटते व त्या अशा आहेत, लोभीपणा माझ्यातून पूर्णतया निघून जावा. कारण

त्यामुळेंच आजचे हे दिवस आम्ही भोगत आहोत. मूर्खपणा, क्रोध, माझ्यातून नाहीसे व्हावेत, माझ्यात दयाबुद्धी सदैव असावी, सत्याची चाड, भोगांबद्दल औदासिन्य माझ्यात स्वभावतः असावीत.

यमदेव त्यावर सांगतो, "तुम्ही सगळे पांडव स्वभावतः तसेंच अहात. त्या करता कांहीं मला कराव लागणार नाही".

वैशंपायन पुढे बोलतात, असें संभाषण झाल्यानंतर तो न्याय देव अंतर्धान पावतो. त्या प्रसंगानंतर ते सगळे पांडव एकमेकाला आणखीन चांगले ओळखू लागतात. ते एकमेकाला मिठी मारतात. आपल्या तळावर आल्यावर ते त्या ब्राह्मणाला त्याची रवी देतात.

जो माणूस हि मुलाबापाच्या भेटीची कथा भक्तीपूर्वक ऐकेल अथवा वाचेल त्याच्या मनाला पूर्ण शांती प्राप्त होईल. त्यांच्या घरातील चुल कधीही विझणार नाही. अशा माणसात चांगुलपणा ओतप्रोत भरलेला असेल. तो त्याच्या मित्रांत प्रिय असेल. तो कधी कोणाच्या संपत्तीचा लोभ करणार नाही. कोणाच्या स्त्रीची अभिलाषा धरणार नाही. त्याच्या मनात घाण विचार येणार नाहीत.

अशारितीने दुसर्या अरण्य पर्वाचा बाविसावा भाग संपला.

# दुसरे अरण्य पर्व

## भाग तेविसावा

वैशंपायन सांगतात, यमाच्या प्रेरणेने ते उच्च दर्जाचे तेजस्वी पांडव अज्ञातवासाच्या एक वर्षाच्या तयारीला लागतात. त्यासाठी ते त्यांच्या बरोबर रहाणार्या ब्राह्मणांच्या सभेत येऊन बसतात. ते हात जोडून त्या समस्त ब्राह्मणांना सांगतात कीं, त्याना आता ठरल्याप्रमाणे अज्ञातवासात जावे लागणार आहे तेव्हां त्यांची परवानगी ते मागत असतात.

युधिष्ठीर बोलतो, "आपल्याला माहित आहे, धृतराष्ट्राच्या मुलांनी कपट छल मार्गाने त्यांची संपत्ती व राज्य हडपले आहे. त्यांना वनवासात पाठवले आहे व आता एक वर्ष अज्ञातवासात रहावे लागणार आहे. त्यासाठी ते त्यांच्यासह असलेल्या ब्राह्मणांची परवानगी मागत असतात.

त्या निर्दय दुर्यैधनाबरोबर त्याचे सवंगडी कर्ण, शकूनी आणि त्याचे कौरव बंधू, ह्यांना त्या एक वर्षात ते सापडले तर पुन्हा त्यांना बारा वर्ष वनवास व एक वर्ष अज्ञातवास असें करावे लागेल. म्हणून आता त्यांना अज्ञातवासात जावयाचे आहे त्यासाठी ते त्या तपस्वी ब्राह्मणांचे आशिर्वाद मागत असतात. जर ते सापडले तर लोकांचे फार नुकसान होईल ह्याची त्यांना काळजी असते. जर सापडले नाहीत तर ते त्यांचे राज्य पुनः मिळवून लोकांचे राज्य स्थापन करू शकतील असें ते त्या ब्राह्मणांना सांगतात. ते ऐकल्यावर सगळे ब्राह्मण पांडवांच्या नांवाचा जयघोष करू लागतात. ते पाहिल्यावर युधिष्ठीराला गहिवरून येते व तो रडू लागतो, त्याचे भान हरपते. त्या लोकांच्या सद्भावनांमुळें तो फार प्रभावित झाला होता. भविष्यात काय लिहीले आहे त्याच्या भ्रांतीत तो हरवून गेला होता. त्याला भानावर आणण्यासाठी धौम्य ऋषी बोलू लागले. ते राजाला सांगू लागतात, "अहो राजा, आपण सूज्ञ अहात, आपण विविध शास्त्रांत प्रवीण अहात. आपण नितीशास्त्रचे जाणकार अहात. अशा परिस्थितीत कसे काम करावयाचे त्याचे भान आपल्याला असले पाहिजे. असें हरखून जाणे चांगले नाही. आपल्या सारखे अशा परिस्थितीत जर डगमगले तर इतरांनी काय करावयाचे"? प्राचीन काळीसुद्धा मोठ्या देवांना अशा परिस्थितीला तोंड द्यावे लागले होते ह्याची मी आपल्याला आठवण करून देत आहे. शत्रूचा नायनाट

करण्यासाठी ते अज्ञातवासात जाऊन त्यांचे काम तडीस नेतात असा इतिहास आहे. उदाहरणार्थ, इंद्र त्याच्या शत्रूचा पाडाव करण्यासाठी गिरिप्रस्थी निशाध म्हणून लपून राहिला होता ते सर्व जाणतात. त्यानंतर तो त्याच्या शत्रूचा नाश करतो. अदितीच्या उदरात जन्म घेण्या आधी विष्णू दैत्यांचा नाश करण्यासाठी बराच काळ अज्ञातवासात राहिला होता ते सगळे जाणतात. तेथे तो हयग्रीव्ह (घोड्याची मान असलेला) म्हणून रहात होता कारण कीं, तो दैत्यांना समजू नये. बळीला आवरण्यासाठी विष्णू वामन अवतार घेऊन गेला होता ते सर्वश्रूत आहेच. हुताशनी पाण्यात लपून बसला होता ते तुला माहित आहे. देवांच्या कामासाठी अशी अनेक रुप घेण्याचे व लपंडाव करण्याचे खेळ देवांनी कित्येक प्रसंगी खेळले आहेत. हरी शत्रूंना मारण्यासाठी इंद्राच्या वज्रात बसले होते ते तुला माहीत असेलच. अतिप्राचीन काळी ऋषी और्व, देवांना सहाय्य करण्यासाठी त्याच्या मातेच्या उदरात कित्येक वर्षे लपून बसला होता ते तुला माहीत आहेच. विवस्वात पृथ्वीवर सगळी कडे लपत छपत त्याचे पसरलेले वैरी नष्ट करत होता ते तुला माहीत आहे. दशरथाच्या पोटी जन्मून तो राम रुपाने विष्णू, दशानन राक्षसांच्या राजाचा नाश करण्यासाठी तुझ्या सारखाच वनवास भोगत होता ह्याचा तुला विसर पडला आहे कां"? शत्रूचा निःपात करण्यासाठी अशी अनेक रुप देवांना ह्या आधीसुद्धा घ्यावा लागली होती हे जरा ध्यानात घे, आणि अज्ञातवासासाठी मोठ्या आनंदी मनाने तयार हो".

धौम्यांच्या त्या उत्तेजक वक्तव्यानंतर भिम त्याला बोलतो, हे समजून घे कीं, तुझ्या आज्ञेने तो गांडीव धारी अर्जुन तुझ्या आदेशाची वाट पहात आहे. अशा स्थितीत असें हतबल झाल्यासारखे वागणे तुला शोभत नाही. मी नकूल व सहदेवाला सांगितले आहे कीं, कांही झाले तरी आता न घाबरता ह्या अज्ञातवासात यशस्वी व्हावयाचे व नंतर कौरवांचा फडशा पाडावयाचा. ते त्या तयारीत असतांना तू असा कसा वागत आहेस. वृकोदराच्या त्या घोषणेचे समस्त ब्राह्मण मोठ्याने जयघोष करून स्वागत करतात. त्यानंतर ते सगळे पांडवांच्या परवानगीने आपापल्या घरी जातात.

धौम्य ऋषींच्या बरोबर ते पांडव त्यांची पत्नी द्रौपदी बरोबर अज्ञात वासाच्या पूर्व तयारीला लागतात. त्यांची सगळी मंत्रशक्ती व इतर सामर्थ्यानिशी ते त्या आव्हानाला सामोरी जाणार

असतात. एका गुप्त जागी ते कशाप्रकारे लपून कामं करावयाची व एकमेकांशी संपर्क कसे राखावयाचे त्याच्या नियोजनासाठी ते तयार होतात.
अशारितीने दुसर्या अरण्य पर्वाचा तेविसावा भाग संपला.

# - महाभारत वनपर्व संपले -

## भाषांतरकाराचा परिचय -

मी अशोक कोठारे, माझ्या वयाची ७६ वर्षे झाली आहेत. गेली कित्येक वर्षे मी विविध प्राचीन ग्रथांचा एक कुतुहल म्हणून अभ्यास करत असतो. त्या काळात मला समजले कीं, आपल्या प्राचीन शिक्षण पद्धतीत चार ग्रंथांचे महत्व होते. त्यात मनुस्मृती, महाभारत, रामायण आणि योगवासिष्ठ हे महत्वाचे होते. आपल्या पूर्वीच्या शिक्षण पद्धतीत ह्या ग्रंथांचे वाचन करण्याची प्रथा होती. नंतरच्या काळात इंग्रजांनी त्यांची शिक्षण पद्धती येथे रुजवली व आपली पाठशाळा पद्धती संपुष्टात आली. आपल्या शिक्षण पद्धतीत अक्षर ओळख, नितीशास्त्र, गणित एवढेच शिकवले जात. त्याशिवाय शिकतांना घोकंपट्टी करण्याचे महत्व होते. ते सगळे आता इतिहास जमा झालेले असले तरी त्याची उपयुक्तता नाकारता येणार नाही. म्हणून एक प्रयत्न मी करावयाचे ठरवले. मी एक अतिसामान्य अभ्यासक आहे तरी व्यासंग मोठा आहे. त्या प्रमाणे, मनुस्मृती प्रथम ई-साहित्यच्या माध्यामाने तुम्हाला दिली. त्याचे चांगले स्वागत झाले आहे. त्यामुळें माझा उत्साह वाढला आणि महाभारताचे, 'जसे आहे तसे', अशाप्रकारचे भाषांतर आता देत आहे. त्याचे साधारणपणे ४० खंड होणार आहेत. संपूर्ण महाभारत येण्यास बराच अवधी लागणार आहे. इतर मंडळी महाभारताचे भाषांतर करतांना त्याचा आकार आटोपशीर करण्यासाठी त्यातील शिकवणूकीचा भाग व्यर्थ समजून सोडून केवळ कथाभागाचेच भाषांतर करतात त्यामुळे एक शैक्षणिक पुस्तक म्हणून असें भाषांतर रहात नाही. मी सगळ्या नितीशास्त्र शिकवणार्या कथा जशाच्या तशा ठेवल्या आहेत. कांहीं जागी विषय समजणे सोपे व्हावे म्हणून मी टीपा दिल्या आहेत कांही कंसात दिल्या आहेत, कारण मला माहित आहे किं, ह्याचे वाचन करणारे मराठी भाषिक सामान्य आहेत. कोणी विद्वान वाचक असेल तर त्याला त्या टीपांची गरज वाटणार नाही.

आता थोडे माझ्याबद्दल लिहीत आहे. तसे पाहता अशा कामात कोणी संस्कृतचा प्राध्यापक असला पाहिजे असें कोणाला वाटेल मग मी एक इंजिनीअर कां हे काम करत आहे असा प्रश्न पडेल पण त्याचे उत्तर असें आहे किं, एवढे मोठे काम करण्यास कोणी

तयार होत नाही आणि ते सुद्धा फुकट करणारा विद्वान मला मिळाला नाही. ज्या कोणाला मी त्याचे महत्व सांगितले ते सगळे त्या कामासाठी भरपूर मानधन मागू लागले मग मी ठरवले आपणच ते करावे. गेली २५ वर्षे मी निवृत्त जीवन जगत आहे, बराच समय माझ्याकडे आहे मग आपणच हे करावे अशा विचारांने ते करावयास घेतले व प्रथम मनुस्मृती दिली आता महाभारत देण्याचा प्रयत्न चालू आहे. त्यासाठी दैवयोगांने ई-साहित्य सारख्या ध्येयवादी मंडळींची साथ मिळाल्यामुळें माझा उत्साह द्विगुणित झाला.

१९८५ पर्यंत मी माझा उद्योग करत होतो. कारखाना भाईदरला व रहाणार चेंबूरला त्यामुळें येण्याजाण्याची दगदग माझ्या प्रकृतीला झेपली नाही व मी हृदयाच्या झटक्याने आजारी झालो. त्यानंतर डॉक्टराच्या सल्ल्याने मी सगळे उद्योग बंद करून घरात बसलो. थोडी बचत केली होती त्याच्या जोरावर आज मी माझे साधे जीवन जगत आहे. पैशापाठी लागण्याचा स्वभाव माझा मुळातच नाही. सुरुवातीपासून वाचनाचा छंद होता त्यात कथा कादंबर्या वाचण्यात रस नव्हता. मी कांहीं माहिती देणारे ग्रंथच वाचत असें. त्यामुळें अनेक विषयांचा व्यासंग झाला त्यात ही चार पुस्तक पुढच्या पिढीस विशेष उपयुक्त ठरतील असे मला जाणवू लागले तेव्हा त्यांची भाषांतरे करण्याचे ठरवले. त्या व्यतिरीक्त माझे लिखाण शेती विषयांत बरेच आहे. कॉंटिनेंटलचे कै. रत्नाकर कुलकर्णी ह्यांनी आग्रहपूर्वक माझ्या कडून 'सेंद्रिय खत निर्मिती उद्योग', नांवाचे पुस्तक लिहून घेतले, मराठीतील हे पहिले खतविषयक पुस्तक आहे. त्याच्या चार आवृत्या झाल्या आहेत. बळिराजा मासिकाचे संपादक भोसले ह्यांच्या आग्रहामुळें त्यांच्या मासिकांत मी १९९२ ते २००५ पर्यंत शेतकर्यांना शेतीचे पद्धतशीर शिक्षण एका लेखमालेच्या द्वारा दिले आहे. त्यात ६५ लेख लिहीले. त्या शिवाय संपादक भोसल्यांच्या आग्रहामुळें निसर्गशेतीचे तंत्र शिकवणारा एक अभ्यासक्रम, 'व्यावहारिक निसर्गशेती अभ्यासक्रम' तयार करून तो स्वखर्चांने शेतकर्यांसाठी १९९४ साली उपलब्ध केला. त्यामुळें आपल्या महाराष्ट्रात निसर्गशेतीचा प्रचार झाला. आता ह्या उतारवयात जेव्हां शरीर साथ देण्यात कुचराई करू लागले आहे,

माझे सगळे लक्ष आपल्या हिंदू मान्यतांचा मराठी माणसाला परिचय करण्यावर आहे. त्यासाठी महाभारत, रामायण व योगवासिष्ठ ह्यांचे 'जसे आहे तसें' अनुवाद करण्यावर भर आहे. माझे ज्योतिष शास्त्राचे ज्ञान चांगले आहे. त्याप्रमाणे जर गोष्टी होणार असतील तर मी २०२० नंतर नसेन. त्यासाठी हे सगळे उपक्रम लवकरात लवकर उरकण्याचा मानस आहे.

आता कोणाला प्रश्न पडेल कीं, हा इंजिनियरींगचा माणूस शेतीवर कसें लिहीतो? त्या बद्दल थोडे लिहीतो. माझ्या कारखान्यात बहुतेक कामगार उरण, अलिबाग, वसईचे होते. शिक्षण बेताचे पण एकादे अवजार कसें वापरावयाचे ते शिकवले किं, ते त्यात लवकरच निष्णात होत होते. त्या मुलांना मी विचारले किं, ते एवढे हुशार असूनही शेती कां करत नाहीत? त्यांचे एकच उत्तर असें, मालक शेतीत भागत नाही. मग मी ठरवलें शेतीशास्त्राचा अभ्यास करावयाचा. अभ्यासाचाच छंद असल्यामुळें तो सुरु झाला. त्यात मला लवकरच समजले कीं, शेतीचा संबंध बॉटनी पेक्षा मायक्रोबायॉलॉजीशी जास्त आहे. मग मी त्या विषयाचा अभ्यास करून त्यात लवकरच पारंगत झालो. त्या अभ्यासाप्रमाणे मी कांहीं तंत्र विकसित केले व ते अजमावण्यास सुरुवात केली. त्यात अपेक्षेप्रमाणे परिणाम मिळू लागले त्याप्रमाणे एक शेतीतंत्र विकसित होत गेले. माझ्या कामगाराच्या शेतावर माझे प्रयोग होत होते, त्यात माझा पैसा लागत होता व त्यांचे कुटूंबिय काम करत होते. त्यावेळी मी चांगला तरुण होतो व उत्साहसुद्धा होता. माझ्या तंत्राने शेती उत्तम होते हे मी समजलो व ते सगळे तेथेच संपले. ते सगळे १९८२ ते १९८५ अशा सालात झाले होते. मीसुद्धा ते सगळे विसरून गेलो. परंतु, १९९२ साली मोठा दुष्काळ पडला होता महाराष्ट्रात त्यावेळी मी एक दृष्य टीव्हीवर पाहिले, त्यात एक ग्रामीण महिला एका खोल विहीरीत उतरून वाटीने पाणी काढून बालदीत भरत होती. त्यावेळी मला रहावले नाही व विचार केला, माझ्या ज्ञानाचा जर उपयोग होणार नसेल तर काय कामाचे ते ज्ञान. मी एक लेख लिहीला व दैनिक नवशक्तिला पाठवला. तो लेख त्यांनी प्रसिद्ध केला नाही. मग मी तो लेख बळीराजा

मासिकात पाठवला. त्यात तो छापून आला. तसे पहाता नवशक्तिनेसुद्धा तो प्रसिद्ध केला. त्यानंतर बळिराजाच्या वाचकांची प्रश्न विचारणा सुरु झाली व मी माझे शेतीचे ज्ञान त्यांना त्या मासिकात लेख लिहून देऊ लागलो. अशारितीने माझे शेतीत लिखाण भरपूर झाले. त्याबद्दल आधी लिहीले आहे.

आता थोडे माझ्या ब्लॉगपोस्ट बद्दल लिहीतो. हिंदूस्तानात २००८ साली इंटरनेटवर ब्लॉग सुरु झाले व मी त्यात माझे ब्लॉग सुरु केले. माझ्या ख्रिस्ती धर्माबद्दलच्या वादग्रस्त परंतु शास्त्रशुद्ध विवेचनामुळें पहिले ब्लॉग बंद झाले. माझे पूर्वी पांच ब्लॉग होते. त्यात मी अभ्यासांने जे संशोधन करून शोधून काढत असें, ते लिहीतो. त्यात अनेक विषयावरील माझे संशोधित साहित्य प्रसिद्ध करत असतो. त्यात ब्राह्मण धर्म, जैन धर्म, ख्रिस्ती धर्म, इस्लाम, अर्थ, न्याय, नितीशास्त्र, राजकारण अशा विषयांवर बरेच लिहीत असतो. ते तुम्ही वाचू शकता. एकच ब्लॉग मराठी आहे बाकीचे इंग्रजीत आहेत. सिलीकॉन मधील ब्लॉग इस्लाम बद्दलच्या माझ्या संशोधनाचे शास्त्रशुद्ध लिखाण आल्यानंतर बंद झाला आहे. गुगलवरील ब्लॉग मात्र जोरात चालू आहेत. माझे अशा विषयावरील विचार नाकारता येणार नाहीत असें सत्याला धरून असल्यामुळे जेव्हां मला कोणी विरोध करतो तेव्हां त्यांना मी नम्रपणे सांगतो, कृपया माझ्यावर अब्रुनुकसानीचा दावा करावा, ते झाले किं, ते लोक गप्प होतात. कारण, जर ते तसा दावा करतात तर त्यात तेंच हरण्याचा संभव जास्त असतो. एवढेच नाही तर त्यांच्या खोटेपणाचा जाहिर बभ्रा होईल ते त्यांना परवडण्यासारखे नसते. मी प्रचारकी थाटाचे लिखाण करत नाही. जे समजते ते विज्ञानाच्या आधाराने सिद्ध करूनच लिहीतो, आजच्या काळात असें लिखाण बर्याच गटांना आवडत नाही. बर्याच लोकांचे खूनसुद्धा झाले आहेत हे आपण जाणताच, म्हणून मी शक्यतर माझ्याबद्दल कांहीं लिहू इच्छित नाही. सत्यापेक्षा सोइस्करचा आज जमाना आहे. माझे जीवनातील अनुभव लिहीले तर ते एक वाचनीय पुस्तक होईल पण त्यात सर्व वादग्रस्त विषय पुढे येतील. मी मांडलेला कोणताही मुद्दा आजवर कोणालाही खोटा ठरवता आलेला नाही. जाता जाता,

जैन धर्माबद्दलचा वाद सांगतो एक उदाहरण म्हणून, १९०२ मध्यें सर जगदीशचंद्र बोस ह्यांनी वैज्ञानिक पुरावे देऊन जे सिद्धांत मांडले त्याचा पुरावा देऊन मी लिहीले कीं, हल्ली जो जैन धर्म प्रचारात आहे तो तीन हजार वर्षापूर्वीच्या अडाणीपणावर आधारित आहे, त्यातील सगळेंच विचार अज्ञानाधारीत म्हणून खोटे आहेत. एवढेच नाही तर व्यवहारिक जीवनात तो धर्म पाळणे केवळ अशक्य आहे. त्यामुळें जैन उखडले पण सुदैवाने ते खूनखराबा करणारे नसल्यामुळें वाचलो.

शेवटी माझ्या तब्यती बद्दल लिहीतो. मुळातच माझी प्रकृती तोळामासा असते त्यात २०१० साली बेस्टच्या बसने मला ५० फूट लांब फेकल्यामुळें पुरता जायबंद झालो होतो. मेंदूला आघात झाल्यामुळें माझी स्मरणशक्ती गेली होती. दोन बरगड्या तुटल्या होत्या. माझे शौंच व मुत्र ह्यांवर नियंत्रण राहिले नव्हते. दीड वर्ष तसेंच गेले. त्यावेळी माझे वय ६८ होते. केवळ दैव बलवत्तर म्हणून आज मी पूर्ववत झालो आहे तरी कोठल्याही वाहनाने प्रवास करण्यास परवानगी नाही. म्हणून मी कोठेही जात नाही. गेलेली स्मृति पुनः आली व आता सगळे बरे चालले आहे. त्या काळातील अनुभव विशेषकरून माझ्या ज्ञान साधनेचे, मोठे रोचक आहेत. तूर्तास एवढे पुरे.

ई-साहित्यच्या पदाधिकार्यांच्या आग्रहामुळें ही माझ्याबद्दली खरी माहिती सविस्तरपणे दिली आहे. जर शक्य असेल तर त्यातील मजकुरात बदल न करता तो प्रसिद्धीस घ्यावा.

अशोक कोठारे,

२३- २ -२०१८

ashokkothare@gmail.com ,

ashokkothare@yahoo.co.in

**विशेष सुचना** - महाभारताचे सर्व खंड वाचण्यासाठी कृपया खालील लिंक वर जा.

http://www.esahity.com/23092343238123512366234023812350.html

## ई साहित्य प्रतिष्ठान -

मराठी भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणार्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार न हजार प्रती छापल्या जात. पांच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी! आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच लाख वाचकांपर्यंत जात आहेत. वर्षाला अर्धा कोटी डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर ऑर्डर करतात. व्हट्स अप, ई मेल, ॲप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायला लागली आहेत. सुसाट सुटल मराठीचं वारु. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठीवरील प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगांने सुसाट सुटलेल्या मराठीच्या गाडीला आता कोणी थांबवू शकत नाही. या धूमधडक क्रांतीत साहभागी व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही कितीही वाचक आणा. ते शंभर आणतील आणि ते हजार आणतील. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला कुठली पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत ते आपल्याला टिव्ही, पेपरची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवून देऊ.

ई साहित्यची पुस्तके www.esahity.com वरून डाऊनलोड करा.

esahity@gmail.com ला कळवून ई-मेलने मांगवा. किंवा 7710980841 हा नंबर सेव्ह करून ठेवा, या नंबरला तुमचे नांवाने Whatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा.

लिंक ई साहित्यचे app.https://play.google.com/store/apps/details?id=com.esahity.www.esahitybooks ह्या लिंकवर उपलब्ध आहेत. ते download करा. हे सर्व मोफत आहेत.

धन्यवाद